– डॉ.राजेश वहुरूपी, भिवापूर ---------- १८२

४५ आदिवासी जमातींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान – डॉ.राजू पवार, शिरपूर, जि.धुळे. – १८५

४६ भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रीयांचे योगदान - डॉ. राजू जाधवर, कळंबोली, नवी मुंबई ---- १८८

४७ भारतीय संविधान निर्मिती आणि विकास – १)डॉ.रायन महाजन, नागपूर, २) डॉ.संदीप तुंडूरवार, नागपूर, ३) डॉ.शरद सांबारे, नागपूर, ४) डॉ.राहुल चुटे, मुरमाडी ---------- १९०

४८ हरितक्रांती व त्याचे भारतीय कृषी क्षेत्रावर झालेले परिणाम
– १)डॉ. सचिन भोगेकर, नागपूर, २) डॉ.नितीन कायरकर, नागपूर. ---------- १९४

४९ आधुनिक भारताच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान
– डॉ. संजय ढवळे, मोहपा, जि.नागपूर ---------- १९८

५० ग्रामीण क्षेत्रात नागरी आधारभूत सुविधांची तरतूद योजनेचा सविस्तर आढावा
– डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, ---------- २०२

५१ भारतीय दुग्ध उद्योगाची कामगिरी
– डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ---------- २०५

५२ महाराष्ट्रातील कृषी विषयक विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
– डॉ.सतिश राठोड, नागपूर. ---------- २१४

५३ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्यांमधून दिसणारी समाज सुधारणाविषयक भूमिका : एक चिंतन
– डॉ.शिल्पा शेटे, पाबळ, ता.शिरूर, जि.पुणे ---------- २१७

५४ १९४२ ची चले जाव चळवळ व पहिला झेंडा वंदन - डॉ.श्रीकांत सोनटक्के, नागपूर. ---------- २२४

५५ राष्ट्रीय काँग्रेसच्या आरंभीच्या राजकारणात न्या. म. गो. रानडे यांची भूमिका
– डॉ. श्रीनिवास सातभाई, अमरावती. ---------- २२८

५६ भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान
– १)डॉ.सोनिया डावरे, औरंगाबाद २)डॉ.शीला स्वामी, उस्मानाबाद ---------- २३३

५७ नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील परिवर्तन – डॉ.सोनू लांडे, पनवेल, जि.रायगड ---------- २३७

५८ वैश्विक स्त्रीवादाचे स्वरूप, भूमिका व वाटचाल – डॉ. सुधाकर चौधरी, शिरपूर, जि.धुळे. --- २४१

५९ छत्रपती शिवाजी महाराज यांचे जलव्यवस्थापन
– १)डॉ.सुजाता गोरखेडे, नागपूर, २)डॉ.सचिन बन्सोड, नागपूर ---------- २४४

६० बहिष्कृत हितकारिणी सभा : अस्पृश्य समाजाला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणणारी संस्था
– डॉ.सूर्यकांत कापसीकर, नागपूर ---------- २५०

महाराष्ट्रातील कृषी विषयक विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान

प्रा.सतीश बं. राठोड
सहायक प्राध्यापक – इतिहास विभाग,
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
मो.९१३०००४७२५

गोषवारा :

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून जवळजवळ एक तप सलग या पदावर असणारे वसंतराव नाईक महाराष्ट्रातील लोकप्रिय मुख्यमंत्र्यांपैकी एक मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या लोकप्रियतेत सिंहाचा वाटा कोणता असेल तर ग्रामीण महाराष्ट्र, तेथील समस्या खासकरून शेतकरी व शेतीविषयक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी केलेले कार्य ज्याची दखल आजही देशपातळीवर घेतली जाते. एक कल्पक-कार्यक्षम मुख्यमंत्री म्हणून कार्य करत असताना शेती व शेतकरी हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. शेतीचा विकास म्हणजे शेतकऱ्यांचा समग्र जिवनाचा विकास असे त्याचे मत होते. आपल्या संपूर्ण कार्यकाळात त्यांनी शेती, शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सरकारचे लक्ष केंद्रित केले. अनेक नव्या सृजनक्षम योजना कृतीत आणल्या ज्याचे इष्ट परिणाम आजही शेतकरी, कष्टकरी वर्गावर दिसून येते. त्यांनी योजलेल्या योजना व त्यासंबंधी त्यांचे विचार हे कृषीविषयक त्यांचा सूक्ष्म अभ्यास व कृषक समाजाविषयी असलेली त्यांची संवेदनक्षम भावना याची प्रचिती देतात.

सूचक शब्द - नाईक, कृषी, शेती, शेतकरी, दुकाळ, अन्नधान्य, रोजगार.

उद्देश :

१) वसंतराव नाईक यांचे शेतीविषयक विचार जाणून घेणे.
२) महाराष्ट्रातील कृषीविषयक समस्यांच्या इतिहासाचा आढावा घेणे.
३) वसंतराव नाईकांचा शेती-शेतकरीविषयक दृष्टीकोन समजून घेणे.
४) कृषीविषयक योजनांचा अभ्यास करणे.
५) महाराष्ट्र घडविण्यात वसंतराव नाईकांच्या योगदानाचा आढावा घेणे.

गृहीतक :

महाराष्ट्रातील कृषीविषयक सुधारणामध्ये वसंतराव नाईक यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून प्रस्तुत शोधनिबंध प्राथमिक व दुय्यम साधनावर आधारित आहे.

प्रास्ताविक :

भारत हा प्राचीन काळापासूनच कृषीप्रधान देश राहिलेला आहे. आजही देशातील बहुसंख्य लोकांचे जीवन कृषीवर अवलंबीत आहे. येथील समाज संस्कृतीवर कृषी आणि कृषीजिवनाचा प्रभाव आहे. परंतु असे असले तरी आजही शेतकऱ्यांचे जीवन सहज सुकर झाले आहे असे मुळीच नाही. आजही अधिकतर शेती नैसर्गिक पर्जन्यावर अवलंबून आहे. स्वातंत्र्यानंतर खरोच कृषीमध्ये परिवर्तन घडून आले नक्कीच. ज्याकाही सिंचनाच्या व्यवस्था व्हायच्या होत्या त्यालाही पुढील काही दशके लागली. अन् आजही त्या पुरेशा नाहीत. संपूर्ण देशाची ही अवस्था आहे त्याला महाराष्ट्र ही अपवाद नव्हता. महाराष्ट्रातील शेती ही प्रादेशिक भिन्नतेनुसार जमीन, पिक आदीबाबतीत विभागलेली आहे. प्रदेशपरत्वे काही समस्या स्थान तर काहीत भिन्नता आहे. महाराष्ट्रच्या सुदैवाने सुरुवातीलाच महाराष्ट्राला अभ्यासू, कल्पक अन् कार्यक्षम नेतृत्व लाभले. यशवंतराव चव्हाणांची महाराष्ट्रातील कारकिर्द कमी असली तर प्रारंभिक धोरणांवर त्यांचा प्रभाव होताच. त्यानंतर वसंतराव नाईकांकडे नेतृत्व आले. त्यांच्याकडे प्रबळ इच्छाशक्ती, धोरणक्षमतेची कल्पकता, जनसामान्यांप्रती असलेला संवेदनक्षम स्वभाव होता. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर प्रदीर्घकाळ राहण्याची संधी येथील जनतेने त्यांना दिली, ती त्यांच्या नेतृत्वगुणाला मिळालेली पावतीच होती. धोरण ठरवताना येथील बहुसंख्याक शेतकरी कष्टकरीवर्ग हा त्यांचा कायमचा केंद्रबिंदू राहिला आहे.

वसंतराव फुलसिंग नाईक दि.५ डिसेंबर १९६३ ते दि.२० फेब्रुवारी १९७५ इतका प्रदिर्घकाळ ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी होते. त्यांच्या राजकीय मुत्सद्दीपणाचे यश तर होतेच परंतु; कोणत्याही मोठ्या समाजगटाचा पाठींबा नसताना सुद्धा येथील जनसामान्यांसाठी जी योजना त्यांनी उभी केली, आपल्या कार्यकर्तृत्वाने जी प्रतिभा निर्माण केली त्यापुळे अनेक संकटातही ते ताठपणे उभे राहू शकले.

येथील बहुसंख्याक शेतकरी, कष्टकरी समाजाच्या हितासाठी शासनस्तरावर उत्तमोत्तम धोरणे आखून ती कृतीत उतरविली. अन्नधान्याबाबतीतील त्यांची प्रतिज्ञा असो किंवा दुष्काळ निवारणाचे कार्य, रोजगार हमी योजना, सिंचन, संकरीत बियाणे अशा सर्व प्रसंगी कृषी व शेतकऱ्यासंबंधी असलेली त्यांची संवेदना संपूर्ण महाराष्ट्रात पदोपदी जाणवते. ''महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर मी बसलेलो असलो तरी देखील मी शेतीच्या बांधावर बसलो आहे'' असे ते म्हणायचे. 'मूठभर उद्योगधंदे महाराष्ट्राचे खरे स्वरूप नाहीत तर शेतकरी हा या राज्याचा कणा आहे' ही त्यांची भूमिका होती. ही त्यांची शेतीविषयक धोरणे व भूमिका आजही अर्थपूर्ण आहेत.

नाईक प्रतिज्ञा आणि अन्नधान्याच्या बाबतीतील स्वयंपूर्णता:

१९४७ साली भारत ब्रिटीशांच्या पाशातून सुटल्यानंतर स्वतंत्र भारतासमोर अनेक समस्या उभ्या होत्या. अन्नधान्याची कमतरता ही त्यापैकी एक समस्या होती. उत्तरोत्तर या समस्येची तीव्रता वाढली लोकसंख्येनुसार उत्पन्नातील वाढ नगण्यच होती. त्यामागे पर्जन्यमान, शेतीची पारंपरिक पद्धत आधुनिक बी-बीयाणांचा अभाव अशी अनेक कारणे होती. त्यामुळे विदेशी पद्धतीवर अवलंबून राहण्याशिवाय मार्ग नव्हता. या संदर्भात १९६५ मध्ये पुण्याच्या सभेत अमेरिकेच्या असहकार्यासंबंधी लालबहादूर शास्त्री यांनी वैताग व्यक्त केला होता. तेव्हा वसंतराव नाईक यांनी, ''अमेरिकेचे धान्य आल्याशिवाय आपण जगू शकत नाही. अशी परिस्थिती असेल आणि ज्या मूल्यांना आपण जिवापलीकडे जपतो तो मूल्ये आम्ही सोडावी, अशी दडपण जर अमेरिका आणत असेल तर धिक्कार असो त्या आमच्या जिवनाचा'' अशी आपल्या मनातील खदखद त्यांनी व्यक्त केली. यावेळी शनिवार वाड्यावर नाईकांनी जाहीर सभा घेतली आणि याच सभेत प्रतिज्ञा केली की, ''येत्या दोन वर्षात महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो, अन्यथा मला जाहीरपणे फाशी द्या.'' देशाच्या इतिहासात एखाद्या मुख्यमंत्र्याने अशी जाहीर प्रतिज्ञा करण्याचे हे एकमेव उदाहरण आहे. राजकिचदृष्ट्या ही प्रतिज्ञा प्रचंड धाडसाची होती. परंतु स्वत:च्या कार्यक्षमतेबद्दल असलेला दुर्दम्य आत्मविश्वास, शेतीविषयक असलेला त्यांचा सूक्ष्म अभ्यास या प्रतिज्ञेच्या मुळाशी होता.

धान्योत्पादन वाढविण्यासाठी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना धान्याच्या सुधारीत संकरित बियाणे वापरण्यासाठी शासनस्तरावरून अनेक सवलती देऊन प्रोत्साहित करण्यात आले. कर्जपुरवठ्याची सोय करण्यात आली. 'महाबीज'ची स्थापना करून डाळी, ज्वारी आदींच्या संकरित वाणांवरील संशोधनाला बळकटी देण्यात आली.

कापूस एकाधिकार :

कापूस हे नगदी पीक खासकरून विदर्भात बहुसंख्य शेतकरी हे पिक घेतात. कीटक व अनियमीत पर्जन्य वा सर्वांचा धोका बघता हे पीक घेताना अनेक धोके असतात व पिकाच्या संगोपनासाठी शेतकऱ्यांवर बराच आर्थिक ताण पडतो. परंतु पीक आल्यानंतर शेतकऱ्याला जो मोबदला मिळायला हवा तो मिळत नव्हता. दलाल मध्यस्थांमुळे आर्थिक विवंचनेतील शेतकऱ्याला कापूस कवडीमोल भावात विकावा लागे. ते केल्याशिवाय शेतकऱ्याला घरगाडा चालविणे शक्य नव्हते. वसंतराव नाईक स्वत: कापूस उत्पादक शेतकरी होते. कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या अडचणीची त्यांना पूर्ण जाणीव होती. १९७० पर्यंत कापूस उत्पादक शेतकरी दलालांकडून विकले जात होते. त्यांच्या पाशातून मुक्तता करण्यासाठी १९७१ साली कापूस एकाधिकार योजना हाती घेऊन लाखो शेतकऱ्यांना दलालांच्या विळख्यातून मुक्त करण्याचे महाकार्य वसंतराव नाईक यांनी केले. कापूस एकाधिकार योजनेमुळे महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकरी थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडले गेले. आपले उत्पादन आंतरराष्ट्रीय बाजारात पाठविणेही त्यांना शक्य झाले.

कृषी विद्यापीठाची स्थापना :

लहरी पर्जन्यमान त्यात पुन्हा शेतीची पारंपरिक पद्धत यामुळे कृषी विकासाला बऱ्याच मर्यादा आहेत. हे जाणून कृषीचे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे, शेती आधुनिक व्हावी यासाठी नाईक साहेबांनी कृषी विद्यापीठ स्थापन करण्याला समर्थन दिले. आधुनिक कृषीचे तंत्रज्ञान, त्यासंबंधीचे शिक्षण-संशोधन याचा विस्तार व्हावा अशी नाईकांची मनोमन इच्छा होती. यासाठी तशा संस्था उभ्या राहणे गरजेचे होते. महाराष्ट्रात कृषी विद्यापीठ स्थापन करावे अशी शिफारस एका तज्ञ समितीने १९६५ ला महाराष्ट्र शासनास केली. त्यावर प्रदीर्घ चर्चा झाली, आंदोलन झालीत, अनेक आरोपही झालेत. नाईकांनी सर्व आरोप व शंकाचे निरसन केले आणि चार कृषी विद्यापीठांची महाराष्ट्रात स्थापना झाली. १) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर, १९६८; २) पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, १९६९; ३) मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, १९७२; ४) बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,

दापोली, रत्नागिरी, १९७२. ई.सन २०१३ मध्ये नाईकांच्या कृषी कार्याबद्दल शासनाने मराठवाडा कृषी विद्यापीठाचे 'वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ' असे नामकरण केले. पारंपरिक शेती करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या हातात नवीन तंत्रज्ञान देण्याअगोदर ते तंत्रज्ञान स्वीकारण्यास त्याचे मन तयार होणे अगत्याचे होते. स्वत: शेतकरी असलेल्या नाईकांनी कृषी विद्यापीठाची स्थापना करून शेतीत परिवर्तन घडवून आणणारा एक कृती कार्यक्रम तयार केला. त्याचा फायदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नक्के तर एका कृषीप्रधान राष्ट्राला संपन्न करण्यासाठीचे ते एक पाऊल होते.

दुकाळ निवारणाचे कार्य :

१९७०-७२ या काळात महाराष्ट्रात भिषण दुष्काळ पडला. या नैसर्गिक संकटाने संपूर्ण महाराष्ट्रात विकट परिस्थिती निर्माण झाली. अशा परिस्थितीच्या काळात वसंतराव नाईक अविचल कणखर उभे राहीले. शासनस्तरावरून संपूर्ण यंत्रणा त्यांनी गतिशिलतेने कार्यान्वित केली. त्याकरिता एक समिती गठीत केली, ज्याचे अध्यक्ष ते स्वत: होते शासन स्तरावरून शक्य ते सर्व पूर्ण ताकदीने दुष्काळ निवारण कार्यासाठी करण्यात आले. बिन सरकारी मदतीलाही प्रोत्साहन देण्यात आले. श्रीमंत, व्यापारी, अधिकारी, कारकून यांनी जमेल तो हातभार दिला. प्राथमिकतेने मोफत औषधी, पाण्याची सोय, लोकांना सकस अन्न मिळावे यांची व्यवस्था हे कार्य तत्परतेने करण्यात आले. शासनाच्या या कार्यानी दुष्काळाचे दु:ख नाहीसे झाले नाही परंतु; त्याची तीव्रता नक्कीच कमी झाली. लोकांची उमेद कायम राहीली.

रोजगार हमी योजना :

नेतृत्त्वाची परीक्षा संकटकाळात होते, नाईकांच्या काळात अनेक समस्या, संकटे आलीत परंतु कार्यमुलभ, कल्पक व अविचल स्वभावाने त्यांनी अनेक संकटांशी दोन हात केले. त्यामुळेच उत्तरोत्तर त्यांचे नेतृत्त्व निखरत गेले. नाईकांच्या काळात १९६५ ते १९७३ पर्यंत पाचेक दुष्काळ महाराष्ट्रात पडले. हे दुष्काळ म्हणजे जशी लोकांची कारणेही होती तशीच मुख्यमंत्री या नात्याने नाईकांची अग्निपरिक्षाच होती. दुष्काळानुळे महाराष्ट्रात संकटे उभी राहिली. अशा परिस्थितीत राज्याचे आर्थिक नुकसानच नाही तर मानवी मूल्ये सुद्धा धोक्यात येतात. लोकांसमोर जगण्याचा प्रश्न निर्माण होतो. खासकरून कष्टकरी मोलमजुरी करणारा वर्ग जटक्यात सर्वस्व हरवतो. अशा वातावरणात राज्य त्याच्या सामाजिक मूल्यासहीत जपून ठेवण्याचे कार्य नाईकांनी आपल्या नेतृत्वाने दाखवून दिले.

दुष्काळात माणसांना जगवणे, उमेद देणे फार महत्त्वाचे होते. त्यांच्यासाठी पाण्याची व्यवस्था, चालीव प्राण्यांसाठी चारा पुरवठा, अन्न-गरज आदी कार्य तर सुरूच होती. परंतु शेतकरी, कष्टकरी वर्गाला रोजगार देणे फार महत्त्वाचे होते. दुष्काळामुळे दैनंदिन रोजगार ठप्प झाले होते. महाराष्ट्रावर बेरोजगारीचे संकट उभे राहीले, अशा विषमस्क परिस्थितीत सामाजिक आरोग्य धोक्यात येणार होते. अशा परिस्थितीत शेतकरी, भूमिहीन मजूर यांना रोजगार पुरविण्याच्या योजना अमलात आणल्या गेल्या. रिकाम्या हाताना काम देण्याचा संकल्प नाईकांनी केला. 'मागेल त्याला काम आणि त्याच्या हाताला दाम' देण्यासाठी रोजगार हमी योजना तयार करण्यात आली. ही योजना राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वानुसार तयार करण्यात आली. नागपूरच्या विधिमंडळ अधिवेशनात ती एकमताने मंजूर झाली. नाईकांच्या संकट-काळातील ही कल्पक सृजनक्षम योजनेला पंतप्रधान इंदिरा गांधीनी सुद्धा दाद दिली. रोजगार हमी योजना कष्टकऱ्यांचे पोट भरण्यापुरती सीमीत नव्हती; तर संकट काळात अराजकतेपासून समाजाचे रक्षण व्हावे. सामाजिक, सांस्कृतिक आरोग्य अबाधित राहावे हा उदात्त दृष्टीकोन योजनेच्या मुळाशी होता.

संदर्भसूची :

१) आडे निसर्ग, पश्चिम विदर्भातील बंजारा समाजाचे ऐतिहासिक अध्ययन, पृ. २९४.
२) किल्ला
३) जगताप बापुराव, हिरवी क्रांतीचे, पृ. ९७
४) राठोड रवी, हरित क्रांतीचे प्रणेते, श्री वसंतराव नाईक, गोर प्रकाशन, नांदेड, पृ. १८.
५) किल्ला
६) किल्ला पृ. ३९
७) राठोड प्रकाश, हरितक्रांतीचा सुर्योदय, पृ. ३२
८) किल्ला, पृ. ३३
९) किल्ला, पृ. ३५
१०) चतुरस्त्र, वसंतराव नाईक हरितक्रांतीचे प्रणेते महाराष्ट्र विधानमंडळ, पृ. १७.
११) राठोड प्रकाश, पृ. ३५
१२) गठडे सोपान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, अविष्कार प्रकाशन पुणे पृ. ३३
१३) चतुरस्त्र, पृ. ९३.
१४) भाले मधुकर, यशवंतराव ते विलासराव, पृ. ८९.


2021-22 PU

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

संशोधक

• वर्ष :९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०९





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

विद्यमान पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

• मा. श्री. मदनलाल मिश्रा	अध्यक्ष
• श्री. आनंद राजवाडे	प्रमुख मार्गदर्शक
• मा. दलूभाऊ जैन	उपाध्यक्ष
• श्री. संजय मुंदडा	कार्याध्यक्ष
• श्री. लखनजी भतवाल	कार्योपाध्यक्ष
• श्री. प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे	मुख्य चिटणीस
• श्री. व्यंकटेश दाबके	खजिनदार
• श्री. प्रा. सुनिल मुंदडा	वस्तु संग्रहालय चिटणीस
• प्रा.डॉ. सौ. मृदुला वर्मा	संशोधक त्रैमासिक चिटणीस
• श्रीमती जयश्री शहा	ग्रंथालय चिटणीस
• प्रा.डॉ. सौ. उज्वला नेहते	संशोधन व प्रकल्प चिटणीस
• प्राचार्या डॉ. सुनंदा अहिरे	संशोधन अधिकारी
• सौ. लता आगीवाल	कार्यकारी सदस्य
• प्रा.श्री. श्रीपाद नांदेडकर	क्युरेटर (पदसिद्ध)

UGC CARE LISTED
ISSN No 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : १

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नरिंडकर

अतिथी संपादक

● प्रा.डॉ.वी.आर.मस्के ● प्रा.डॉ.दिपाली भावे ● प्रा.प्रफुल्ल राजुरवाडे

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळवणी : अनिल साठये, बावधन, पुणे २१.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No. 2394-5990

६१ ओ.बी.सी समाजाची आरक्षण धोरणाबाबत राजकीय अनभिज्ञता
- डॉ.सुशांत चिमणकर, नागपूर ---------- २५६

६२ आधुनिक भारताच्या जडणघडणीत स्त्रीवादी साहित्याचे योगदान
- डॉ.सुशिला लाखे, उपरेड, जि.नागपूर . ---------- २६३

६३ ब्रिटिशकालीन भारतीय रेल्वे आणि तिचे दुष्परिणाम (इ.स.१८५३-१९१४)
- डॉ.यु.ए.पठारे, नारायणगाव, जि.पुणे ---------- २६८

६४ माहिती तंत्रज्ञान युगात मूल्याधिष्ठीत समाज व मानवी संसाधन निर्मितीमध्ये माहितीची आवश्यकता : एक दृष्टीक्षेप - डॉ.विजय बर्फे, शहादा, जि.नंदुरबार, ---------- २७३

६५ स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नेतृत्व आणि लोकसहभाग
- डॉ.विजय राऊत, नारखेड, जि.नागपूर . ---------- २७६

६६ आधुनिक भारताच्या निर्मितीत राजा राममोहन रॉय यांचे योगदान - डॉ.विमल राठोड, नागपूर -- २८०

६७ नवकवी वा.सी.मर्ढेकर- स्वातंत्र्योत्तर कविता - डॉ.विशाखा कांबळे, नागपूर ---------- २८३

६८ सेनापती बापट यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विविध क्षेत्रांतील योगदान
- डॉ. व्ही.आर.गवारी, अहमदनगर. ---------- २८६

६९ कोण म्हणतं टक्का दिला (नाटक) - डॉ.रमेश भलाभीम जाधवर, कळंबोली, नवीमुंबई ------ २९१

७० डॉ. पंजाबराव देशमुख यांचा 'भारत कृषी समाज' : एक आर्थिक अभ्यास
- डॉ.बालाजी अण्णासाहेब सुरवसे, फोंडाघाट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग ---------- २९५

७१ महात्मा गांधी यांचे नेतृत्व आणि चळवळ - डॉ. रेखा जाधव, नागपूर ---------- ३००

♦ ♦ ♦

ISSN No. 2394-4990

नवकवी बा.सी.मर्ढेकर- स्वातंत्र्योत्तर कविता

डॉ.विशाखा संजय कांबळे
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख-मराठी विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था (मॉरिस कॉलेज) नागपूर-१.
मोबाइल नं.९८५०१५०८६१

सारांश :

नवकवी बा.सी.मर्ढेकर- स्वातंत्र्योत्तर कविता या अनुषंगाने विचार करताना, काव्याची संत-पंत-तंत अशी दीर्घ परंपरा दिसते. दि. १ जानेवारी १८१८ नंतर महाराष्ट्रात पेशवाई संपुष्टात आली. भीमा कोरेगावच्या लढाईनंतर इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाली. या स्थित्यंतराचे पडसाद साहजिकच मराठी साहित्यावर उमटले. महात्मा ज्योतिबा फुले-क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यानंतर कवी केशवसुत यांची मानवतावादी कविता निर्मित झाली. इसवी सन १९१४ ते १९१८ हा कोळ पहिल्या जागतिक महायुध्दाच्या होता. त्यानंतर काही वर्षातच इसवी सन १९३९ ते १९४५ या काळात दुसरे भयंकर प्रलयकारी युध्द झाले. साम्राज्य विस्तार हा या दोन्ही महायुध्दाचा हेतू वा उद्देश होता. वित्तहानी तर झालीच. मनुष्यहानी प्रचंड प्रमाणात झाली. अन्न-वस्त्र-निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा. या गरजा सर्वसामान्य माणसाच्या पूर्ण होऊ शकत नव्हत्या. मानवीमूल्ये,जीवनमूल्ये व नैतिकमूल्ये यांचा ऱ्हास झाला.याच पार्श्वभूमीवर बा.सी. मर्ढेकर यांची कविता आली. त्याचेळी भारतात स्वातंत्र्य आंदोलन चळवळ सुरू होती. जग पेटले होते. त्याचा वणवा जागतिक स्तरावर पसरला होता. या पार्श्वभूमीवर मर्ढेकरांची कविता ही महत्त्वपूर्ण ठरली.

शिशिरर्तुच्या पुनरागमें
एकेक पान गळावया
कां लागतां पद्म येत असे
न कळे उगाच रडावया

- (शिशिरागम पृ.४)

कवीने यातून उदासीनतेचे भावबंध व्यक्त केले आहे.

बीजशब्द - युध्द, नवीनता, नवकाव्य, स्वातंत्र्योत्तर, संज्ञाप्रवाह चर्चा-

प्रस्तावना :

बा.सी.मर्ढेकर यांची कविता महायुध्दाच्या पार्श्वभूमीवर आली. त्यांची कविता ही परंपरेला कलाटणी देणारी होती.

पानांत जी निजली इथे
इवली सुकोमल पाखरे,
जातील सांग अता कुठे ?
निष्पर्ण झाडित कांपरे !

- (शिशिरागम पृ.४)

ही उदासीनता कां निर्माण व्हावी? त्यांची कविता संवेदनशील पातळीवर प्रवाहीत होताना दिसते. मानव-माणुसकी-मानवता हा दृष्टिकोन ठेऊन त्यांनी काव्यलेखन केलंय. आपल्या काव्यलेखनातून यंत्र युगीन वास्तवाची जाणीव करून दिली. त्यामुळेच त्यांना नवकाव्याचे जनक म्हणतात. काव्याचे अंतरंग व बाह्यरंग बदलविले. 'शिशिरागमा' पासून पाहिले तरी मर्ढेकरांच्या रचनेमध्ये शब्दांचे रूप, वाक्यांची मांडणी, विरामचिन्हाचा वापर, ओळींची रचना यांच्या बाबतीत आशिवाशी संवादी असा वैशिष्ट्यपूर्ण व काटेकोर साक्षेप बाळगण्याचा प्रयत्न आढळतो.[1]

वास्तविकतेचे भेदक चित्रण -

कुणि मारावें, कुणी मरावें
कुणी जगावें खाऊनी दगड;
वितळवून कुणिं आयुष्यांना
ओतावे अन् सोन्याचे घड

(आणखी कांही कविता पृ.७७)

महायुध्दोत्तर, स्वातंत्र्योत्तर काळातील परीस्थिती कवीने अधोरेखित केली आहे.

तिंबून झाली कणीक काळी
भऊ,मोकळी ह्या रस्त्याची;
उष्ट्या अन्नामध्ये थबकली
चोच कोरडी बघ घारीची

(आणखी कांही कविता पृ.७६)

या काळात माणूस भुकेने तळपत होता. अन्न ही मानवाची पहिली मुलभूत गरज. ती तत्कालीन काळात पूर्ण होऊ शकली नाही. अनेक शिशिर आले नि गेले झाडाखाली पानांच्या पाचोळ्याचा जमलेला ढाट थर बराचसा मातीत मिळून गेला. अनेक असहाय्य पानें उत्तरवाऱ्याबरोबर उडत, गिरक्या खात, दिगंताला गेली[2] अशी परिस्थिती निर्माण झाली.

अन्य गुल्यांची कविता :- बा.सी.मर्ढेकर म्हणतात, शब्दांवर थोडा दुरूपत आली आणि लय तोंडवळणी पडली म्हणजे कविता लिहिणं फारसं कठीण नसतं. त्यापलीकडे कांही पुढील लिखाणात आहे किंवा नाही हे वाचकच ठरविणार त्यांचं मत अनुकूल पडलं नाही तरी लेखकानं योग्य तो बोध घ्यावा.'

दणकट देह स्नायू जैसे
लोखंडाचे वळसे नाग
कमिन्न काळया मांड्या जैसा
पोलादाचा चिवटा सूर

(कांही कविता पृ.५८)

बा.सी. मर्ढेकर यांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोकांच्या विविध संघटनांचे आंदोलनाच्या संदर्भात कवितेतून खूप सुरेखशैल्या मांडणी केली आहे. लयाची उन्नत अवस्था म्हणजे ज्या लयात घाट अर्थात केंद्र व परीघ प्राप्त होणे ही आहे; आणि या घाटाची उन्नत अवस्था म्हणजे त्यातील घटकांमध्ये संख्यादृष्ट्या विपुल व गुणधर्मदृष्ट्या मौलिक असा संपूर्क लयाविष्कार होणे.'

फलाटदादा, फलाटदादा,
येते गाडी, जाते गाडी;
फलाटदादा, आली ती –
पण
शिरली पडला, गेली गाडी !

'मी एक मुंगी, हा एक मुंगी' या कवितेमध्ये कामगारांच्या भयानात्मक धोक्याचे त्यांनी चित्रण मांडले. मुंग्यांचे प्रतिकात्मक काव्य व्यक्तीत करून त्यांनी श्रमिकांच्या एकजिनसीपणाचे आणि जीवनमूल्यांचे विचार व्यक्त केले आहेत. या कवितेतून मर्ढेकरांनी भारतीय लढ्यांचे आणि आंदोलनांचे आयाम व्यक्त केले. त्यांच्या कवितेने केवळ स्वप्न पाहिले नाही तर समाजाचे वास्तव मांडण्याचे व शेवटच्या माणसापर्यंत मानवी मूल्यांचे जतन करून; त्यांची कविता जनसंवाद करते. उदा. 'गणपत वाणी' या कवितेत गणपत वाणी याच्या जीवनशैलीचे मर्म मांडले आहे. गणपत वाणी हा अत्यंत स्वप्नाळू, जीवनाकडे अत्यंत उत्साहाने पाहणारा व्यक्ती. त्यांनी आपल्या कवितेत शब्दबद्ध केला आहे.

मानवी जीवनाचे भेदक चित्रण त्यांनी आपल्या कवितेत केले –

पिपात मेले ओल्या उंदिर;
माना पडल्या, मुरगळल्याविण;
ओठांवरती ओठ मिळाले;
माना पडल्या, आसक्तीविण.
गरीब बिचारे विळात मगले,
गिगंत मेले उचकी देऊन;
– (कांही कविता पृ.४१)

निसर्ग आणि प्रेमाचे समन्वय :

मर्ढेकरांच्या कवितेत अतिशय गाजलेल्या कवितेपैकी 'शिशिरागम' ही कविता आहे. या कवितेत मर्ढेकर शिशिर ऋतुच्या आगमनाचे स्वागत करीत असताना त्याचे सुंदर वर्णन प्रस्तुत कवितेत करत करीत आहेत. निसर्ग आणि प्रेम यांचं नातं ही अलौकिक आहे. स्थाने पाखरांच्या आणि निष्पर्ण झाडांचं चिंतन येथे मांडले आहे. शिशीराचे आगमन जणू काही प्रेमाचं आगमन होते की काय? असाही संदर्भ कवितेत प्रगट करतात. या कवितेत निसर्ग आणि प्रेमाचे प्रकटीकरण भाव व्यक्त केला आहे. शिशिरागम या आरंभीच्या कवितासंग्रहात मरणाचा संदर्भ देणारी अतिशय सुंदर कविता त्यांनी लिहिली आहे. आकार किंवा आकृती हे शब्द व्यवहारात दृक्प्रत्ययाशी निगडित झालेले असल्यामुळे मर्ढेकर कलाकृतीतील आकृतीसंबंधी बोलतात तेव्हा कलाकृतीचा दिक् न्यायाने विचार करीत आहे, असे वाटते.'

पुसतों सुहास, स्मरनिया
तुज आसवें, जरि लागते
एकेक पान गळावया
शिशिरर्तुच्या पुनरागमें
– (शिशिरागम पृ.४)

मर्ढेकरांच्या काव्यकर्तृत्वाला निर्विवाद मान्यता मिळाली सौ १९६० नंतर. या काळात त्यांची कविता विवाद्य मानली जात होती. तिच्या विरुध्द टीकेचा गदारोळ उडाला होता. पण अनेक नवे कवी नवकाव्याच्या वळणानेच निर्मिती करू लागले होते.''

'उदाहरणात थंडीच्या चंद्र किरणांना प्रश्न विचारला...'

'तुम्हाला एवढी थंडी का वाजते? म्हणून मी माझे मरण लांबविले' असे कवितेमध्ये भाष्य केले आहे. काही कवितेत जीवनभाष्याच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन त्यांनी केले आहे. सौंदर्य आणि मानवी जीवनाचे मूल्य मांडणारी काही कवितांमध्ये मर्ढेकर जीवनभाष्य मांडतात. त्यांनी सर्वसामान्य माणसांचे उदाहरण देऊन कवितेच्या माध्यमातून संदेश दिला आहे. आणखी काही कवितांमध्ये अभंगाच्या शैलीतून

ISSN No. 2394-5990

माणसाचे मूल्य ठरू लेखले आहे. १९४६ च्या आसपास एकूण मराठी साहित्यातच परिवर्तन झालेले दिसते. नवकविता, नवकथा असे शब्दप्रयोग त्यांची व्यवच्छेदक लक्षणे मांडण्यात येऊ लागली. मर्ढेकरांनी नवकविता आणि एकूणच साहित्याच्या स्वरूपासंबंधीचा विचार मांडला.[१] भारतीय समाज स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विविध पातळ्यांवर संक्रमावस्थेत सापडला होता. म्हणून संतांनी, पंडितांनी आपल्या अभंगातून पांडित्य काव्यातून विचारधन पेरले आहे. अभंगाच्या शैलीत मर्ढेकर मांडणी करतात. तेव्हा काव्यातून हृदयसंवाद होताना दिसतो. अज्ञानी जन सज्ञानपासून ते मानव कल्याणकारी त्यांच्या कविता आहेत. भावनांच्या संवेदनांच्या कसोट्यांवर जीवनाला जिंकता येत नाही त्यासाठी अनुभवाची परिपक्वता, त्याची मांडणी आवश्यक असते. असे विचार त्यांनी मांडले.

जगायची सक्ती आहे।
मरायची पण सक्ती आहे।।

निष्कर्ष :

१. बा.सी.मर्ढेकर आणि सर्वसामान्य माणसांच्या आयुष्याचे, जगण्याचे, मरण्याचे जीवन तत्वज्ञान मांडतात.
२. त्यांची कविता यंत्रयुगीन वास्तवाची जाणीव करून देते.
३. नवकाव्याचे जनक म्हणतात कारण त्यांनी काव्याचे अंतरंग व बाह्यरंग बदलविले.
४. कवितेचा आशय विषय संकल्पना नव्या प्रतिमा, नव्या कल्पना, मांडल्या.
५. सर्वप्रथम संतप्रवाह आणला. माणसाच्या सुप्त आणि अर्धसुप्त मनाचे भान आपल्या कवितेद्वारे आणले.
६. त्यांनी माणुसकीचे विडंबन करणाऱ्यावर प्रखर वास्तवाचे भान तर दिलेच सोबतच एकूण जीवनाचे भांडवल आकलन करून देणारी तीव्र संवेदनशीलता मराठी वाङ्मयाला दिली.
७. त्यांच्या कवितेतून निराशा, वैफल्य प्रगट होते.
८. पंतू दे कांक्रिन्य माझे ही कविता म्हणजे विनम्रता, नम्रता, त्यागमयता.
९. बा. सी. मर्ढेकर हे भाषाप्रभू होते.
१०. कवितेतील संवेदनशीलता बदलली की आपोआप तसे काव्य दुर्बोध वाटू लागते.
११. एक यंत्रयुगीन कवी.

संदर्भ :


१. बाळ सीताराम मर्ढेकर - मर्ढेकरांची कविता, श्री. पु. भा. भावे प्रकाशन गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, १९२१, पृ.५.
२. बाळ सीताराम मर्ढेकर – मर्ढेकरांची कविता, श्रीधर बाळकृष्ण रानडे, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, १९९१, पृ. ११९
३. बाळ सीताराम मर्ढेकर - मर्ढेकरांची कविता, बा.सी मर्ढेकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, १९९१, पृ. ११९.
४. द. भि. कुलकर्णी – मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र पुनःस्थापना, अमेय प्रकाशन, नागपूर, १२८२, पृ. १६२
५. द. भि. कुलकर्णी – मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र पुनःस्थापना. अमेय प्रकाशन, नागपूर, १२८२, पृ.१२४.
६. प्रदक्षिणा–खंड, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २००४, पृ.१६–१७.
७. शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, २००७, पृ.७७.

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

संशोधक

• वर्ष :१० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०९





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : १

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद कोंडेकर

अतिथी संपादक

● प्रा.डॉ.वी.आर.मस्के ● प्रा.डॉ.दिपाली भावे ● प्रा.प्रफुल राजुरवाडे

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५४३०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळवणी : अनिल साठये, वाघधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१ पं. जवाहरलाल नेहरू : स्वातंत्र्योत्तर भारतातील शैक्षणिक क्रांतीचे शिल्पकार
– डॉ.सौ.अभिलाषा राऊत, नागपूर ---------- ८

२ भारत देशाच्या कृषी क्षेत्रातील विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान – डॉ.अफरोज शेख, नागपूर १३

३ आधुनिक भारताच्या इतिहासात बाबू हरदास एल. एन. यांचे सामाजिक व राजकीय योगदान
– डॉ.आनंद सूर्यवंशी, नागपूर ---------- १६

४ अर्वाचीन योगसाहित्य: एक विमर्श – डॉ.अरुण पवार, नागपूर ---------- २१

५ स्वातंत्र्य संग्रामातील वीरांगना – पंडिता रमाबाई
– डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे. ---------- २५

६ १९२० ते १९४७ या काळातील स्वातंत्र्यचळवळीतील महिलांचे योगदान कस्तुरबा गांधी व सहकारी महिला – डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे ---------- २९

७ राष्ट्र उभारणीमध्ये स्त्रीया, दलित आणि आदिवासी यांचे योगदान
– डॉ.अशोक शहाणे, उमरेड, जि.नागपूर ---------- ३७

आंबेडकरोत्तर भूमिहीन सत्याग्रहात समता सैनिक दलाचे योगदान
– डॉ.बी. आर. मस्के, नागपूर ---------- ३८

९ ई. व्ही. रामास्वामी पेरियार यांच्या कार्याचा भारतीय समाजव्यवस्थेवरील प्रभाव
– डॉ. भास्कर वाघाळे, नागपूर ---------- ४२

१० वर्षावास, भिक्खु संघ व दानादि कर्म
– १)डॉ.भीमदेवी डांगे, २) डॉ.स्निग्धा राजेश कांबळे, ब्रह्मपुरी ---------- ४६

११ १९४६ नागपूर येथील सत्याग्रह आणि ॲड. हरिदास बाबू आवळे यांची भूमिका
– डॉ.चंद्रशेखर पाटील, नागपूर ---------- ५१

१२ आधुनिक भारताचे निर्माते महात्मा जोतिराव फुले यांची शेतकरी चळवळ
– डॉ.दत्ता हिंगमिरे, उरण, जि.रायगड ---------- ५५

१३ राजश्री शाहु महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान – डॉ. देविदास गाडेकर, नागपूर ---------- ६१

१४ महात्मा जोतिराव फुले आणि सामाजिक न्याय – डॉ.धर्मवीर क्षीरसागर, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर ६६

१५ ज्ञानोदय व मिशन मिशनरींचे सामाजिक कार्य – डॉ.दिगंबर सोनवणे, नेवासा, जि.अहमदनगर --- ६९

१६ अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय चळवळीतील कार्य
– डॉ. दिगंबर सोनवणे, नेवासा, जि.अहमदनगर ---------- ७

१७ आधुनिक समाजव्यवस्था जडणघडणीत संत साहित्याचे योगदान – डॉ. डि. ए. पाटील, शिरपूर, जि.धुळे

१८ भारतातील स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योग
– डॉ.दीक्षा पाटील, कळंबोली, नवी मुंबई ----------

१९ प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ.दिपाली भावे, नागपूर ----------

२० नटसम्राट : वास्तव साहित्याला अपेक्षित वास्तव आणि स्थानीय सुख दुःखांचा काव्यात्मक आलेख
– डॉ.जे. एस. बोरसदार, उंडे, ता.जुन्नर, जि.पुणे ----------

आंबेडकरोत्तर भूमिहीन सत्याग्रहात समता सैनिक दलाचे योगदान

डॉ. बि. आर. मस्के
प्राध्यापक आणि इतिहास विभाग प्रमुख
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर

प्रस्तावना :

दलित चळवळीच्या इतिहासामध्ये 'भूमीहिनाचा सत्याग्रह' हे एक महत्वाचे पर्व मानले जाते. आपल्या कृषीप्रधान देशात जमिनीच्या मालकी हक्काला आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने महत्व आहे. जमीन व जात यांचे पारंपारिक नाते तोडुन भूदास वर्गाला भूस्वामी बनविल्या शिवाय दलितोद्धार साधला जाऊ शकत नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. या जाणिवेतून डॉ. आंबेडकरांनी श्रमजीवी भूमीहिनासंबधी पूर्वीच्या काळात विचार व्यक्त करून भूमीहिन शेतकऱ्याच्या संदर्भात कार्य केले. महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी जमिनीच्या मालकी हक्कावरून देशभर भूमिहिनांच्या सत्याग्रह १९६४-६५ साली घडवून आणला. हा सत्याग्रह जगाच्या इतिहासात ऐतिहासिक मानल्या गेला आहे. या सत्याग्रहात ३ लाखापेक्षा जास्त भूमीहिन शेतकरी जात, धर्म, पंथ, यांचा विचार न करता सहभागी झाले.

डॉ. बाबासाहेबांनी समता सैनिक दलाची मूर्हुतमेढ मुंबई येथे १९२६ साली रोवली. १९२७ च्या महाड चवदार तळे सत्याग्रहामध्ये समता सैनिक दलाची आवश्यकता व महत्व स्पष्ट झाले. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचे कार्य निश्चितपणे आणि यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी अशा प्रभावी संघटन दलाची फार आवश्यकता होती. स्पृश्य सनातनी हिंदू बांधवाकडून अस्पृश्य समाज बांधवावर अन्याय, जोर जुलूम करीत. तसेच विषमतेची शिकवण व चातुर्वर्णक वगैरे घातक प्रकाराला आळा घालविण्याकरीता या दलाची स्थापना करण्यात आली. सामाजिक समतेचे पक्षित कार्य करण्यासाठी या दलाची स्थापना झाली आहे असे डॉ. आंबेडकर म्हणत.

समता सैनिक दलाचा विकास क्रमाक्रमाने आवश्यकतेनुसार झाल्याचे दिसते. प्रथम ही संघटना हिंदू समाजामध्ये दलित वर्गाला समतेचे स्थान मिळावे म्हणून स्थापन झाली होती. पुढे ही संघटना हिंदूपासून पूर्णतः विभक्त होवून हिंदूच्या बरोबरीने सामाजिक समता हस्तगत करण्यासाठी प्रयत्नशील झाली. महाड सत्याग्रह, मंदिर प्रवेश आंदोलने, गोलमेज परिषदा, दलित फेडरेशन, स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या राजकीय भूमिकेला खंबीर पाठबळ देण्यासाठी समता सैनिक दलाची आवश्यकता भासू लागली, क्रमाक्रमाने समता सैनिक दलाचा विकास होऊ लागला.

भूमिहीनांचा सत्याग्रह आणि समता सैनिक दल :

आंबेडकरवादी चळवळीतील अत्यंत मैलाचा दगड म्हणून 'भूमिहीनांचा सत्याग्रह या आंदोलनाचा उल्लेख केला जातो. राष्ट्रीय स्तरावरील भूमिहीनांच्या सत्याग्रहापूर्वी देशात छोटे-मोठे सत्याग्रह घडून आलेले होते. या आंदोलनाचे पहिले एणगिंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थितीत १९५३-५४ ला मराठवाड्यात फुंकले गेले. एकदा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोहनलाल शास्त्रीसोबत दिल्लीवरून आग्रा या शहराकडे प्रवास करीत असतांना आग्रा शहराच्या पलिकडे पसरलेली हजारो एकर रिकामी जमीन बघितली. त्यावेळीते सोहनलाल शास्त्रींना म्हणाले की, प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू म्हणतात की, देशात भूमिहीन, दलित, आदिवासींना वाटप करण्यासाठी जमीन शिल्लक नाही. मी त्यांना खात्रीलायक पद्धतीने आग्रहाने सांगेन की, मी स्वतः रिकामी शिक असलेली हजारो एकर जमीन पाहून आलो आहे. तो जमीन दलित, गरीब, आदिवासी नाना वाटून द्या आणि माझा शब्द जर नेहरूंनी पाळला नाही, तर या सरकारी जमिनीवर जबरदस्तीने कब्जा करण्याचा सल्ला मी माझ्या देशबांधवांना हिंमतीने देणार. १९५५ साली रामलीला मैदानावर भरलेल्या प्रचंड सभेत भाषण करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतकऱ्यांना आवाहन करतांना म्हणाले की, 'भूमिहीनांनी सरकारी पडीक जमिनीचे पशागतीसाठी कब्जे घ्यावेत, पुढे काय होईल ते पाहिले जाईल.' त्याचा परिणाम असा झाला की, ठिकठिकाणी भूमिहीनांचे छोटेमोठे आंदोलन बाबासाहेबांच्या हयातीतच सुरू झाले. परंतु सरकारने या पडीत जमिनी भूमिहीनांना देण्याऐवजी काही ठराविक ग्रामपंचायतींना देण्याचा सपाटा सुरू केला. परिणामी दलित नेतृत्व पेटून उठले व भूमिहीनांचे आंदोलन तीव्र करण्यात आले. ही आंदोलने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीपासून तर त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरही तत्कालीन अध्यक्ष एन. शिवराज व त्यानंतर दादासाहेब गायकवाडांच्या

ISSN No. 2394-5990

नेतृत्वात फार मोठ्या प्रमाणात चालविल्या गेले. असेच एक आंदोलन अहमदनगर जिल्ह्यात करण्यात आले होते. यावेळी पडीत जमिनी व भूमिहिनांचा सत्याग्रह सुरू करण्यासाठी दा. ता. रुपवते यांनी आवाहन केले. अशावेळी निवडने करीत लोकजागृतीचे कार्य हाती घेताच लोकांसोबत समस्त सैनिक दलानेही यात उडी घेत सत्याग्रहात सहभाग घेण्याची तयारी दर्शविली. दुसरीकडे विधानसभा व लोकसभेतही त्याविषयी चर्चा करवून घेण्यात रिपब्लिकन पक्षाचे आमदार व खासदार यशस्वी होत होते. विधीमंडळात आवळेवाचू, एस. एल. कांबळे या इतर चर्चा घडवून आणत होते. तर दुसरीकडे समता सैनिक दलाचे नेते लोकजागृती करून दबावगट निर्माण करीत होते. अहमदनगर जिल्ह्यात सत्याग्रह सुरू होताच समता सैनिक दलासहीत अनेक स्त्री-पुरुषांनी या सत्याग्रहात भाग घेतला. या सत्याग्रह प्रसंगी ६०० जणांना कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. ही शिक्षा ४ ते ३० दिवसांपर्यंतची होती. तरीही सत्याग्रह सुरूच ठेवण्याचे जाहीर करण्यात आले. हे आंदोलन दिवसेंदिवस चाहतच गेलेले दिसून येते. इकडे आंदोलन सुरू असतांनाच दलाची भूमिका काही राहील? शिस्त, संघटन व शांतता या प्रश्नांसंबंधी चर्चा करण्यासाठी बृहन्मुंबई समता सैनिक दलाच्या सर्व शाखांची तातडीची सभा २१ सप्टेंबर १९५९ रोजी बी. आर. माळकनकर स्टॉफ ऑफिसर हेडक्वॉर्टर बृहन्मुंबई समता सैनिक दल यांनी घेण्याचे जाहीर केले.

सावंतर एस. शिवराज व दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वात संपूर्ण राष्ट्रीय स्तरावर भूमिहीनांच्या सत्याग्रह करण्यात आला. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी अनेक सत्याग्रहींच्या नोंदणी केली. आपले नाव सत्याग्रहिंच्या यादीत नोंदवाचे असकारणः लोकांच्या रांगा लागलेल्या असायच्या. या सत्याग्रहाची व्याप्ती पुढे चाहत जाऊन अखिल देशपातळीवर हे आंदोलन छेडल्या गेले. १ ऑक्टोबर १९६४ रोजी दिल्लीला लोकसभेवर प्रचंड मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण ७ मागण्या होत्या. या मोर्चासाठी फार मोठ्या प्रमाणात जनजागृती व तयारी अखिल भारतीय स्तरावर करण्यात आली होती. या कार्यात सामान्य नागरिकांपासून तर समता सैनिक दलाचे सैनिक, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी कुठेही कमी पडू न देता आपले योगदान दिले. कारण एवढ्या मोठ्या प्रमाणात मोर्चा काढायचा व तो यशस्वी करायचा असेल, तर प्रत्येकांनी त्यात आपले योगदान दिले पाहिजे, ही भावना मनामध्ये निर्माण झाली होती. ही माहिती गल्लीबोळ्यांतील लोकांपर्यंत पोहचविण्याची फार मोठी जबाबदारी समता सैनिक दलाचे स्वयंसेवक करीत होते. या आंदोलनाचे प्रचंड ताणतणावामुळे एस. शिवराज यांचे मंगळवार दि. २९ सप्टेंबर १९६४ रोजी पहाटे ५ वा. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दिल्लीतच निधन झाले. त्यांच्या निधनाची ही वार्ता सकाळी ९ वा. आकाशवाणीवरून कानी पडताच सारा सत्याग्रहीवर्ग हादरून गेला. जो तो आपापसात चर्चा करू लागला. आपला नेता गेला, आता आपल्या सत्याग्रहाचे काय होईल, याच विवंचनेत जो तो होता. परंतु त्यावेळचे रिपब्लिकन नेतृत्व या प्रसंगामुळे खचून जाणारे नव्हते. त्यांनी सत्याग्रहींना हिंमत दिली. काही झाले तरी मोर्चा ठरलेल्या वेळीच होईल! केवढा हा दुर्दम्य विश्वास! लोकांच्या दर्शनानंतर त्याच दिवशी रात्री साडे सात वाजता एका विशेष विमानाने त्यांचे पार्थिव शरीर दिल्लीवरून नागपूर मार्गे मद्रासला नेण्यात आले. लगेच म्हणजे ३० सप्टेंबर १९६४ ला दुपारी त्यांच्या पार्थिव शरीराला अग्नि दिल्यानंतर सगळे नेते दिल्लीला रवाना झाले.

बाबासाहेब गायकवाडांचे नेतृत्व :

शिवराजांच्या आदेशानुसार 'दिल्लीच्या संसदेला घेराव' हा एकच ध्यास रिपब्लिकन जनतेने घेतला व पुढील आंदोलन दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वात सुरू केले. त्यांच्या नेतृत्वात हा प्रचंड मोर्चा दि. १ ऑक्टोबर १९६४ ला काढून अपेक्षेपेक्षाही जास्त यशस्वी केला. हा एवढा प्रचंड मोर्चा पाहूनही सरकारला जाग आली नाही. त्यांनी मोर्चेकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणदिनी दि. ६ डिसेंबर १९६४ पासून पुन्हा सत्याग्रहाचे हत्यार उपसण्यात आले व आंदोलन अखिल देशपातळीवर अधिकच तीव्र करण्यात आले. दि. ६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर १९६४ पर्यंत जवळपास दीड लाख सत्याग्रहींनी या चळवळीत खुशीने व हिरीरीने भाग घेतला. यात लहान लहान मुले आणि तरुणांपासून आणि तरुण मुलींपासून तर ८० वर्षांच्या म्हाताऱ्या स्त्रियांपर्यंत अनेकांनी यात भाग घेतला. या सत्याग्रहात अनेक लोकांना तुरुंगात जावे लागले. जेव्हा जेलची संख्या अपुरी पडू लागली, तेव्हा त्यांना सरकारी शाळांमध्ये ठेवण्यात येऊ लागले.

समता सैनिक दलांचे योगदान :

या आंदोलनाचे संदर्भात समता सैनिक दलाचे ज्येष्ठ सेनानी व १९६४ च्या भूमिहीनांच्या सत्याग्रहात सहभागी होऊन तुरुंगवास भोगून आलेले, एस. आर. वाली आपल्या एका लेखात लिहितात की, १९६४ च्या रिपब्लिकनच्या अखिल भारतीय भूमिहीनांच्या सत्याग्रहाचे आंदोलनात

जवळपास १० लाख सत्याग्रहींनी भाग घेतला. त्यातील २ लाख ७० हजार सत्याग्रहींची नावे तुरुंगातील रजिस्टरमध्ये नोंदणी केल्या गेलेली आहेत. ५० जणांना नागपूरच्या तुरुंगात एकाच ठिकाणी कोंबल्याने संभाजी वासनिक व सुरडकर यांचा मृत्यू झाला. तर कडक थंडीमुळे आईजवळील ६ महिन्याचे मूल दगावले. या आंदोलनाचा फायदा पुढील काळात मजूर येऊन अनेकांना जमिनीचे पट्टे मिळालेत. या एवढ्या मोठ्या देशव्यापी आंदोलनात नगरापासून तर खेड्यांपर्यंतच्या समता सैनिक दलातील सैनिकांनी फार महत्त्वाची भूमिका बजावूनही आंबेडकरवादी साहित्यामध्ये त्यांचा कुठे फारसा गौरव केलेला वा त्याला म्हणावे तसे स्थान मिळालेले दिसून येत नाही. अर्थातच निःस्वार्थ सेवेने कार्य करणाऱ्यांचा उल्लेख कुठे दिसून येत नसला तरी, आजही या सत्याग्रहात भाग घेणारे व सध्या जीवंत असलेले अनेक कार्यकर्ते, सैनिक वा स्वयंसेवक भरभरून बोलत असतात. समाज त्यांच्याप्रती नेहमीच उपकृत राहील.

आंबेडकरी चळवळ गतिशील केली :

दि. १२, १३, १४ एप्रिल १९६४ रोजी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षातर्फे नागपूर येथे भव्य परिषद भरविण्यात आली. ही परिषद अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष अर्जु. हरिदास बाबू आवळे यांनी आयोजित केलेली होती. ही परिषद यशस्वी करण्यासाठी समता सैनिक दलाने महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते. दि.१३, १४, १५ ऑक्टोबर १९६४ रोजी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षातर्फे नागपूर येथे भव्य धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा आठवा वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आला. या सोहळ्याचे नियोजन, नियंत्रण व संरक्षण करण्याचे कार्य समता सैनिक दलाने पार पाडले होते. १९५७-५८ पासून भारतीय रिपब्लिकन पक्षामध्ये फूट पडलेली असली तरी, १९६६ पर्यंतच्या ९-१० वर्षांत आंबेडकरवादी जनता अत्यंत संघर्षशील असलेली दिसून येते. परंतु १९६४-६५ च्या भूमिहीनांच्या आंदोलनानंतर ही धग कमी कमी होत गेली आणि समता सैनिक दलाचे वर्चस्वही कमी कमी होत गेले.

१९५६ नंतरच्या आंबेडकरोत्तर कालखंडामध्ये आंबेडकरवादी विचार आणि चळवळ जनमाणसांपर्यंत पोहचवून, त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडत, त्यांना संरक्षण देत देत आंबेडकरवादी कार्याची धुरा आपल्या खांद्यावर वाहण्याची फार महत्त्वाची भूमिका समता सैनिक दलाने निभावलेली होती. यात काहींनी तुरुंगवास भोगला; काही शहीद झालेत तर काहींचे संसार उद्ध्वस्त झाले; तरीही न थकता ते आपले कार्य करीतच राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचा लढा लढण्याकरीता आणि पददलितांना त्यांचे निसर्गदत्त अधिकार मिळवून देण्याकरीता 'समता सैनिक दल' या संघर्षशील संघटनेची स्थापना केली होती. दलाने बाबासाहेबांच्या या अपेक्षांना खरे उतरत त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरही आपल्या नेतृत्त्वाखाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर ठाम विश्वास ठेवत, त्यांच्या कार्याचा वसा पुढे नेण्याचे युगकार्य ते करीतच राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर धम्म प्रसाराचे कार्य हे अग्रक्रमाणे घ्यावे लागेल. या कार्यात समता सैनिक दलाने झोकून देत कार्य केले. सुरुवातीला 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' व नंतर 'अखिल भारतीय रिपब्लिकन' नेतृत्त्वांसोबत अनेक ठिकाणी दीक्षा समारोहाचे कार्य घडवून आणले. भारतात बुद्ध धम्माची वाढ करण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशिवाय झालेल्या १९५७ च्या निवडणुकीमध्ये 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन च्या नेत्यांना समता सैनिक दलाशिवाय ही निवडणूक जिंकता आली नसती. या निवडणुकीचा शिस्तबद्ध प्रचार करणे, निवडणुकीचे दिवशी मतदारास मदत करुन मतदानास प्रवृत्त करणे, मतदानाचे वेळी त्यांना मतदान केंद्रापर्यंत सुरक्षितपणे पोहचविणे इत्यादी कार्य समता सैनिक दलाने केले.

भूमिहीनांच्या सत्याग्रहात समता सैनिक दलाने महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आपले कार्य केले. त्यासाठी प्रसंगी तुरुंगवास पत्करला. १९६८ च्या नागपूर येथील हिंदू-मुस्लिम दंगलीचे वेळी समाजाला संरक्षण देत त्यांची आब्रू वाचविली. नामांतराच्या लढ्यात समता सैनिक दलाने मोर्चा, सभा-समेलने घडवून आणत, समाजाला संरक्षण देत देत प्रत्यक्ष रणांगणावर उतरून आंदोलन यशस्वी करण्यात आपले योगदान दिलेले आहे. 'रिडल्स' प्रकरणाचे वेळीसुद्धा मागे न हटता, इतरांना संरक्षण देण्याची आपली भूमिका पार पाडत प्रत्यक्ष मैदानात उतरून आपल्या हक्कांसाठी लढाई दिली. या आंदोलनामध्येही समता सैनिक दलाने आपले योगदान दिलेले आहे. हा लढा यशस्वी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार स्वातंत्र्यासाठी आपली भूमिका ठामपणे बिमावली. अनेक वर्षांपासून रुढीपरंपरांच्या जोखडात असलेल्या खेड्या-पाड्यातील समाजाला जुन्या रुढींतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. नव्यानेच दीक्षा घेतलेल्या व येत असलेल्या समाजाला संरक्षण देण्याचे, त्यांच्यात बुद्ध धम्माचे विचार रुजविण्यात आचरणात आणण्यास मदत करणे

कार्य समता सैनिक दलाने करण्याचा प्रयत्न केला.

निष्कर्ष :

समता सैनिक दलामुळे दलित, शोषित बौद्ध समाजातील तरुणांना समाज सेवेची एक नवी संधी प्राप्त झालेली होती. या संधीचे सोने करीत त्यांनी दलित शोषित-पिडितांना हिंमतगिरी आणि अंधश्रद्धेतून बाहेर काढत आपले कर्तव्य चोख पाडले. दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडणे आणि पिडितांवरील अन्याय दूर करणे, हे दलाचे अंगिकृत कर्तव्य होते, ते त्यांनी अत्यंत जबाबदारीने पार पाडले. समता सैनिक दल हा समाजावर अन्याय-अत्याचार करणाऱ्यांचा कर्दनकाळ होता; तर दलित-शोषित पिडितांचा तारणहार होता.

अशाप्रकारे आंबेडकरोत्तर कालखंडातील दीशाहीन समाजाला दीशा देण्याचे महत्त्वाचे युगकार्य पार पाडण्यात समता सैनिक दलाने अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे असे दिसून येते.

संदर्भग्रंथ :

१. चिमनकर, ॲड. विमलसूर्य (संपा.), 'दी पिपल्स एज्युकेशन सोसायटी भूमिहिन आंदोलन विशेषांक २०१४, समता संगर प्रकाशन, नागपूर, वर्ष २४, आक्टो. २०१४, पृ. २५.

२. वरील, पृ. ३४. (डॉ. अयिनाश फुलझेले यांचा 'भूमिहिनांचा सत्याग्रह' हा लेख.)

३. 'रिपब्लिकन साप्ताहिक,' ता. १७ सप्टेंबर १९५९, वर्ष १ ले, अंक २२, पृ. ८.

४. वरील.

५. चिमनकर, ॲड. विमलसूर्य (संपा.), 'दी पिपल्स एज्युकेशन सोसायटी भूमिहिन आंदोलन विशेषांक २०१४,' पृ. ३५.

६. समता सैनिक दलाचे सैनिक श्री. उद्धवजी कुडवे (पल्लसगांव जाट, जि. चंद्रपूर) यांची मुलाखत दि. ११/४/२०१६

७. चिमनकर, ॲड. विमलसूर्य (संपा.), 'दी पिपल्स एज्युकेशन सोसायटी भूमिहिन आंदोलन विशेषांक २०१४, पृ. ३५ ते ३९.

८. समता सैनिक दलाचे सैनिक श्री. उद्धवजी कुडवे (पल्लसगांव जाट, जि. चंद्रपूर) यांची मुलाखत दि. ११/४/२०१६.

९. हॅंडबील, समता सैनिक दलाचे कार्यालय, उंटखाना, नागपूर, वेथील संग्रह.

१०. मून, वसंत (संपा)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखाण व भाषणे खंड १८ वा भाग २, पृ. २४३,२४४.

११. फोसाडे, एच.एल.-पूर्वोक्त, पृ. ४२६

१२. लोखंडे भाऊ-डॉ. आंबेडकरी सैनिकाची गौरव गाथा, पृ. १३९

१३. वरील, पृ. १३९

१४. वरील, पृ. १४०

१५. लोखंडे भाऊ-डॉ. आंबेडकरी सैनिकाची गौरव गाथा, पृ. १४३

१६. जनता दि. १७ फेब्रुवारी १९३४

१७. कांबळे, वामन (संपा)- दैनिक सम्राट, २० फेब्रुवारी २००७, उधृत गायकवाड, आर. डी. आंबेडकरी चळवळीच्या आठवणी


१८. मून, वसंत (संपा)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखाण व भाषणे खंड १८ चा भाग २ २४४.

ISSN No 2394-5974

संशोधक

वर्ष : ९० मार्च २०२२ पुरस्कणी विशेषांक ०९





इतिहससंशोधक वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-1944

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ९

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला बर्वा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

● प्रा.डॉ.बी.आर.मस्के ● प्रा.डॉ.दिपाली भावे ● प्रा.प्रकुल राजुरवाडे

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाली ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळवणी : अनिल साठये, चावरेन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१ पं. जवाहरलाल नेहरू : स्वातंत्र्योत्तर भारतातील शैक्षणिक धोरणाचे शिल्पकार
– डॉ.सौ.अभिलाषा राऊत, नागपूर ---------- ८

२ भारत देशाच्या कृषी क्षेत्रातील विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान – डॉ.अफरोज शेख, नागपूर १३

३ आधुनिक भारताच्या इतिहासात बाबू हरदास एल. एन. यांचे सामाजिक व राजकीय योगदान
– डॉ.आनंद सूर्यवंशी, नागपूर ---------- १६

४ अर्वाचीन योगसाहित्य: ध्यान विमर्श – डॉ.अरूण पवार, नागपूर ---------- २१

५ स्वातंत्र्य संग्रामातील वीरांगना – मॅडम कामा
– डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे. ---------- २५

६ १९२० ते १९४७ या काळातील स्वातंत्र्यचळवळीतील महिलांचे योगदान कस्तुरबा गांधी व सहकारी महिला – डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे ---------- २९

७ राष्ट्र बांधणीमध्ये स्त्रीया, दलित आणि आदिवासी यांचे योगदान
– डॉ.अशोक शहाणे, उमरेड, जि.नागपूर ---------- ३३

८ आंबेडकरोत्तर भूमिहीन सत्याग्रहात समता सैनिक दलाचे योगदान
– डॉ.बी. आर. मस्के, नागपूर ---------- ३८

९ ई. व्ही. रामास्वामी पेरियार यांच्या कार्याचा भारतीय समाजव्यवस्थेवरील प्रभाव
– डॉ. भास्कर वघाळे, नागपूर ---------- ४२

१० वर्षावास, भिक्षु संघ व दानादि कर्म
– १)डॉ.भीमदेवी डांगे, २) डॉ.स्निग्धा राजेश कांबळे, ब्रह्मपुरी ---------- ४६

११ १९४६ नागपूर येथील सत्याग्रह आणि ॲड. हरिदास बाबू आवळे यांची भूमिका
– डॉ.चंद्रशेखर पाटील, नागपूर ---------- ५२

१२ आधुनिक भारताचे निर्माते महात्मा जोतिराव फुले यांची शेतकरी चळवळ
– डॉ.दत्ता हिंगमिरे, उरण, जि.रायगड . ---------- ५६

१३ राजश्री शाहू महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान – डॉ. देविदास गाडेकर, नागपूर ---------- ६०

१४ महात्मा जोतिराव फुले आणि सामाजिक न्याय - डॉ.धर्मवीर भीरसागर, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर ६३

१५ ज्ञानोदय व ख्रिश्चन मिशनरींचे सामाजिक कार्य – डॉ.दिगंबर सोनवणे, नेवासा, जि.अहमदनगर --- ६७

१६ अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय चळवळीतील कार्य
- डॉ. दिगंबर सोनवणे, नेवासा, जि अहमदनगर ---------- ७०

१७ आधुनिक समाजाच्या जडणघडणीत संत साहित्याचे योगदान - डॉ. डि. ए. पाटील, शिरपूर, जि.धुळे७३

१८ भारतातील स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान
- डॉ.दीपा पाटील, कळंबोली, नवी मुंबई ---------- ७६

१९ प्रखर राष्ट्रवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ.दिपाली भावे, नागपूर ---------- ८०

२० नटसम्राट : जीवनात वाट्याला आलेले वास्तव आणि त्यातील सुख दु:खांचा काव्यात्मक आलेख
- डॉ.जी. एस. क्षीरसागर, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे ---------- ८४

राजश्री शाहु महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान

प्रा. डॉ. तेथिदास ग्यानोजी गाडेकर
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास विभाग)
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

सारांश :

छत्रपती शाहु महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. तसेच समकालीन समस्यांची जाणिव ठेवून लोकोपयोगी, लाभदायक आणि चिरकाल टरणार अशा योजना त्यांनी आपल्या संस्थानांत राबविल्या होत्या त्याचा परिणाम म्हणुन समाजात बंधुभाव, समता, दलित आणि उपेक्षित बांधवाच्या उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदा, कला, क्रिडा व आरोग्य विषयक कार्य केलेले टिसुन येते. या त्यांच्या कार्यामुळे त्यांनी स्वराज्याची ओळख महराष्ट्रपुरतीच नव्हे तर संपूर्ण भारतराला करून दिली. प्रस्तुत संशोधन निबंधात त्यांनी कृषी क्षेत्र समृध्द करण्यासाठी केलेले बहुमुल्य कार्य विशेषत: राधानगरी धरणाची निर्मिती करून कृषी क्षेत्र विकसीत केले.

बिजशब्द : दुष्काळ निवारण, राधानगरी धरण, शाहु महाराज

प्रस्तावना :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले. या स्वराज्याच्या माध्यमातुन शिवाजी महाराजांनी पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता सहयाद्रीच्या शिखर माथ्यावर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. त्यांच्यामते खडक फोडून तळी उभारावीत त्यातील पाणी खर्च होऊ नये म्हणुन कामगाराजवळ हत्यारे तयार असो द्यावी. शिवाजी महाराजांनी रायगडावर सर्वप्रथम दगडात बनविलेले पर्जन्यमापक यंत्र कुशावर्त तलावाजवळ मंदिराच्या मागे बांधून घेतले. कौटिल्यने दोन हजार चारशे वर्षांपूर्वी पर्जन्यमापकाचा उपयोग शेती आणि धरणे बांधण्यासाठी केला. या पर्जन्यमापकाचा उपयोग वर्षाला सरासरी किती पाऊस पडतो हे समजून येते. छत्रपतींचाच वारसा राजश्री शाहु महाराजांनी चालविला हे म्हणणे योग्यच ठरले.

प्रजाहितदक्ष राजा म्हणजे राजश्री शाहु महाराज यांचे कार्य अलौकीक होते म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर, महाराष्ट्र पूरतेच नव्हते तर भारतातही लोकप्रिय झाले. सामाजिक व राजकीय सुधारणेबरोबरच शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी निश्चित अशा स्वरूपाची जलव्यवस्थापनाचे धोरण आखुन दुष्काळ व नैसर्गिक संकटावर मात करता येईल. अशी लोकोपयोगी कार्य त्यांनी केले व लोकांचे जिवनमान कसे उंचावेल याकडे लक्ष दिले. प्रस्तुत शोध निबंधातून छत्रपती शाहु महाराजांच्या जलव्यवस्थापन विषयक विचारांचा व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्देश :

१) छत्रपती शाहु महाराजांचे कृषी विषयक योगदानाचे अध्ययन करणे

२) छत्रपती शाहु महाराजांचा कृषी संबधी जलसिंचन धोरणचा अभ्यास करणे.

३) दुष्काळजन्य परिस्थीतीत छत्रपती शाहुंनी केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

४) छत्रपती शाहु महाराजांच्या शेतीविषयक विविध प्रयोगांची माहिती जाणून घेणे.

राजश्री शाहु महाराजांचे जलव्यवस्थापनाच्या कार्यामुळे पडीक जमिन व कोरडवाहु जमिनीचे बागायतीत शेतीत रूपांतर झाले व शेतकरी समृद्ध बनला. कोल्हापूर संस्थानात सहकार चळवळ व्यापक बनली. गरीबी दूर करण्यासाठी महाराजांनी शेती सशोधन फळबाग, लागवडीचे विविध प्रयोग, भांडवल शेतीविषयक प्रदर्शन, शेतीचे अधुनिकिकरण, जोड उद्योग इत्यादिंवर भर दिला. दुष्काळ व अनिश्चित पर्जन्यवृष्टीमुळे कोल्हापूर संस्थानातील शेती मध्ये अनिश्चितता होती ती दुर करण्यासाठी शेतीला जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांनी जुनीतलाव दुरूस्ती केली व नवनविन तलाव बांधली व जलसिंचन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.

राजश्री छत्रपती शाहु महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सत्तासुत्रे हाती घेऊन राज्यकारभाराला सुरूवात केली. परंतु आज महाराष्ट्रात ज्याप्रमाणे दुष्काळी परिस्थीती निर्माण होते तशी परिस्थीतीत त्या काळात कोल्हापूर संस्थानात होती. १८९६-९७, १८९९-१९००, १९०१-०२, १९०५-०६, १९१८-१९ असे भयंकर स्वरूपाचे दुष्काळ पडले. ही सर्व परिस्थीती शाहु महाराजांनी बघीतली अनुभवली त्यांनी दुष्काळी विभाग स्थापन करून आपुलकतपदी भास्करराव जाधव यांची नेमणूक केली रोजगार पुरविणे. अन्न बालगृहे चालविणे, गुरांसाठी चारा पुरविणे, वृद्धांसाठी

ISSN No. 2394-5990

वृद्धाश्रम चालविणे असे कितीतरी कामे महाराजांनी संस्थानात केलीत. महाराजांनी कमी वयात एवढी भव्य दिव्य काम केलले दिसुन येते. म्हणूनच तर महाराजांना प्रजाहितदक्ष राजा म्हटले जाते.

राजश्री शाहु महाराजांचे दुष्काळ निवारण कार्य :-

भारतातील मान्सुन हा लहरी असल्याने तो कोणत्या प्रदेशात बरसेल हे सांगणे कठीण आहे. १८९६ ते ९७ दरम्यान जेव्हा संपूर्ण भारतात दुष्काळ पडला त्यामध्ये जवळजवळ १०,००००० (दहा लाख) लोक मृत्युमुखी पडले होते. अपवाद कोल्हापूर संस्थानामध्ये एकही मनुष्य मृत्युमुखी पडला नव्हता. याचाच अर्थ असा होतो की, तेथील प्रशासन दुष्काळावर मात करण्यासाठी सक्षम होते. महाराजांनी संस्थानाच्या दुष्काळी भागाचा दौरा करून लोकांच्या अडचणी आणि दुष्काळाची तीव्रता जाणून घेऊन लोकांना मानसिक आधार देवून त्यांचे मनोधैर्य वाढविणे. दुष्काळी विभाग त्यांनी स्थापन करून लोकांना रोजगार पुरविणे, कर्ज देणे, बाजवी किमतीत अन्न, धान्य पुरवणे, गुरांसाठी चारा पुरवणे, छावणीगृह चालविणे, वृद्धासाठी आश्रम चालविणे इत्यादी त्यांनी कामे केली. या सर्व कार्यावरून असे समजते की छत्रपती शाहु महाराजांनी हरीत क्रांतीचा पाया घातला म्हणून त्यांना हरीत क्रांतीचे आद्यजनक ही मानन्यात येते.[६]

नव्या-जुन्या विहिरींची संख्या, छोटे-मोठे तलाव, लहान-मोठे बंधारे यांचा सर्व्हे केला. विहिरी, तलाव, बंधारे यांची दुरुस्ती केली. तलावातील गाळ उपसून साठवण क्षमता वाढवण्याच्या कामाला सुरुवात केली. शेतीला जास्तीही पाणी पुरवठा करता यावा म्हणून पाटबंधाऱ्याच्या आधारे लहान-मोठ्या योजनांची सुरुवात केली. १९५०-५० मध्ये संस्थानातील विहिरींची संख्या ११५०० वरून १९२०-२१ मध्ये १२८०० इतकी झाली. शेतकऱ्यांना कर्जमुक्तता करण्यात येवू लागला. चडगाव, शिरोळ, शहापूर, रुकडी रामवाग यालिकाणी नविन तलाव बांधण्यात आले. १९९५ च्या अहवालावरून असे दिसुन येते की, नदीच्या पाण्यापासून ३९७८३ एकर, विहिरीच्या पाण्यापासून ३९८८५ एकर आणि साठवण तलावाच्या पाण्यापासून ९३२ एकार अशी एकुण ७९८६० जमिन ओलीताखाली आली. याचाच अर्थ शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध करून दिला.[७]

राधानगरी धरण योजना :-

In India child abuse ratio is increases day by day. Child abuse is harm and dangerous to, or neglect of, a child by caretaker, parents and another person. Whether child or Adult. Child abuse in all region, culture, ethnic and in all income groups. Child abuse can be verbal, physical, social, emotional, sexual, neglect. Abuse cause serious injury to the children and some may even result in suicide and death. A problem in that is not beginning to come into light in India.Prostitution, rape, sexual abuse, sexual harassment and worldwide issues of gender violence. There is a very little research done in this area in India and only few books have been published. In the modernization Era child abuse is slowly becoming a more recognized issue and for this reason researcher focus much in the Human Right and Status of Child Abuse in India.

Status of children in India : It is biggest social stigmas in our society is that child abuse. A child can be abused by physically, sexually and mentally. They can be in a different forms of child abuse can be injury, neglect of negligent treatment, blaming, insist exploitation sexual abuse. Child abuse can take place in homes, schools, orphanages, residential care facilities, on the streets, in the work place, in places of detention. Child abuse results in harm to the child's health, survival, development and dignity. 53% of children in India face some form of child sexual abuse. According the National child crime record bureau the cases of rapes and murder of children increase every year. The growing complexity changed social economic conditions have exposed the children to different forms of abuse. But the fact says :

'WHO' says – "child abuse or maltreatment. Constitutes all forms of physical and emotional ill treatment. Sexual abuse, neglect or negligent treatment or commercial or other exploitation, resulting in actual of potential harm to the child's health, survival, development or dignity in the context of a relationship of responsibility trust or power." Child abuse is the violence of human rights. Child an outcome it related familiar, social, psychological and economic factors.

The problem of child abuse and human rights violations is one of the most critical matters on the international human rights agenda. UNICEF says violence can be (1) physical or mental abuse (2)injury neglect or negligent treatment (3)exploitation and sexual abuse.

Such violence can affect the normal development of a child. Child will have psychological impact in mind and might lose the courage to speak. Even inthe social factors dump the fact in the fair of family reputation and other related issues.

What is child abuse ? :- Exploitation and abuse mistreating children in harmful to a child's health, survival, dignity and development.Child abuse is a state of maltreatment

meted out to a person below the age of eighteen. Its globally prominent phenomenon. However in Indian, as in many other countries, there has been no understanding of the extent. The growing complexity and dramatic brought about socio-economic transmission in India. The major role in the valmabulary in children to various and new a form of abuse. Child abuse has serious physical and psycho-social consequences which adversely affect the health and overall well being of a child. The child abuse and human rights violation is one of the most critical matters on the international human rights agenda. Acceptance of child rights as a primary inviolable rights is fairly recent as is the universal understanding it.

A National study on child abuse was undertaken by the ministry of women and child development, Govt. of India in 2005

Attempt to understand the extent of the problem its dymansion as intake :

In addition , it examines two aspects

- Strategies to address the problem of child abuse.
- Identification of areas of further researcher based on the finding of the study.

Objective :

1. Identify the etiology of child abuse and neglect.
2. Outline the treatment and management options child abuse and neglect.
3. Describe the laws and act for improving care coordination and outcomes in children with abuse and neglect.

Hypothesis :

1. Child abuse in many etiology perspect.
2. Laws and act set by state and central govt to eradicate this problem.

Methodology :

Descriptive method are used.

Data Collection :

Secondary sources are used in this present study.

Types of child abuse :

- **Sexual Abuse :** Sexual abuse in in appropriate sexual behavior with a child. It's include finding the child genetic making the child adult in courts, intercourse, insist, rape, exhibitions and sexual exploitation to be considered child abuse, these maltreatment acts have to be committed by a person responsible for the care of a child. This act handle slowly by police and criminal courts.
- **Physical abuse :** Physical abuse can be defined as a situation is a child suffer harm from an injury inflicted by the child's parent or caretaker. It is more visible abuse working children in normally with the parents. If child fail exhibit their feeling.

The world's Health organization (WHO) has defined emotional abuse to include - The failure to provide a developmentally appropriate, supportive environment, including the availability of a primary attachment figure, so that the child can develop a stable and full range of emotional and social competencies commensurate with her or his personal potentials and in the context of the context of the society in which the child dwells. This act must be within control on the person and within the relations act include restriction of movements, patterns of belitting etc.Threating, discriminating. Example of this act restrict the movement of a child. In India rising pressure in school and colleges. We can seen as a emotional abuse.

The children who had undergone emotional abuse are more prone to depression, low esteem, in appropriate behaviour, anxiety, trouble relationship or lack of empathy.

▪ **Neglect :** Neglect is purposeful omission of some or all development mental needs of the child. This include the failure of harmful situation, when physible. Non probable some forms of neglect :

(1) Not providing adequate food or clothing to the child (2) Non providing adequate medical care Rejection and abandonment (3)Failure to provide appropriate schooling (4) Lack of emotional support and love our Indian Society.

In India, as in many other countries there has been no understanding of the extent. Children particularly infants are perhaps the most vulnerable victims of crime. It is tragic facts the children fall greater extend and their parents and their friends then they do as a hands of the children. This type of abuse also classified into physical abuse, emotional moral and social neglect.

▪ **Child abuse In India :** 90% of world's children live in India. According to 2011 census says 440 million people in the country today are age below eighteen years and constitute 42% out of India's total population. This is a enormous condition of children. When children healthy, happy and have educated access to opportunities, they are the country's greater human resource. The National policy for children 1974 declared children to be a 'Supreme National Asset". Our Indian society has a social special affection for sons than for the daughters. Daughters are often neglected.Songive very importance by the family, relations, given preference in everything. Children neglect affect their physical and mental growth and often such children turn very aggressive.

Child abuse and neglect can be defined as – The intentional, non accidental injury, mal-nutrient of children by parents, caretakers, employers or others which may lead to temporary or permanent impairment of their physical, mental, psycho-social development.

Unfortunately ten successive five year plans have not allotted adequate resources to meet the needs of children. The total expend in 2005 to 2006. Total expenses on children in health, education, development and protection together amounted to a near 3.86% 2006-07 4.91%. In this period the share of resources for child protection was abysmally low at 0.03% in 2005-06 and remained the same in 2006-07. Harmful traditional practices which create negative impact in children :

(1) Child marriage (2) Caste system (3) Discrimination against the girl child (4) Child labour (5) Devadasi tradition

Lack of adequate nutrition access to medical and educational facilities are also example rise urban poverty, children on street and child beggers all figures the breakdown of families. This increase the vulnerabilities of children and expose them to situation abuse and exploitation.

According to the report published in 2005 on trafficking in women and children in India.4,4476 children were reported missing in India out of which 11.008 children continued to remain untraced. India, being a major source and destination country for trafficked children from within India and adjoining countries has, by conservative estimates, three to five lakh girl children in commercial sex and organized prostitution.

Major finding :The share of resources for child protection was abysmally low at 0.034% in 2005-06 and remained the same in 2006-07. Five to Twelve years children in such type of abuse !

- **Physical abuse :**

Two out of every three children were physically abused in the country. Out of 69% children in 13 sample states 54.68% were boys. Over 50% children all the country. Most children did not report the matter to anyone. Emotional abuse and Girl child neglect. Every second child reported facing emotional abuse equal percentage of both boys and girls reposted as equal. In 83% of the cases parents were the abusers.

48.8% of girls wished they were boys. The gravity of the situation they demand. Children Assam, Andhra Pradesh, Bihar and Delhi reported the highest incidence of sexual assault. Children on street children at work and children in institutional care reported the highest incidence of sexual assault. 50% of the children did not know their responsibility the integrated protected child scheme drafted but not implimented. Children bill etc.The government, civil society, NGO and community to compliments each others and work together and creating a protective environment. Everyone should be include the movements of the child protection.

- **Status of India's children :**

• The constitution of India a number of provision protection and welfare of the children. It has an empowered the legislation to make special laws. Some of the major policies that have been formulated to ensure child rights and improvement in their status are the National policy for children 1974, National policy on education 1986, National policy on child labour 1987.

• National Nutrition policy 1993

• Report of the committee on prostitution child prostitutes and children to prostitutes and plan of Action to combat Trafficking and commercial sexual exploitation of women and children 1998.

• National health policy 2002.

• National charter for children 2004

• National plae of action for children 2005.

• One hand the girl child born and killed and the other hand boy birth celebrated. The world's highest number of working children in India. In add in this India has the highest number of child abuse.

• Subtle form of violence against children such as :(1) Child marriage, (2) Economic exploitation, (3) Devadasi practices, (4) Tradition of dedicating young girls to gods and goddesses, (5) Genital mutilation in some pass of the country.Physical and psychological punishment take place in the name of discipline in children and are culturally accepted. Children also stand worst affected by HIV/AIDS and communal riots.

• **Child Participation :**

Children in most section is traditionally and conventialy not consulted about matters and decision affect their lifes.

Children's views are mostly not given much importance.(1) In the family and household.(2) The neighbourhood and wider community.(3) In School or in work place.(4) The settings of social and cultural life.

If the speak out normally they became hurt.

Restriction limits children's access to information and to choice and often to the possibility of seeking help outside their immediate circle.

Following Act for the welfare for the children and rights of the children.

- The Indian penal code 1860.
- The pre-natal Diagnostic Techniques Regulation and prevention of misuse Act 1994.
- The Juvenile Justice care and protection of children Act 2000.
- The immoral Traffic (prevention) Act 1956.
- Child labour (Prohibition and Regulation) Act 1986.
- The Prohibition of child marriage act 2006.
- The commissions for the protection of child right act 2005.
- Protection of children against sexual offences act 2012.

Although child abuse is not forgivable India's culture and traditionally keeps women below men. However the situation could be improved appropriate educating children and adult; educating police and strengthening their skills. For the women empowerment and child abuse prevention state and central government, N.G.O., stakeholders, neighbourhood and caretaker and parents, media like contribution for children abuse.

Physicians should lobby for

- Greater availability of drug and alcohol treatment programs.
- More shelters for the homeless.
- More accessible mental health care
- More shelters for abused women and children.

These programme and parenting skills provide the groups and care given availability in the society.

CONCLUSION

It is clear that we as physician cannot hope to solve the problem of child abuse by ourselves. Many things need to happen at international, national, state and community. It's sociologist Robert Wuthnow has noted, every volunteer effort or act of compassion finds its justification not in offering solutions for society's problems but in offering hope both that the great society we envision is possible and that the very act of helping each other gives strength and a common destiny.

Reference

Books

- The Lost Boy – PELZER
- Spilled Milk – K.L. Randis
- The Courage to Meal – Ellen Boss
- Etched in sand – Regina calcatterwa
- Toxic parents – Dr. Susan Forward.
- Mother's who can't love – Dr. Susan Forward
- The deepest well – Nadine Burke Harris.
- The Pale Faced of life – David crow
- Fire shut up in my Bones – Charles.M. Blow

Impact Factor - 8.572 (SJIF)
ISSN - 2278 -9308

FEBRUARY 2022
ISSUE NO. (CCCXXXVI) 886

B.Aadhar

Peer - Reviewed & Refereed Indexed

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL



संपादक
डॉ. जगदीश साबू | डॉ.शिवाजी जागरे | डॉ.श्रीकृष्ण काकडे

This Journal is Indexed In
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) =8.572 Issue NO. 336 (CCCXXXVI)
ISSN : 2278-9308 February, 2022

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

February,2022

ISSUE No- (CCCXXXVI) 336

मराठी साहित्यातील नवजाणिवा

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

प्रा.डॉ. शिवाजी नागरे
प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे
संपादक
मराठी विभाग,
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अकोला.

Aadhar International Publication

INDEX

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	गोपंतकातील स्त्रियांच्या कथालेखनातील नव्या जाणीवा — प्रा.सोनिया सावंत	1
2	उत्तर-आधुनिकता आणि मराठी नाटक — राजरत्न किशनराव बबणे	8
3	मराठी वाङ्मयातील अनुवादित साहित्याचे स्वरूप — डॉ.रामलीला सुदामराव पवार	14
4	जागतिकीकरणाचा प्रभाव व बदलते साहित्यप्रवाह — प्रा. डॉ. गंधारे ए.के	19
5	जागतिकीकरणाचे नव्वोत्तरी साहित्यावरील परिणाम — प्रा. डॉ. अनिल सखाराम मालुळकर	22
6	जागतिकीकरणाचा परिणाम व मराठी साहित्यातील गंभीरता — डॉ.गजानन कोरलेवार	27
7	एकविसाव्या शतकातील मराठी कवितेतील बदलते प्रवाह — डॉ. संदीप रंगनाथ तापसीर	32
8	एकविसाव्या शतकातील मराठी कवितेची स्वरुप वैशिष्ट्ये व दिव्यापुढील आव्हाने — प्रा.डॉ.एच.डी.आकोटकार	36
9	नव्वदोत्तरी आंबेडकरी मराठी कविता आकलन आणि विश्लेषण — प्रा.डॉ.भरत कचरे	39
10	इ.स.१९९० नंतरची महानगरीय मराठी कविता : एक आकलन — प्रा.डॉ.व्यंकटी पावडे	47
11	प्रवीण गुल्हाने यांच्या 'पापणीत माझ्या' या नवकाव्यसंग्रहाचे आकलन — डॉ. भगवान जालमसिंग साबळे	52
12	नवकवितेतील महानगरीय जाणिवा — मोरे पंडित किशनराव	58
13	एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबरी — डॉ. पवन मोडवकर	62
14	ग्रामीण,दलित, स्त्रीवादी व आदिवासी साहित्यातील बदलते जीवनदर्शन — डॉ.गणेश गोपाळराव मालटे	67
15	जगण्याचे सार्थ आकलन मांडणारी नीलकृष्ण देशपांडे यांची कविता : देहदोहा — अभय सुभाष जोशी	70
16	पद्मरेखा धनकर यांच्या कवितेतील ('फक्त सैल झालाय दोर ') स्त्री संवेदनविश्व — डॉ वर्षा शिरीष फाटक	75
17	'कवी शेषराव पिराजी धाडेंची नवी अनुभूती व नव्या जाणिवेची कविता' — डॉ. अशोक रा. इंगळे	81
18	दलित आत्मकथनातील नवजाणिवेचा वेगळा प्रवाह :'वेदनेवरील फुंकर' — डॉ. प्रमोद भीमराव गारोडे	90

© All rights reserved with the authors & publisher

19	आदिवासीकवितेतील बदलते जीवनदर्शन — प्रा.चिंतामण धिंदळे	97
20	मराठी कवितेतील नवजाणिवा — डॉ. प्राजक्ता रामदास शिवे	102
21	१९९० नंतरच्या खानदेशी बालसाहित्यातील मराठी कथा व कविता यांच्या नवजाणिवा — प्रा.श्रीमती पाटील शालिनी सिताराम	110
22	'मेलं नाही अजून आभाळ...' मधील नवजाणिवा — डॉ. मधुकर बैकरे	115
23	स्त्रीवादी कवितेतील नवजाणीवा — प्रो. डॉ. चारुशिला राजेश्वर रुमाले	121
24	मराठी साहित्यातीलआर्षमहाकाव्यांची उपजीव्यता (विशेषतः 21 व्या शतकातील मराठी कादंबरीच्या संदर्भात) — डॉ. जयश्री सकळकळे	126
25	जागतिकीकरणातील गझल — प्रा. डॉ. अनिल भीमराव भगत	129
26	भाषा, समाज व संस्कृती बदलाचे साहित्यातील चित्रण — डॉ. संजय शेजाव	133
27	भाषा समाज व संस्कृती बदलाचे साहित्यातील चित्रण — डॉ. शंकर शिवाजी मुंडे	136
28	जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरी — डॉ. सुधीर बबुवान मोरे	141
29	मराठी कादंबरीतील नवजाणिवांचा आविष्कार — प्रा. डॉ. गणेश लहाने	146
30	शिक्षण सेवकाच्या संघर्षमय जीवनाचा वेध घेणारी कादंबरी : शिक्षणसेवक : कृष्णा डोळसे — प्रा.पुरुषोत्तम एस. निर्मळ	150
31	एसईझेड - कृषिसंस्कृतीच्या उद्ध्वस्ततेचे चित्रण — डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे	155
32	मराठी कादंबरीतील बदलत्या जीवनजाणिवा — प्रा.डॉ.शिवाजी नी. नागरे	159
33	समकालीन मराठी कवितेतील ग्रामीण संवेदन :'मास्तर मातीचे' — डॉ.पद्माकर डिगांबर चानखडे	163
34	नरेंद्र इंगळे यांच्या कादंबरीतील नवजाणिवा — प्रा.डॉ. शिवाजी नागरे / प्रा. विठ्ठल हरिभाऊ सपकाळ	167
35	एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप — प्रा.डॉ.जगताप यु.एस	169
36	२१ वे शतक आणि मराठी ग्रामीण कादंबरी — प्रा. उमेश मुंडे	172
37	मराठी साहित्यातून व्यक्त होणा—या कोरोना साथीच्या नवजाणीवा — डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत	177
38	कोरोनाकालीन मराठी कविता : नव जाणिवाविष्कार — डॉ. भास्कर सुभाष पाटील	183
39	मराठी साहीत्यातील नवता व परिवर्तने — प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी	192
40	महाराष्ट्रातील आदिवासींचे सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक जीवन — प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे	195

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.572 Issue NO, 336 (CCCXXXVI)
ISSN : 2278-9308
February, 2022

जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरी

डॉ. सुधीर बन्नुवान मोरे
सहायक प्राध्यापक (मराठी), वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. संपर्क :९४२२०००६११ sudhirraomore@gmail.com

१) प्रास्ताविक

नव्वदोत्तर काळ हा जागतिकीकरणाचा कालखंड आहे. अर्थव्यवस्थेत झालेल्या मूलगामी बदलांमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडून आलेले आहे. झालेले हे बदल फक्त जगाच्या भौतिक पातळीवरचे नाहीत तर मानवी नातेसंबंध, त्यांचे भावनिकत्व, भाषा, समाजातील मूल्यव्यवस्था इतक्या खोलवर हे बदल झालेले आहेत. हा काळ बाजारकेंद्री आहे. त्यामुळे माणसाचे ग्राहकात रुपांतर झालेले आहे. त्यांच्या माणूसपणापेक्षा त्याचे ग्राहकत्व महत्त्वाचे मानले जात आहे.जागतिकीकरणाच्या सांस्कृतिक आक्रमणाने पूर्वापार चालत आलेले आपले संचित नष्ट केले जात आहे. अमेरिकेचा साम्राज्यवाद, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व, वाढते संगणकीकरण आणि संपर्क माध्यमांचे अतिक्रमण, माहिती-तंत्रज्ञानाचा विस्फोट, धर्मांध ध्रुवीकरण, बहुशतवाद, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती आर्थिक विषमता आणि बेरोजगारी, लोकचळवळींचा होणारा ऱ्हास, इंग्रजीच्या जागतिक भाषा म्हणून झालेला उदय व जगभरातील नष्ट होत असलेल्या बोलीभाषा, पर्यावरणाचा विनाश या साऱ्यांमुळे नव्वदोत्तर कालखंड काळवंडून गेल्याचे दिसते.

२) जागतिकीकरणाचे ग्रामीण जीवनावरील परिणाम

जागतिकीकरण हा विषय संपूर्ण जगाला व्यापून राहिलेला आहे. कोणतेही क्षेत्र यापासून दूर नाही. उदारीकरण भारतात येऊन आता जवळपास पंचवीस तीस वर्ष उलटून गेली आहेत. या काळात जगात अनेक बदल झाले. त्यामुळे त्याचे भारतीय समाजावर सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही स्वरूपाचे परिणाम दिसू लागले. उदारीकरणामुळे देशी-परदेशी खाजगी भांडवल देशात मोठ्या प्रमाणावर वाढत गेले, या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नफा असणाऱ्या क्षेत्रांना महत्त्व आले. यामध्ये उद्योग, प्रसारमाध्यमे, इंटरनेट, माहिती-तंत्रज्ञान सेवा व मनोरंजन या क्षेत्राची भरभराट वाढ झाली आहे. ग्रामीण जीवनावर आशादायक आणि निराशादायक असे संमिश्र परिणाम झाले आहेत.

जागतिकीकरणाचा परिणाम म्हणजे एकत्र कुटुंब पद्धतीला तडे जाऊन त्याची जागा विभक्त कुटुंब पद्धतीने घेतली. त्यामुळे शेतीचे तुकडीकरण होऊन तुकड्या-तुकड्यांमध्ये विभाजित झाली. यामुळे जमीन कसताना अनेक अडचणी येत आहेत. शेती ही यांत्रिकीकरणाने करणे अडचणीचे झाले. शेतीसाठी आवश्यक असणारे बैल शेती कमी असल्यामुळे वर्षभर सांभाळणे शक्य होत नाही. यंत्र येणेही परवडत नाही. त्याचा परिणाम शेतीच्या नियमित कामावर झाला. पूर्वीच्या देशी बी बियाण्याऐवजी हायब्रीड बियाणे, सेंद्रिय खताऐवजी रासायनिक खते वापरली जाऊ लागली, त्यामुळे जमिनीचा पोत ढासळला, मानवी आरोग्यास घातक ठरू लागले, असे अन्नधान्य उत्पादित होऊ लागले. त्यातूनच वेगवेगळे आजार उद्भवत आहेत. आज शेतकऱ्यांच्या जीवनात निसर्गाच्या अनियमिततेमुळे येणारी अनिश्चितता, जीवनात जाणवणारी हरलेपणाची खंत, सततच्या फसवणुकीमुळे निर्माण झाली. देवलाच्या निर्णय प्रक्रियेत विचार न झाल्याने आलेले एकाकीपण, शहरीकरण व तंत्रज्ञानामुळे बदलत्या परिस्थितीशी जुळवून न घेता आल्याचे अपराधीपण या साऱ्यातून आलेले तुटलेपण अशी परिस्थिती आजच्या भारतीय खेड्यातील माणसांची, शेतकऱ्यांची, त्यावर अवलंबून असणाऱ्या छोट्या कारागिरांची झाली आहे. जीवघेणी स्पर्धा जगभर पसरली आहे. या स्पर्धेत वैफल्यग्रस्त बनलेल्या तरुणांनी आत्महत्या करायला सुरुवात केली. भारतात मागच्या आठ-दहा वर्षापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्येची लाट आली आहे. त्या कमी होण्याऐवजी वाढलच आहेत.

जागतिकीकरणानंतर ग्रामीण भागात बेकारी वाढली. रोजगाराच्या संधी कमी झाल्या. जगणे अवघड झाले. शेतीला पर्यायी उद्योगांची जोड हवी होती पण भांडवलाअभावी मिळू शकली नाही. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय

करणाऱ्याचे व्यवसाय हिरावून घेतले गेले. जागतिकीकरणाने समता प्रस्थापित होईल असे तत्त्व सांगितले होते. त्याचा विपरीत परिणाम होऊन सर्व क्षेत्रात विषमता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली व त्यामुळे आर्थिक समता उलट्या दिशेने प्रस्थापित झाली. शेतीतील हे मनुष्यबळ रोजगाराच्या शोधात शहराकडे आले. खेडी ओस पडली व शहरांना मूठ येऊन तिथल्या समस्या तीव्र झाल्या.

शेती आणि शेती संबंधित क्षेत्रात प्रचंड रोजगार उपलब्ध होऊ शकतो हे माहित असून सुद्धा शेतीची हेळसांड करण्यात आली. शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार-अलुतेदार सारे उखडले गेले. या साऱ्यांना विस्थापित झाल्याच्या भावनेने घेरले आहे.

जागतिकीकरणाने गावगाड्यातील राजकारणाचा संबंध थेट गल्लीपासून दिल्लीपर्यंत असल्याने पूर्वी गावागावात असणारे स्नेहाचे, सौहार्दाची नाते संपुष्टात येऊन त्या जागी वैमनस्य, शत्रुत्व निर्माण झाले. एकाच घरात वेगवेगळ्या राष्ट्रीय, प्रादेशिक पक्षासले कार्यकर्ते तयार झाले. या स्पर्धेतून, असूयेतून वाद वाढतच गेल्याने गावातील सामूहिकतेला तडा गेला. राजकीय पुढाऱ्यांनी गावागावात जातीयतेची बेट कमी करण्याऐवजी ती वाढवली. मतासाठी जातीयतेचा, धार्मिकतेचा आधार घेतला गेला. बहुतेक शेतकरी कुठल्या ना कुठल्या पक्षात असल्याने दैनंदिन शेतीच्या कामाला प्राधान्य देण्याऐवजी तो राजकारणाला प्राधान्य देऊ लागला. परिणामतः शेतीकडे दुर्लक्ष झाले. हे सर्व चिंताजनक आहे.

शहरी सोयीसुविधा, मोबाईल, संगणक, केबल, टीव्हीद्वारे प्रसारित होणाऱ्या विविध वाहिन्या सर्व खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले असले तरी आर्थिक सुबत्ता हा जागतिकीकरणातून साध्य होणारा परिणाम सांगितला जातो, तो इथपर्यंत पोहोचला नाही. उलट जागतिकीकरणाने ग्रामीण भागात असणारी कौशल्य संपवली. जागतिकीकरणाने चंगळवादी सुखलोलुपवृत्ती जोपासली. मुख्य धारा हा भांडवलशाही असल्याने बाजारपेठेत नफेखोर मूल्यव्यवस्था वृद्धिंगत झाली, त्यामुळे सगळे नातेसंबंध बाजाराच्या भाषेत मोजली जाऊ लागली. परिणामी विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राजकारण, शासन, शिक्षण आणि आता तर माणसामाणसांतील नाती ही या मूल्यभ्रष्टतेने पोखरले गेले असल्याने लोककल्याणकारी विधायक भूमिका निरर्थक ठरते.

आजचे ग्रामीण भागाचे मूलभूत प्रश्न कायम असताना नवे प्रश्न निर्माण झाले आणि त्यास पुन्हा नव्याने भर टाकण्याचे काम इथली नवी यंत्रणा, व्यवस्था करत आहे. जागतिकीकरणाचा परिणाम ग्रामीण भागावर, त्याच्या गावगाड्यावर अशा प्रकारे झाला.

३) कादंबरीतून दिसणारे ग्रामीण जीवन

नव्वदोत्तर काळात मागील दशकातील लेखकांबरोबरच नवीन विचार घेऊन लिहिणारी, ह्या बदलत्या प्रश्नाला भिडू पाहणारी, त्यांच्या संवेदनशीलतेने विचार करणारी कादंबरीकारांची पिढी निर्माण झाली. यामध्ये रंगनाथ पठारे, राजन गवस, विश्वास पाटील, सदानंद देशमुख, कृष्णात खोत, गणेश आवटे, प्रतिमा इंगोले, रमेश इंगळे-उत्पादकर, बाबाराव मुसळे, रवींद्र शोभणे, प्रवीण दशरथ बांदेकर, भारत काळे, आसाराम लोमटे आदींचा समावेश होतो.

वैदर्भीय बोलीत लेखन करणारे सदानंद देशमुख 'तहान'(१९९८) व 'बारोमास'(२००२) या कादंबऱ्यामधून खेड्यातील बेकारी, अभावग्रस्तता, फसवणूक, दारिद्र्य, पेटू पाहणारे पाणी प्रश्न, भ्रष्ट व्यवस्था, निसर्गाचा लहरीपणा अशा विविध प्रश्नांना थेट भिडताना दिसतात.

राजन गवस यांनी अगोदरच्या दशकात देवदासींच्या प्रश्नावर, त्यांच्या समाजातील स्थानावर 'भंडारभोग', 'चौंडक' या कादंबऱ्यामधून चित्रण केले. नव्वदोत्तर काळातील मुंतागुंत त्यांनी 'च,वळीचा'(२०१४) या कादंबरीमधून मांडली आहे. शेतकरी, त्याचे जगणे, बदलते खेडे, त्यांचे ताण हे सर्व अगदी सूक्ष्मतेने कादंबरीतून येते.

भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ'(२००१) ही कादंबरी कृषिसंस्कृतीचे नेमकेपणाने चित्रण करते. 'नेशाणी हावा अंगठा'(२००५) ही रमेश इंगळे-उत्पादकर यांची उपरोधिक आणि विनोदी शैलीत सिंहासेसी व खेड्यातील योजनाचा बोजवारा कसा उडविला जातो, याचे चित्रण करणारी कादंबरी आहे. प्रतिमा इंगोले यांच्या 'पार्टटाइम' (२००२) या कादंबरीमधून ग्रामीण स्त्रीजीवनाचे विविध पैलू आविष्कृत होतात. स्त्रियांचे शोषण, त्यांचे मानसिक खच्चीकरण, समाजाची मानसिकता या बाबींना त्यांनी केंद्रस्थानी ठेवले आहे.

प्रा.शंकर सखाराम यांची 'एस.ई.झेड'(२००७) ही कादंबरी मेसा प्रकल्पाचा ग्रामीण जीवनावरील परिणामाची आर्थिक,सांस्कृतिक, भावनिक बदलांची नोंद घेणारी आहे. अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा'(२००६) ही कादंबरी केळी उत्पादन व तिच्या प्रश्नावर आधारलेली आहे. शेतकरी दिवस रात्र अपार कष्ट करून शेतमाल पिकवतो,मात्र बाजार व भाव त्याच्या हातात राहत नाही. त्यामुळे मातीमोल भावाने त्यांची विक्री करावी लागते. त्याचे परिणाम कुटुंबाला विविध प्रश्नांच्या मार्याचे भोगावे लागतात. या ठिकाणी त्यांनी समग्र भारतीय शेतकऱ्यांची हतबलता चित्रित केली आहे.

जागतिकीकरणाचा फार मोठा गंभीर परिणाम ग्रामीण भागातील पारंपरिक पद्धतीच्या शेती व्यवसायला व व्यवसायात असलेल्या सामान्य शेतकऱ्यावर झालेला दिसून येतो. पूर्वी पासून चालत आलेली कृषिसंस्कृती व शेतकऱ्यांची या संस्कृतीशी जखडलेली पारंपरिक मानसिकता यामध्ये व्यापारी मुल्यांचा शिरकाव झाला. यातून या पारंपरिक संस्कृतीत बदल होऊ लागले. शेतकऱ्यांची झालेली दैन्यावस्था व पारंपरिक मूल्यव्यवस्थेची पडझड नव्वदोत्तर कादंबरीत चित्रित झालेली आहे. वर्तमानकाळातील गुंतागुंतीच्या अस्वस्थ सामाजिक वास्तवाचे संदर्भ साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करताना कलात्मक मूल्यही हरवले जाणार नाहीत, याचीही दक्षता या काळातील कादंबरीकारांनी घेतल्याचे दिसते. भारतातील पारंपरिक मूल्यव्यवस्था, पाश्चात्त्य विचारसरणी व संस्कृती, जागतिकीकरणातून आलेली व्यापारी मूल्ये, वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक घडामोडींचे पडसाद या काळातील कादंबरीत उमटलेले पाहायला मिळतात.

नव्वदोत्तर काळातील साऱ्या नकारात्मक स्थितीगतीशी ग्रामीण माणूस सामना करतो आहे. तो हा सामना पराभूत मनोवृत्तीनेच करतो आहे. त्याचा अन्वयार्थ, त्याच्या भौवतीचे अवकाश समजून घेत लावावा लागेल. मराठी कादंबरीमधून या वास्तवाचे प्रकटीकरण खोलवरचे झाले आहे.

'बारोमास' या कादंबरीतून सदानंद देशमुख यांनी अत्यंत ज्वलंत असा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय हाताळला आहे. शेतकऱ्याला कोणत्या परिस्थितीत हा निर्णय घ्यावा लागत असेल याची जाणीव या ठिकाणी होते. वाढता उत्पादन खर्च व त्याच्याहीपेक्षा कमी मिळणारा भाव याच्या दुष्टचक्रात शेतकरी सापडला आहे. शेतकरी कष्टाने जे पिकवतो त्याला जर रास्त भाव मिळाला नाही तर त्याचे सगळे गणितच बिघडते. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव या एका मागणीसाठी शेतकऱ्यांनी अनेक आंदोलने केली, अनेकांचे यात बळी ही गेले, पण त्याला दुर्दैवाने व्यवस्थेवर काही एक परिणाम झाला नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्या तर शोषणाच्या केंद्रच बनल्या आहेत. अर्थव्यवस्थेने शेतीचे अवमूल्यन केल्याने इथला शेतकरी कर्जबाजारी झाला. एकनाथचा किनखेडचा भावोजी सावकाराच्या कर्जामुळे फाशी घेतो. 'रावसाहेबाच्या अकाली मरणाला कारणीभूत कोण ? या मनात घोटाळणाऱ्या प्रश्नाला एका आखूड वाक्यात उत्तर मिळायचं .... शेती.'[१] एकनाथच्या मनातील प्रश्नाचे मूळ शेती आहे. शेतीचे गणित बिघडल्यामुळे शेतकरी कैरकैर झाला आहे. याबाबतची कारणमीमांसा 'बारोमास'मध्ये येते ती अशी, 'निव्वळ शेतीवर अवलंबून हा जातीवान शेतकरी नंतर आभाळाच्या लहरीपणामुळे जेरीस आला. खर्चाची तोंडमिळवणी करता करता कर्जबाजारी झाला. बँकेचे कर्ज तुंबले म्हणून त्याला माल्याचं कर्ज काढावं लागलं. हे सगळं आपली कृषिव्यवस्था मोडून पडल्याचं ढळढळीत द्योतक आहे. खरंच शेतकरात बुद्धिमत्ता आहे पण संधी नाही. त्यामुळे त्याला काही अर्थ नाही.'[२] आत्महत्यांची प्रमुख कारणे म्हणजे कर्जाचा असह्य बोजा, वसुलीसाठी तगादा, जमिनीवर कब्जा इत्यादी आहेत. तर कर्जाचा बोजा वाढण्याची कारणे खते-कीटकनाशके यांची वाढती गरज, त्यांचे वाढलेले भाव, यामुळे वाढता शेती खर्च आणि घसरलेले शेतमालाचे भाव, खाजगी कर्जावरील वाढते अवलंबन इत्यादी सांगता येतील.

'वळीचा' या कादंबरीत राजन गवस यांनी सुद्धा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सूचन केले आहे. कोप्पकेरी त्याच्या डायरीतील पानात नोंद करताना लिहितो, "स्वातंत्र्य म्हणजे काय? पंधरा ऑगस्ट सत्तेचाळीस. कुणाला मिळाले स्वातंत्र्य? भारतातल्या शेतकऱ्याला की शेतकऱ्यावर सत्ता गाजवायची इच्छा असणाऱ्यांना? आता याचा निर्णय कोण घेणार? निर्णय सत्ता घेते. राबवते. आडवते. कधीत्यात टाकते. स्वातंत्र्य- स्वातंत्र्य म्हणजे काय? आत्महत्या करण्याचे स्वातंत्र्य. हे सोडून कशाचंच स्वातंत्र्य नसणारे आपण सोक. फक्त आत्महत्येचे स्वातंत्र्य."[३] या भावनेमागे शेतकऱ्यांची आत्महत्या करण्यामागची अगतिकता दिसून येते. देशाला स्वातंत्र्य मिळाले असले तरी

शेतकऱ्यांसाठी पारतंत्र्यच आहे. कुठल्याही गोष्टीचे स्वातंत्र्यत्याला घेता येत नाही, निर्णय घेता येत नाही. या हतबलतेतून आजचा शेतकरी जात आहे. शेतकऱ्यांच्या व गावकऱ्यांच्या ऱ्हासोन्मुख वास्तवाची ही कहाणी आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने देशात परदेशी भांडवल मोठ्या प्रमाणावर आले; मात्र आज देशात रोजगाराविना विकास होताना दिसत आहे. यात देशाची संपत्ती वाढली आहे; परंतु रोजगारनिर्मिती पुरेशा वेगाने होत नाही. त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे. अशीच परिस्थिती राहिली तर दारिद्र्यवाढ, विषमतावाढ इत्यादी दुष्परिणामांना सामोरे जावे लागेल. आज आपण या परिस्थितीला सामोरे जात आहोत.ही बेकारी कुशल-अकुशल या सर्वच क्षेत्रात मोकळी आहे. अशिक्षित जसे बेरोजगार आहेत तसेच शिक्षित, उच्च शिक्षितही आहेत. याचा परिणाम समाजावर होताना दिसतो आहे. ग्रामीण भागात हे परिणाम खूप मोठ्या प्रमाणावर झालेले आहेत.

'बारोमास' या कादंबरीत ग्रामीण वास्तवाच्या अनेक बाजूंनी स्पर्श केला आहे शिक्षणही दारिद्र्य आणि बेकारी यामुळे अगतिं। झालेल्या तरुण पिढीची दिशाहीनता, बाहेरीकरणाच्या संपर्कामुळे निर्माण झालेला वाढता चंगळवाद, याचा या तरुणांवर होणारा परिणाम आदींचे प्रभावी चित्रण येते. या कादंबरीत सुशिक्षित बेकारांची संख्या खूप मोठी आहे. शेतकऱ्यांनी आपली ऐपत नसताना सुद्धा आपल्या मुलांना शिकवले. मुलगा शिकला तर मागचे सारे दुष्टचक्र संपेल, असेही स्वप्न पाहिले; मात्र त्या शिक्षणात काही नव्हतेच हे त्यांच्या उशिरा लक्षात आले. कादंबरीचा नायक एकनाथ तनपुरे एम.ए., बी.एड., त्याचा चुलत भाऊ शेतकी डिप्लोमा घेतलेला, दिनकर दाभाडे हा एम.ए., सेट उत्तीर्ण, दिलीप पवार हेही उच्चशिक्षित तरुण; मात्र या सर्वांना नोकरी कुठेही नाही. जेथे आहे तेथे पैसे भरण्याची त्यांची ऐपत नाही. शिवाय हे तरुण 'ना घर का ना घाट का' अशा स्थितीत सापडलेले आहेत. नोकरी नाही म्हणून शेती करावी म्हटले तर त्या कामाची सवय राहिलेली नाही. शिवाय शेती तोट्यातच राहणारी आहे. हे शिकल्यामुळे घरचे, आजूबाजूचे लोक यांच्याकडे आशेने बघतात. खेडेगावात व्यावसायिक कौशल्य असणारे शिक्षण मिळत नाही. त्यामुळे या परंपरागत शिक्षणातून बेकारीच निर्माण होताना दिसते आहे. एकनाथ उच्चशिक्षण घेऊनही परास्त झाला आहे. शेती असूनही शेतकरी नाही, त्याचबरोबर शिक्षण असूनही नोकरी नाही. घराबाबतही तसेच आहे. घर असून बेघर, बायको असून नसल्यासारखी. एकूणच तो एकाकी असल्याचे चित्र कादंबरीमध्ये अतिशय सूक्ष्मतेने चित्रित करण्यात आले आहे.

'चाळेगत' या कादंबरीत पद्मीण दशरथ बांदेकर यांनी जागतिकीकरणाच्या परिणामातून ग्रामीण जीवन कशा पद्धतीने पुढे येत आहे, याचे यांचे सूक्ष्म चित्रण केले आहे. या कादंबरीतील दीनाय, मंगेश, दिगू कुबल अशी अनेक मुले आहेत जी बेकार आहेत. जागतिकीकरणाने ना त्यांना रोजगार दिला ना नोकरी दिली. 'चाळेगत' मधील नोंद यासंदर्भात खूप महत्त्वाची आहे. ती अशी - 'गावोगावच्या शिक्षण सम्राटांनी नाक्यानाक्यांवर उभारलेल्या उच्च शिक्षणाच्या दुकानांमधून सुशिक्षित बेकारांची लेंढिच्या लोंढे बाहेर पडू लागले होते. पांढरपेशा बनण्याच्या स्वप्नापायी सहाजिकच ते शेती, मच्छिमारी वा कष्टांच्या अन्य पारंपरिक व्यवसायापासून दूर जात होते. त्याऐवजी वाढत्या चंगळवादी बाजारू संस्कृतीत त्यांचा कल कमीत कमी श्रमात झटपट श्रीमंत होण्याकडे वाढत चालला होता. त्यातूनच कळत नकळत केला जाणारा गुन्हेगारी, बेकायदेशीर, अनैतिक मार्गांचा खुलेआम स्वीकार, कुरघोड्यांच्या राजकारणात विविध पक्षांकडून होणारा या युवाशक्तीचा वापर, जगण्याच्या अशा नव्या दलदलीत अनेक जण जाणून-बुजून किंवा काही एका अपरिहार्य नाईलाजाने अडकत चालले होते.' हे आजच्या काळातील तरुणांचे काळवंडलेले चित्र आहे. ग्रामीण जीवन बदलत आहे मात्र हा बदल सकारात्मक नाही. या बदलात खेड्यातील भावी पिढी अंधारात चाचपडताना दिसत आहे. एकूणच ग्रामीण जीवनासाठी हा काळ किती कठीण असेल याची प्रचिती येते.

जागतिकीकरणाने समाजात झटपट श्रीमंत होण्याची लाट आलेली आहे. सर्वजण एका रात्रीत श्रीमंत होण्यासाठी धडपडत आहेत. याचा परिणाम माणसांच्या नैतिकतेत बदल होण्यात झाला आहे. श्रीमंत होण्यासाठी सर्वच मार्ग स्वीकारण्याचे पत्करण्याचे धाडस येथील लोक करताना दिसत आहेत. सरकारी खात्यातील कर्मचारी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करताना दिसत आहेत. यामागे अनेक कारणे यामागे नैतिक कारणे जशी आहेत तशीच सामाजिक कारणेही आहेत. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण भ्रष्टाचारात बरबटले आहेत. प्रत्येकाला मोठे व्हायचे आहे 'बारोमास'मधील बळी मामाला सातबाराचा उतारा कर्जासाठी हवा आहे. त्यासाठी ते रोज हेलपाटे

पारतात; पण तत्काळी कांबळे तो देत नाही. शेवटी तुळशीराम मध्यस्थी करून चहा पाण्यासाठी म्हणून पन्नास रुपये देतो व त्याला यातले काही माहिती नसल्याचे सांगतो. तेव्हा कांबळे तत्काळी आजच्या जमान्याचे तत्वज्ञान सांगतो. ते असे - "असं कसं माईत नसतं? कोणत्या जमान्यात राह्यता तुमी! आता येऊन ते देले. पण तेच आधी देने असते त कशाला एवढे हेलपाटे बसले असते? अन आमची त अशी रीत हाये की आमचा खिसा गरम झाल्या बगर त आम्ही ब्रह्मदेवालाबी सातबाराचा उतारा देत नाई. ऐरीची गोष्ट आलक हाये. पण आता घोंगडं अडकेल हाये ना तुमचं ते तर जरा ध्यानात ठेवा का नाई? कर्ज काढायचं. पैसा ठचलायला मंग आमची बी हात जरा वल्ला भेले त कुठे काय बिघडते, असं म्हणतो. बरोबर हाये नं? आता बँकेवालेबी कोंबडा पार्टी देतल्याबगर बेस मंजूर करत नाईत. आमी का कोंबडा मांगतो? चहापाण्याची सोय झाली बस झालं"[५] या ठिकाणी हे बळीमामा अडकल्यामुळे कर्ज काढत आहेत; पण ही व्यवस्था त्यांना पुन्हा कर्जाच्या खाईत लोटताना दिसते आहे. त्याला पुन्हा पुन्हा नागवसे जात आहे.

सहकारी दूध संघ सुद्धा यातून सुटलेले नाहीत. राजन गवस यांच्या 'ब,बळीचा' या कादंबरीत याचा संदर्भ येतो. 'बसर्गेच्या मावशीचा मुलगा बारावी पास. त्याला दूध संघात नोकरी लावायचीय. पन्नास हजार भरायचे ठरलेत. त्यातले पंचवीस हजार मी भरावेत. फोन आल्या आल्या मला घरदरून घाम फुटला. पंचवीस हजार तेही आठ दिवसात. कुठून आणायचे पैसे?'[५] या कादंबऱ्यांमधील वरील सर्व संदर्भ पाहता हेच दिसून येते की आजूबाजूचे चंगळवादी जीवन पाहून प्रत्येकाला आपणही ते चंगळवादी जीवन अनुभवावे असे वाटते आहे. त्यासाठी तो नैतिकतेचा मार्ग सोडून इतर मार्ग अवलंबताना दिसतो आहे. गावमध्ये सर्व स्तरातील, पेशातील व्यक्ती दिसतात. तहसील, पोलीस, न्यायालय, शिक्षण आदी खात्यातील नोकरदार यांचा समावेश होतो. शिवाय मध्यमवर्ग सोडून उच्च मध्यमवर्गात आपला समावेश व्हावा यासाठी धडपडताना दिसत आहेत. या सगळ्यासाठी लागणारा पैसा म्हणून त्याचा महिन्याचा पगार पुरेसा ठरत नाही. त्यामुळे ते दुसरा मार्ग म्हणून भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबताना दिसतात. वरवर पाहता हा मुद्दा नैतिकतेचा असला तरी याच्या मुळाशी जागतिकीकरण आहे.

समारोप

भारताने नवी अर्थव्यवस्था स्वीकारली. नव्या अर्थव्यवस्थेच्या ओझ्याखाली इथला शेतकरी भरडून निघाला. जागतिकीकरण, बेरोजगारी, शिक्षणाचे बाजारीकरण, कर्जाचा ताण्याने असह्य झालेले शेतकरी आणि त्यातून त्यांच्या आत्महत्या व याचा परिणाम म्हणजे ढासळणारे ग्रामजीवन. या ढासळणाऱ्या ग्रामजीवनाचे चित्रण ग्रामीण साहित्याने प्रामुख्याने केले त्याचे स्वरूप या ठिकाणी स्पष्ट होते. ग्रामीण संस्कृतीच्या बदलत्या वास्तवाचे आणि त्या बदलत्या चांगल्या वाईट परिणामांचे प्रत्यक्ष स्वरूप ग्रामीण साहित्यातून आपल्यासमोर येते.

संदर्भ

१) सदानंद देशमुख, बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, च.आ., २०१२, पृ.२१४.


२) तत्रैव, पृ.२१४.

३) राजन गवस, ब,बळीचा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ. २९८-२९९.

४) प्रवीण दशरथ बांदेकर, काळेगत, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००९, पृ.४१.

५) सदानंद देशमुख, उनि, पृ.७३.

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318



पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, पुरुलंबी

ता. पुरुलंबी जि. औरंगाबाद. (महाराष्ट्र)

मराठी विभाग आयोजित,

(श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष, संत ज्ञानेश्वर माऊली यांचे ७२५ वे संजीवन समाधी वर्ष व श्री चक्रधर स्वामी यांच्या अष्ट जन्मशताब्दी वर्षानिमित्त)

❖ विशेषांक ❖

सद्य:स्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता

दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

(२५ व २६ मार्च २०२२)

(या विशेषांकातील लेखांचे अथवा चर्चापत्रांचे मतप्रदर्शन संपादक मंडळाच्या सहमतीस असेलच असे नाही. याची सर्वस्वी नोंद घ्यावी.)

HP Harshwardhan Publication Pvt. Ltd.
All Types Educational & Reference Books Publishers & Distributors

26) संत साहित्यातील सामाजिकता आणि समकालीन प्रासंगिकता : 'पसायदान' : एक तत्वचिंतन
अभिनाश सुमंत खाजगी, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, पुर्णा ||105

27) पसायदान : एक तत्वचिंतन
प्रा. डॉ. रामेश्वर गवळीकर, जि. औरंगाबाद ||107

28) पसायदान : एक वैश्विक प्रार्थना
प्रा. ज्ञानेश्वर सुरकसे, नागपूर ||109

29) पसायदान . सुखी जीवनाचे तत्त्वज्ञान
अंगद श्रीपती घुरे, लातूर ||112

30) संत तुकाराम महाराजांचे साहित्य आणि विज्ञान
प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी, कळंब ||115

31) संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिकता
प्रा. डॉ. कल्याण गोपनर, परभणी ||119

32) संत तुकारामांचा समाजविचार
प्रा. मल्हारी पवार, शिवळे ||121

33) संत तुकारामांच्या अभंगवाणीतील रोजकरी
प्रा. डॉ. विजय रेवले, सोलापूर ||125

34) संत तुकारामांच्या गाथ्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन
प्रा. सिमता सुभाष खंदारे, औरंगाबाद ||126

35) तुकाराम : एक थोर द्रष्टा संत
प्रा. प्रमोद म. इंगोले, जि.हिंगोली ||129

36) संत तुकाराम यांच्या विचारांची प्रासंगिकता
डॉ. कैलास इंगळे, जि. औरंगाबाद ||132

37) समानविचार परिवर्तनात संत तुकारामांची भूमिका
डॉ. सौ. विजया खाबडकर, जि.नांदेड ||134

38) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून अभिव्यक्त झालेले कर्मकांड
डॉ. शिवाजी पिराजी जगतवाड, जि. जालना ||136

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

पसायदान : एक वैश्विक प्रार्थना

प्रा. ईश्वरेश्वर सुरवसे
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

प्रास्ताविक :

महाराष्ट्रातील सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनात संत ज्ञानेश्वरांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. त्यांच्या कारकीर्दीचा कालखंड हा तेराव्या शतक आहे, तेव्हापासून ते आज एकविसाव्या शतकातही त्यांचे वाङ्मय, जीवनचरित्र व कार्य मराठी माणसाच्या मनाला साद घालताना दिसते. गेल्या कित्येक शतकांपासून त्यांच्या वाङ्मयाने पिढ्यानपिढ्यांच्या मनोधारणी संस्कार घडवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या वाङ्मयाचे मोल मराठी साहित्यात महत्त्वाचे आहे. त्यांच्या वाङ्मयाविषयी सांप्रदायिक, भक्त, भाविक आणि साहित्याचे अभ्यासक या सर्वांच्या दृष्टीने आदराचे आणि जिव्हाळ्याचे स्थान आहे. प्रचीन मराठी वाङ्मयाचा इतिहासात संत ज्ञानेश्वरांच्या साहित्य अभ्यासास फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'चांगदेवपासष्टी व अभंग असे विविध स्वरूपी लेखन संत ज्ञानेश्वरांनी केलेले आहे. त्यांनी केलेल्या या साहित्यरचनेत 'लोकसंवादमयता' हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ 'श्रोतृसंवाद' आहे. अमृतानुभव हा ग्रंथ 'आत्मसंवाद' आहे. 'चांगदेवपासष्टी' हा ग्रंथ 'मित्रसंवाद' आहे. शिवाय संत ज्ञानेश्वरांची अभंग, गौळणी व भारुडे ही स्फुट रचना 'लोकसंवादमय' आहे. असे संवाददर्शन संत ज्ञानेश्वरांच्या सर्व लेखनातून प्रकटते. समाजातील सर्व स्तरातील लोकांना विचारात घेऊन संत ज्ञानेश्वरांनी साहित्याची निर्मिती केली आहे. त्यांच्या या सर्व लेखनातील 'पसायदान' हे एक अनमोल असा लेखन आविष्कार आहे. पसायदानात संत ज्ञानेश्वरांनी मांगल्याचे व विश्व कल्याणाचे स्वप्न पाहिले आहे. सर्वांनी आनंदी असावे, सुखी असावे. ज्याला ज्याची इच्छा व अपेक्षा असेल ते त्याला प्राप्त व्हावे. ही मागणी केली आहे. म्हणून संत ज्ञानेश्वरांचा 'विश्वमाउली' हा गौरव करणे सार्थ ठरते.

पसायदानाचे स्वरूप :

संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'भावार्थदीपिका' अर्थात 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात पसायदान लिहिले आहे. ज्ञानेश्वरीतील अठराव्या अध्यायात अखेरच्या भागात ते अंतर्भूत आहे. या अध्यायातील ओवी क्रमांक १७६३ ते १८०१ या नऊ ओव्या म्हणजेच पसायदान होय. 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाचा व या ग्रंथातील अठराव्या अध्यायाचा समारोप पसायदान या महान व मंगल प्रार्थनेने झालेला आहे. म्हणून पसायदान ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा अविभाज्य भाग मानला जातो. 'पसायदान' ही एक प्रार्थना आहे. या प्रार्थनेतून संत ज्ञानेश्वरांनी समस्त जगाच्या कल्याणासाठी विश्वात्मक देवाजवळ मागणे मागितले आहे. या मागण्यात समस्त मानव समाजाचे कल्याण सामावलेली आहे. 'पसायदान' या शब्दातील 'पसाय' म्हणजे 'प्रसाद' आणि 'दान' म्हणजे 'देणे' अशी मागणी असलेली प्रार्थना म्हणजेच पसायदान होय. पसायदानाची पोटकथा थोडकयात थोडसी सांगावयाची झाल्यास 'पसायदान म्हणजे ज्ञानेश्वरीसारख्या परमपवित्र अशा महाकाव्यरूपी ग्रंथाचा फळश्रुती आहे.' पसायदानात केवळ नऊ ओव्या आहेतय परंतु या नऊ ओव्या म्हणजे एखाद्या स्वतंत्र ग्रंथ लेखनाच्या तोडीच्या आहेत. संत साहित्यात संत निवृत्तीनाथ, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर यांचे हरिपाठाचे अभंग प्रसिद्ध आहेत. यांना 'पंचरत्न हरिपाठ' असे म्हटले जातेय पण 'हरिपाठ' म्हटलं की संत ज्ञानेश्वरांचाच. हे समीकरण रूढ आहे. त्याचप्रमाणे पसायदान म्हटलं की ते संत ज्ञानेश्वरांचेच हाही एक प्रवाद पडलेला दिसतो. संत ज्ञानेश्वरांशिवाय संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ या काही अन्य संतांच्या लेखनातून पसायदानाप्रमाणे मागणीपर भाव व्यक्त झाला आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर संत नामदेवांचे देता येईल,

आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माहिया सकळा हरीच्या दासा ।
कल्पनेची बाधा न हो कवेणे काळी। ही संतमंडळी सुखी असो ।।

किंवा

संत तुकारामांनी खालील अभंगात विठ्ठलाकडे मागणे मागितले आहे.

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।
गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्वजोडी।।

संत ज्ञानेश्वरांचे पसायदान महत्त्वाचे आहे. ते सर्वपरिचित आणि जवळपास सर्वांना मुखोद्गतगत असणारे आहे.

आता विश्वात्मके देवें । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।।

या ओवीने पसायदानाचा प्रारंभ झालेला आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपले गुरु श्रीनिवृत्तीनाथ यांना 'विश्वात्मक गुरु' असे संबोधले आहे. या श्रीगुरु निवृत्तीनाथांकडे अतिशय विनम्रतेने हे पसायदानरुपी मागणे संत ज्ञानेश्वरांनी मागितले आहे. भूतलावरील सर्व प्राणिमात्रांच्या सुखाची व कल्याणाची मागणी या प्रार्थनेत अंतर्भूत आहे. म्हणून 'पसायदान' ही जगातील अलौकिक आणि सर्वश्रेष्ठ अशी प्रार्थना आहे. पसायदान या विषयावर अनेक जाणकार अभ्यासकांनी आजवर लेखन केलेले आहे. त्यापैकी डॉ. मा.देशमुख एक आहेत. पसायदानाविषयी त्यांचा पुढील अभिप्राय महत्त्वाचा आहेच ही प्रार्थना जनसामान्यांच्या उत्थानासाठी आणि ऐहिक व पारमार्थिक सुखासाठी गायिली गेली आहे. मानवजातीच्या आणि मानवसमाजाच्या चिरकालीन कल्याणाचे पसायदानात ज्ञानदेवांनी कथिले आहे. विश्वातील मानवजातीची सर्व दुःख नष्ट होऊन त्यांना शाश्वत सुखाचे अधिकारी बनवण्यासाठी मागितलेले हे 'मागणे' आहे. साधकाची अवस्था त्याचा समाजावर होणारा मूलगामी संस्कार आणि परिणाम संतांची विश्वात्मक आणि गुरुचे वात्सल्य अशा अनेक विचारबिंदूंतून मानवी कल्याणाचा मंत्र ज्ञानदेवांनी सांगितला आहे. डॉ. मा. देशमुख यांच्या मतावरून पसायदानाची थोरवी लक्षात येते.

संत ज्ञानेश्वरांच्या ठाई निःस्वार्थ व विश्वकल्याणाचा भाव होता. त्याची जाणीव पसायदानातून होते. यात संत ज्ञानेश्वर स्वतःसाठी काही मागत नाहीत. दुसऱ्यांचा दुटप्पणा, खलपणा नाहीसा होऊन, त्यांने सत्कार्याला लागून चांगल्या मार्गाने चालावे, 'स्वधर्म'आपल्या कामावर निष्ठा ठेवावी. सर्व प्राणिमात्रांच्या इच्छा, आकांक्षा व मनोकामना पूर्ण व्हाव्यात, अशी प्रार्थना विश्वास वैराजवळ त्यांनी केली आहे. त्याचबरोबर माणसातील दुष्ट, दुर्जन व राक्षसीवृत्ती कमी व्हावी, जगात सुख—शांती, समाधान व सौजन्य नांदावे ही ज्ञानेश्वरांची पसायदानामागे भूमिका आहे. माणसामाणसांत संत व सात्विक वृत्तीची वाढ व्हावी. ही आंतरिक तळमळ संत ज्ञानेश्वर पसायदानात व्यक्त करतात. या दृष्टिकोनातून पसायदानातील पुढील ओवी महत्त्वाची आहे.

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे पडो । मैत्र जीवांचे।।

संत ज्ञानेश्वरांचे पसायदान अलौकिक आहे. त्याला वैश्विक विचारांची उंची प्राप्त झालेली आहे. ते अवघ्या विश्वाचे कल्याणकारी व शांतीचे प्रतीक ठरावे एवढे मूल्य त्याला लाभलेले आहे. वर्तमान काळात अविश्वास, वैरभाव वाढीस लागताना दिसत आहे. माणसामाणसातील अविश्वासाची दरी वाढताना दिसत आहे. जाती जातीतील, धर्मा धर्मातील तटबंदी अधिक मजबूत होताना दिसत आहेत. एवढेच नाही तर जगातील राष्ट्रराष्ट्रात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. जागतिक महासत्ता होण्यासाठी राष्ट्रा राष्ट्रात स्पर्धा चालली आहे. अशा काळखंडास जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानात निश्चितच आहे.

उद्याचा आदर्श समाज घडण्यासाठीच ज्ञानेश्वरांनी पसायदान लिहिलेले आहे. संत ज्ञानेश्वर पसायदानातील प्रत्येक शब्द शब्दात विश्वाच्या कल्याणाची मागणी करतात. पसायदानातून निरनिराळ्या मागण्या ज्ञानेश्वरांनी केलेल्या आहेत. या मागण्या म्हणजेच त्यांचा आदर्श मानव समाज घडवण्यासाठीचा जाहीरनामा आहे. पसायदानातील मागण्यासंदर्भात पसायदानाचे अभ्यासक दीपक निलकंठ विचे अभिप्राय देतात'य सर्वांनाच सुख, शांती व समाधान लाभावे, स्वार्थाचा मनातील

वासनेचा व विकार नाश पावावा, अशी मागणी मागितली आहे. त्रैलोक्यातील सर्व प्राणिमात्र सुखाने व आनंदाने नांदावेत, असे वरदान त्या विश्वात्मक देवाकडे मागितले आहे. जगाच्या इतिहासात असे कल्याण मागणारे संत ज्ञानेश्वर हे पहिले भारतीय कल्याणकारी संत आहेत. माणसातील दुष्टपणा, वाकडेपणा व खलवृत्ती नाहीशी व्हावी ही गोष्ट संत ज्ञानेश्वरांना महत्त्वाची वाटते. दुष्ट, दुर्जन माणूस समूळ नष्ट न होता फक्त त्यातील दुर्गुण नाहीसे झाले पाहिजेत. त्यासाठी सत्कार्याची आवड निर्माण झाली पाहिजे. माणसामाणसातील वैरभाव कमी होऊन त्यांच्यात मैत्रभाव वाढीस लागला पाहिजे, असे संत ज्ञानेश्वरांना वाटते. म्हणून संत ज्ञानेश्वर 'भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे' अशी मागणी करतात. नंतर 'दुरितांचे तिमिर जावो' ही मागणी करतात.

माणसाने विवेकबुद्धीचा वापर करून इंद्रियांना विषय विकारांपासून दूर ठेवले पाहिजे. त्यासाठी साधू संतांची संगती लाभली पाहिजे. त्यामुळे सामान्य माणसाचे अज्ञान दूर होईल. संतांच्या संगतीत त्यांच्यावर सांगल्याचा वर्षाव होईल. असे संत ज्ञानेश्वरांना महत्त्वाचे वाटतात, अशा संतांना ते वंदाची उपमा देतात. तद्य.

चंद्रमे जे अलांछन । मार्तण्ड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

चंद्र ज्याप्रमाणे आल्हाददायक व शीतल प्रकाश सर्वांना देतो त्याप्रमाणे संतांच्या सहवासाने सामान्य माणसांना शांतता, सुख व समाधान मिळते. निसर्गसृष्टीतील ज्या ज्या ठिकाणी मानवप्राणी आहे, त्या प्रत्येकाचे कल्याण व्हावे हे भव्य—दिव्य स्वप्न संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात रेखाटले आहे. सकल प्राणिसृष्टीच्या कल्याणासाठी शांतीसाठी व त्याच्या आध्यात्मिक भरभराटीसाठी संत ज्ञानेश्वरांनी हे पसायदान लिहिले आहे. म्हणून पसायदान ही सुंदर आणि आशयसंपन्न अशी प्रार्थना आहे.

समारोप :

आसाराम लोमटे यांच्या भाषाशैलीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या भाषेतून येणारी चित्रमयता. लोमटे कथेतील प्रसंग आपल्यासमोर प्रत्यक्ष उभा करतात. उदाहरणार्थ, 'चिरेबंद' या कथेतील पुढील वर्णन. 'समोरून एक भली मोठी दांडगी बाई येताना दिसली. आजवर इतकी दांडगी बाई मी पाहिली नव्हती, वय बरंच, कपाळ पांढरं फटफटीत म्हणजे विधवा असावी. आता उतारवयाकडे लागलेली; पण चालण्यातला जोम भलताच. तिने आजीला पाहिलं अन् थांबली. आजीही थबकली. घसा खाकरून ती बाई मोठ्याने थुंकली. पायातल्या चपलेनं जमीन रगडली अन् काहीतरी वाईटसाईट बोलून निघून गेली'[६] या ठिकाणी हा प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष उभा राहतो. ही ताकद आसाराम लोमटे यांच्या भाषेत आहे, हे जाणवते.

प्रतिमासृष्टी

'आलोक'मधील प्रतिमासृष्टी हा एक स्वतंत्र निबंधाचा विषय होऊ शकतो, इतक्या विपुल प्रतिमा या कथासंग्रहात आलेल्या दिसून येतात. प्रतिमा म्हणजे चित्र, मूर्ती किंवा प्रतिबिंब होय. आपण जेव्हा एखादी वस्तू पाहतो तेव्हा

Scanned by CamScanner

आपल्याला त्याचे इंद्रीयगोचर स्वरूप जाणवते; परंतु ती वस्तू डोळ्यांसमोर नसताना आपण तिच्या रंगरूपाचे चित्र मनःचक्षुसमोर आणू शकतो. आपल्या मनःचक्षुसमोर येणाऱ्या या चित्राला मनोविज्ञानामध्ये प्रतिमा म्हणतात. विसदृश्य कल्पनांचा संयोग घडवून आणणे, भावनिक व्यामिश्रतेची यथार्थ अभिव्यक्ती करणे ही प्रतिमांची वैशिष्ट्ये ठरतात. या अनुषंगाने आसाराम लोमटे यांनी प्रतिमासृष्टी या ठिकाणी निर्माण केलेली आहे, ती अतिशय महत्त्वाची आहे. ही प्रतिमासृष्टी इंद्रियसंवेदनात्मक अनुभूतीची प्रतिती कशी देते यासाठी काही उदाहरणे आपल्या समोर ठेवतो.

'चिरेबंद' या कथेतील पुढील उदाहरण -

- पाऊस सारखा छपराची माती गळत असल्यासारखा भुरुभुरु गळतोय. (पृ.१०)
- कंदिलाची वात आळोखे पिळोखे देत जळते आहे. (पृ.१२)
- कुणीतरी ढकलून दिल्यागत मी दरवाजाबाहेर पाऊल टाकलं आणि पांढरा नंदी पाठीमागं लागल्यासारखा वेगानं पायऱ्या उतरत खाली आलो. (पृ.३१)

या शब्दांत कथा संपते. या ठिकाणी आलेली पांढऱ्या नंदीची प्रतिमा ही अघोरी संपत्तीचे सूचन करते.

'ओझं' या कथेतील

- गाडी ओढणाऱ्या बैलानं शिवळा-जोत्यातून मान काढून भर रस्त्यात गाडी सोडून जावं तसं तुझं निघून जाणं झालं. (पृ. ३३)
- तू गेलास आणि वहिनीच्या उभ्या जन्माचा उन्हाळा केलास. (पृ. ३३)

'खुंदळण' या कथेतील

- अश्या टिचऱ्या गोट्या आमच्या डावात नगं. (पृ. ५७)

या ठिकाणी दत्तारावचा मुलगा संजू बाहेर मुलांमध्ये खेळत असताना लिंबाजीचा मुलगा संतु आमच्या बरोबर खेळू नको हे सांगत असताना वरील विधान करतो. 'टिचरी गोटी' ही जी प्रतिमा आहे ती या ठिकाणी दत्तारावचे प्रस्थापित पक्षातील पक्षांतर करण्याच्या निर्णयावर केलेले हे भाष्य आहे. कार्यकर्त्याचे टिचलेपण त्यातून उठावदारपणे येते.

- आता कात टाकल्यावनी लागा बरं कामाला अन् इकडे तिकडे हिंडताना, गावात फिरताना आमच्यासंग राहत जा बर. असं पान्हा चोरनं बस झालं आता. (पृ. ५९)

या ठिकाणी दत्तारावं जरी प्रस्थापित पक्षात गेले असले तरी त्या ठिकाणी त्यांना

Scanned by CamScanner

काम करत असताना म्हणावे तितके सहजपण आलेलं नाही. या ठिकाणी जी प्रतिमा निर्माण केली आहे ती जनावर दूध देत असताना ज्या पद्धतीने नवीन पाणूस त्या ठिकाणी आला तर ते पान्हा आटवते किंवा चोरते. या ठिकाणीही अशान पद्धतीचे वर्णन करून दत्ताबाची मानसिकता स्पष्ट होते. वरील सर्व प्रतिमांमधून इंद्रियसंवेदनात्मक अनुभूतीची प्रतिती येते.

सूचकता

आसाराम लोमटे त्यांच्या कथांमध्ये अनेकदा आशयाच्या अनुषंगाने सूचकता दाखवतात आणि ही सूचकता प्रसंगानुरूप त्या ठिकाणी वाचकांना विचार करायला लावते.

'चिरेबंद' या कथेतील प्रसाद हा आपल्या मूळगावी गेलेला असताना शेतात जातो. त्यावेळी रस्त्यात भेटलेल्या एक व्यक्तीला गाडी ओळख करून देताना, 'हे पंतांचे नातू' अशी ओळख करून देतो. त्यावेळी ती व्यक्ती प्रसादकडे पाहून म्हणते, 'कशाला येतोस बाबा इकडं नुसता फुपाटाय... सगळ्या आयुष्याची पायपोळ व्हायची. जमिनीची तहान पंतालाही होती; पण जिवापेक्षा भारी असून काय कामाची ? त्यात पुन्हा तुमच्या जमिनी तशा. काटकिंजाळ केकताडात कशाला घालायचा हात ?'[७]

या ठिकाणी पंतांची जमिनीची हाव किंवा भूक सूचित होते. त्याचबरोबर पंताचा मृत्यू सुद्धा या जमिनीच्या वादातून झाल्याचे सूचन करते आणि भविष्यातही या जमिनीची अपेक्षा ठेवणे म्हणजे स्वतःचे मरण ओढवून घेण्यासारखं आहे, अशा पद्धतीचं सूचन या ठिकाणी होताना दिसते. या ठिकाणी जी प्रतिमा निर्माण केली आहे ती महत्त्वाची आहे, 'काटकिंजाळ केकताडात' ही जी प्रतिमा आहे याठिकाणी केकताडात मोठ्या प्रमाणावर साप वास्तव्याला असतात हे सूचन या ठिकाणी महत्त्वाचे होते

असेच आणखी एक 'चिरेबंद' मधील उदा. प्रसाद हा शेतातील गड्यांशी चर्चा करत असताना वादातील जमिनी ताब्यात घेण्यासंदर्भात व त्या नांगरण्याबाबत बोलतो. त्यावेळी तो गडी म्हणतो, 'मालक आता ह्या जमिनीमध्ये औत घालायचं म्हणजे जरूळातच हात घातल्यावानी हाय.'[८] या ठिकाणी हे सूचन आपल्याला लक्षात येते.

निवेदनशैली

आसाराम लोमटे यांच्या कथेतील निवेदनशैलीचा विचारही महत्त्वाचा

Scanned by CamScanner

ठरतो. कादंबरीप्रमाणे कथेतल्या निवेदकाला निवेदनातून वातावरण निर्मिती करण्यासाठी मोठा अवकाश उपलब्ध नसतो, कमी अवकाशात त्याला वातावरण निर्मिती करावयाची असते. इथे पात्रहाताळीकतेला जास्त वाव नसतो, त्यामुळे निवेदनशैली महत्त्वाची ठरते आणि त्या अनुषंगाने आसाराम लोमटे यांच्या कथेतील निवेदनशैली ही अतिशय प्रभावी परिणामकारक ठरताना दिसते.

समारोप

एकूणच आसाराम लोमटे वेगळ्या वाटेने जाऊन माणसांच्या मनाचा तळ गाठण्याचा प्रयत्न करतात आणि तो गाठता गाठता वाचकाच्या मनाचा तळ हलवून टाकतात. माणसांच्या जगण्याविषयी, नातेसंबंधांविषयी, त्यांच्या संघर्षाविषयी कमालीच्या आस्थेनं आणि आत्मियतेनं ते लिहिताना दिसतात. त्यांच्या कथा ह्या माणसाच्या अंत:करणापर्यंत जाऊन संवेदनशील वाचकाच्या मनात काही प्रश्न उपस्थित करतात, त्यांना अस्वस्थ करतात. ते आपल्या लेखनामागील भूमिका विशद करताना म्हणतात, 'बाजारात भलेही 'स्वास्थ्यकारक' जगण्याची उत्पादने भरमसाठ असतील; पण लेखकाने मात्र 'स्वास्थ्यहारक'च लिहावे. वाचून प्रश्न पडावा, झोप उडावी, अगणित भुंग्यांचे मोहोळ उठावे आणि त्याने वाचणारालाही दंश करावा असे लिहिण्यासाठी मी धडपडतो आहे.' अशा पद्धतीने भवतालात जाणवणाऱ्या वास्तवाला कवेत घेऊन त्याला कथात्मक रूप देऊन वाचकांना अस्वस्थतेचा अनुभव आसाराम लोमटे त्यांच्या कथांच्या माध्यमातून देतात.

संदर्भ

१) आसाराम लोमटे, आलोक, शब्द पब्लिकेशन, चौथी आवृत्ती, डिसेंबर २०१७, पृ. ५५.
२) तत्रैव, पृ. ७७, ७८.
३) तत्रैव, पृ. १५३.
४) मुक्त शब्द, जानेवारी २०१७, पृ. १२.
५) तत्रैव, पृ. १३.
६) आसाराम लोमटे, उनि, पृ. ११.
७) तत्रैव, पृ. ११.
८) तत्रैव, पृ. ३२.

Scanned by CamScanner

१) मुक्त शब्द, मार्च २०१७, पृ. ६१.

- डॉ. सुधीर बाबुराव सावंत,
सहायक प्राध्यापक (मराठी),
यशवंतराव चव्हाण शासकीय कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर
मोबा. : ९४२२०००६२२

★ ★ ★

फॉर्म ४ (नियम ८) अन्वये निवेदन

१. प्रकाशनाचे नाव : भाव अनुबंध
२. प्रकाशनाचे स्थळ : गुलबर्गा (कर्नाटक)
३. प्रकाशनाचा काळ : त्रैमासिक
४. प्रकाशनाची भाषा : मराठी
५. संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
६. नागरिकत्व : भारतीय
७. मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता :
श्री. भीमसेनराव माड्याळकर, अध्यक्ष
मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा ५८५१०२. (कर्नाटक)
८. नागरिकत्व : भारतीय
९. मुद्रणस्थळ : साई समर्थ प्रिंटर्स
दुकान क्र. ४ विठ्ठल हाईटस्, हिंगणे (खुर्द), पुणे ५१.
१०. मालकाचे नाव व पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा ५८५१०२. (कर्नाटक)

मी, सर्वोत्तम सताळकर जाहीर करतो, की वरील सर्व तपशील माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

गुलबर्गा
दि. २८-२-२०२२

सही/-
सर्वोत्तम सताळकर

Scanned by CamScanner

Journal Details

Journal Title (in English Language)	Bhor Anubhav (print only) (Current Title of Journal)
Journal Title (in Regional Language)	भोर अनुभव (print only)
Publication Language	Marathi
Publisher	Rajarshi Shahaji Mandal
ISSN	NA
E-ISSN	NA
Discipline	Arts and Humanities
Subject	Arts and Humanities (all)
Focus Subject	Literature and Literary Theory

Copyright © 2022 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer

Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies SJIF2021=7.380 ISSN:2319-4766

झाडिया जमात: संशोधनात्मक वेध

डॉ. विशाखा संजय कांबळे

विभाग प्रमुख मराठी विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था (मॉरिस कॉलेज) नागपूर-१ मोबाइल नं ९८५०१५०८६१

झाडिया जमात- संशोधनात्मक वेध याबाबत विचार करताना,डिसेंबर २०१२ ला दिवाळी अधिवेशनात झाडिया जमातीचा मोर्चा विधान भवन नागपूर येथे धडकला,हजारोच्या संख्येने झाडिया जमातीचे लोक सामील झाले होते,या जमातीला झाडिया,झाडया,झाडे,झारे,झोरिया, जाडी,झाडी,झारेया अशा विविधप्रकारे संबोधल्या जाते,या जमातीचा कोणत्याही शासकीय दस्तऐवजात नोंद नाही,या जमातीला वन्यजमातीत समाविष्ट करण्यात न आल्याने सरकारी धोरणांपासून पूर्णतःवंचित आहे.

झाडिया ही जमात प्राचीन आहे.गडचिरोली,चंद्रपूर व छत्तीसगड प्रांतातील घनदाट जंगलात वस्ती करणारी झाडिया जमात विभाजनापूर्वी चंद्रपूर जिल्ह्याची क्षेत्रफळदृष्ट्या महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा म्हणून नोंद होती.२० ऑगस्ट१९८२ ला गडचिरोलीला जिल्ह्याचे स्थान प्राप्त झाले,या प्रांताला दंडकारण्य म्हणून प्राचीन काळात ओळखल्या जात असे,आज या प्रांताला झाडीपट्टी असं म्हणतात,गडचिरोली जिल्ह्याच्या पूर्वेकडील टेकड्या या ८ ताव उंच आहेत,त्यांची प्रकृती,संस्कृती,रूढी,रीती,परंपरा,गोत्रकुल-वंशकुल,आडनावे,गोंदण,साजशृंगार,लोकनृत्ये,लोकनाट्ये,जादूटोणा,कपोफ्ज,शिकार,मासे धरण्ये,शेती पद्धती,लग्न पद्धती,कुटुंब पद्धती,सामूहिक पद्धती,जन्मसंस्कार-मृत्युसंस्कार,इत्यादी वेगळ्या प्रकाराने आढळतात.

बीजशब्द: झाडिया,वन्यजमाती,गडचिरोली,प्रकृती,नैसर्गिकता.

प्रस्तावना

झाडिया जमात ही अतिशय प्राचीन असून नुकताच या जमातीचा शोध लागला. भारताच्या (जंबुद्वीप) भूगोलामध्ये यापूर्वी या जमातीचा उल्लेख आढळत नाही.या जमातीचे सांस्कृतिकीकरण, आर्थिकीकरण, सामाजिकता तसेच धार्मिक परंपरा व संस्कृती संदर्भात वेध घेताना;या जमातीचे भौगोलिक पर्यावरण व त्यांचे झाडीमधील वसतिस्थान कशाप्रकारचे आहे, या अनुषंगाने विचार करता येईल.

उद्देश-गडचिरोली जिल्ह्यातील घनदाट जंगलात राहणारा समुदाय;कधी द-याखो-यातून भटकंती करीत,तर कधी स्थायी होऊन आपले जीवन व्यतीत करीत आहे,यावर आजतागायत संशोधन झाले नाही.गेल्या काही वर्षापासून प्रस्तुत संशोधकानी या जमातीवर संशोधन केले.झाडिया(भारतातील झाडिया जमात:आरंभ व विकास प्रक्रिया)२६मार्च२०२१ ला प्रस्तुत संशोधनपर ग्रंथ साहित्य प्रसार केंद्र,नागपूर, यांनी प्रकाशित केला.या जमातीची समाजाला ओळख व्हावी,सरकारने दखल घ्यावी व त्यांना न्याय मिळावा या दृष्टीने घेतलेला संशोधनात्मक वेध.

व्याख्या-

१."झाडी-(स्त्री)१.जंगली झाडाझुडपांनी व्यापलेला प्रदेश, राई झाडांचा समुदाय

२.झाडोरा.झाडाझुडपांनी व्याप्त अशी अवस्था, निबिडता

३.झाडीपट्टी वाट (स्त्री),झाडी, जंगलातून जाणारी वाट."१

२."झाडी-(स्त्री)-झाडांचा दाट समूह,जंगल Athicket दे.प्रा.झाडी(मुबलक),झाड (लता गट नभ)ता,व झाडी मंडळ झाफळा=दाट झाडी"२

३."झाडी-(स्त्री)१.जंगली झाडाझुडपांनी व्यापलेला प्रदेश,२.राई,झाडोरा-वृक्षांनी व्यापलेला,४.चांदा व भंडारा हे महाराष्ट्रील जिल्हे."३

४."झाडी–(thani)मराठी की बोली व-हाडी(दे.)का उत्तरी-दक्षिणी चौदामे प्रमुख एक अन्य नाम."४

५."झाड –(पु.)कांबळ्याचा एक पट्टा,दोन्ही पट्टया एकत्र जोडून कांबळे होते."५

'झाडिया' ही जमात अतिप्राचीन किंवा आदिमानवाच्या काळातील आहे.हे त्यांच्या भौगोलिक पर्यावरणावरुन समजुन येते. भौगोलिकतेचा त्यांच्या जीवनमानावर जास्तीत जास्त परिणाम झाला,निसर्ग हा त्यांचा जीवनाधार आहे.त्यामुळे झाडिया व झाड यांचा निकटचा संबंध आहे.

"प्रागैतिहासिकतेत झाडिया जमातीचे अनेक रहस्य दडलेले आहेत.मानवांनी केलेली उत्क्रांती, या विकसनशील प्रक्रियेत या जमातीचे स्थान आहे. पुरातत्त्वाच्या दृष्टीने बघितले तर ही जमात आपल्याला प्राचीन आढळते."६ ही जमात प्राचीन काळात निसर्गात (झाडित)होती.आजही याच भागात आपले जीवन व्यतीत करीत आहे.

झाडिया जमातीचा प्रांत दंडकारण्य.नाग व गोर हे या वंशाचे प्रतिक आहे.घोडा हा प्राणी त्यांच्या शूरवीरतेचे प्रतिक आहे.त्यामुळे प्रत्येक गावाच्या वेशीवर घोडयाची मूर्ती आढळते.या जमातीत ४देव, ५देव, ६देव, ७देव, व १२देव मानल्या जातात,यामध्ये ७ देवाला महत्त्वपूर्ण स्थान आहे.देव म्हणजे काय?तर गावाच्या वेशीवर ठेवण्यात येणारे दगड या दगडांना कोणताही आकार नाही अथवा त्यावर अन्य काही लावले नसते.यावरून हे लक्षात येते की,ही संस्कृती पाषाणयुगीन असावी.या जमातीत 'मातृसत्ताक पद्धती' रूढ आहे.गावातील मुखिया अथवा मुखियानी असते. सिंधू संस्कृतीच्या कालखंडात नागवंशीयामध्ये 'मातृसत्ताक पद्धती' अस्तित्वात होती. नागवंशीयाची एक शाखा द्रविड.या द्रविडांनी भ्रमणतीच्या काळात दंडकारण्यात वस्ती केली.

आर्थिक जीवन-अन्न,वस्त्र,निवारा ह्या मानवाच्या मूलभूत गरजा.झाडिया जमात या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही.घनदाट जंगलात भ्रमंती करणारा;कित्येक वर्षापासून निसर्गावर अवलंबून आहे.रानावनातून,जंगल-द-यातून,पहाड-टेकडी,नदी-नाले,यातून त्यांचा प्रवास.जे मिळेल ते खायचे व पुढील प्रवास करायचा. "'भूक' मानवाच्या उत्क्रांतीमधील महत्त्वपूर्ण बाब आहे.मानवी विकासाची जडणघडण यातूनच झालेली आहे.विकासाच्या नवनव्या वाटा तो शोधत गेला आणि मेंदूच्या रासायनिक क्रिया-प्रक्रियेतून मानवी जीवनाचे कंगोरे उलगडत गेला व आर्थिक जीवन विकसित होऊ लागले.झाडया जमातीने विकासाची परंपरा तशीच चालू ठेवली.शेती,उद्योगधंदे-व्यवसाय,व्यवहार-देवाणघेवाण,बेरोजगारी,मजूरव्यवस्था."७ शिकार करणे,पशुपालन करणे,जंगली फळे गोळा करणे,गोहपुले वेचणे-दारु काढणे,टोळी गोळा करणे-तेल काढणे,तेंदुपत्ता करणे,झाडण्या कापणे.विसुरल्या पकडणे,मारोमारी,यापासून त्यांचे पुरेसे भरणपोषण होत नाही.

वंशव्युत्पत्ती- झाडिया जमाती ही आदिम आहे.या जमातीत मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती.सिंधू संस्कृतीच्या कालखंडात नागवंशीयामध्ये मातृसत्ताक पद्धती आढळते.या नागवंशीयानी एक शाखा द्रविड होय.आदिम असणा-या जमाती सैंधव कालखंडात राजकर्ते होते.या जमातीत स्त्रीचा दर्जा प्रमुख आहे.

झाडिया जमाती ही 'बुड्डीमाय'पासून तयार झाली आहे.साखरदेव(साखळदेव-तुंकलदेव)-बुड्डीमाय हे दोघे नवरा-बायको,काही वर्षानी ते वेगळे झाले,त्यांची मुले,जे बापाकडे (मूइतो)गेले ते नाडिया-मारिया-माडे व जे मायकडे(मारक्का)ते झाडिया-झारिया-झाडे.त्यामुळे झाडे-माडे भाऊ-भाऊ आहेत.

सांस्कृतिकता-झाडिया जमात लोकगीते,लोकनृत्य,लोकनाट्ये,या सांस्कृतिकतेचा वारसा जोपासत आहे. लग्नप्रसंगीचे गीत प्रसिद्ध आहे.स्त्रिया नवरीला उद्देशून म्हणतात-

"वारा वारा आदीवारम
आदिवारा पेनाडु मा मावोडा आच्छे
महावाली माउली मावोडा आच्छे
परमेसुनी तोडापुरिना सेवे आच्छे"८

गोंडी भाषेतील हे गीत आशयपूर्ण आहे "शिलावर्तुळ-हा कालखंड पूर्वपाषाण कालखंड होय.या काळात 'रेला नृत्य' हे अतिशय लोकप्रिय होते.दंडाला दंड पकडून हे नृत्य सादर केल्या जात असे "९ दंडार हे लोकनाट्य या जमातीत प्रसिद्ध आहे.

झाडिया जमातीचा मुख्य प्रश्न,"आम्ही या समाजाचा घटक आहोत का?"१० भारतातील एखादी जमात स्वतंत्र भारताचा एक भाग होऊ नये.ही या जमातीची मुख्य समस्या आहे.ते नागवंशीय असून भारताचे नागरिक आहेत.

संदर्भ-

प्र न जोशी-आदर्श मराठी शब्दकोश,विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,पुणे,तृतीयावृत्ती,१९९२,पृ.३८५

कृ.पा.कुलकर्णी-मराठी व्युत्पत्तीकोश,सुभदा सारस्वत प्रकाशन,पुणे,तृतीयावृत्ती,१९९३,पृ.३५५ ३.द.ह.अग्निहोत्री-अभिनव मराठी शब्दकोश,किनस प्रकाशन,पुणे,भाग दुसरा,१९८५,पृ.५१७

गोलानाथ तिवारी-भाषा विज्ञान कोश,ज्ञान मंडल लिमिटेड,वाराणसी,माघ संवत,२०२०,पृ.२३४.

डाले कर्वे-भाषा इतिहास आणि भूगोल,१९६५,पृ.९१

विशाखा संजय कांबळे-झाडिया जमात,साहित्य प्रसार केंद्र,नागपूर,२०१६,पृ.२८.

तत्रैव,पृ.९१

तत्रैव,पृ.५१

विशाखा संजय कांबळे-दंडार,बहुजन साहित्य प्रसार केंद्र,नागपूर,२०२१,पृ.८५

विशाखा संजय कांबळे-झाडिया जमात,उर्वरित,पृ.७१

ISSN -0975-0290

अंधश्रद्धा

वर्ष - ३८
अंक - १२
मार्च. २०२२



जनसामान्यांच्या साहित्य * संस्कृती * कलाभिरुची संवर्धनारा वाहिलेली एकमात्र मराठी मासिक पत्रिका
रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया नवी दिल्ली र.नं.४३६५८/८४
पोस्टल रजिस्ट्रेशन नं. ए.एम.टी./आर.एन.पी./ १३६/२०२१-२३
AKSHAR VAIDARBHI-ISSN 0976-0296

अक्षरवैदर्भी

वर्ष–अडतीस : अंक–बारा
माघ/फाल्गुन शके १९४३

दि. १ मार्च, २०२२

॥ संस्थापक संपादक ॥
(स्व.) सुदाम सावरकर

॥ कार्यकारी संपादक ॥
डॉ. सुभाष सावरकर
फो.–०७२१-२९९०१४७, मो.९८६०४५१०७५
Email ID- subhashsudam@gmail.com

॥ संपादन साहाय्य ॥
डॉ.जीवकंठ गोपाल गेंढे ॥ डॉ.निरंजनमाधव अंजनकर

प्रकाशक : जनसाहित्य साधना, जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती–५.
(रजि.नं.महा./१६१६/अम.वि.२६-१०-१९८६)
मुद्रक : नभ प्रकाशन, श्याम नगर,काँग्रेसनगर रोड, अमरावती.

–वर्गणीचे दर–
व्यक्तीसाठी – वार्षिक–रु.६००/–, त्रैवार्षिक–रु.१६००/–, पंचवार्षिक–रु.२७००/–
संस्थेसाठी – वार्षिक–रु.६००/–, त्रैवार्षिक–रु.१७००/–, पंचवार्षिक–रु.२८००/–

–बँक तपशील–
बचत खाते क्र. 51202200020989 खातेदार– सुभाष दामोदर सावरकर
IFSC No. CNRB0001083
बँकेचा पत्ता– कॅनरा बँक, सिटी कोतवाली समोर, जयस्तंभ चौक, अमरावती

वर्गणी पाठविण्याचा पत्ता– संपादक, अक्षरवैदर्भी, 'जनसाहित्य', प्लॉट नं.५३,
शिल्पकला कॉलनी, शेगाव–रहाटगाव मार्ग, वि.प.वि. उप डाकघर, अमरावती–४४४६०४
या अंकाचे देणगी मूल्य–रु.१००/–

अंतरंग

लेख–

- मानवसृष्टीच्या विकासक्रमात धर्माचे स्थान :
  भारतातील अवैदिक धर्म : जैन – डॉ. योगिता पिंजरकर ५

शोधनिबंध–

- नवकवी बा.सी.मर्ढेकरांचे– शिशिरागम :
  महायुद्धकालीन कवितेतील निरामयता– डॉ. विशाखा संजय कांबळे ५४

कथा –

- कुंभकर्णाचा वंशज– शोभा खानवलकर ९९

दोन स्मरणरंग –

- भेटून न भेटलेला 'मन्या' ओक– प्रोफेसर डॉ.शशिकान्त लोखंडे २३
- श्रीमती चंद्रकला भार्गव– डॉ. सूर्यनारायण रणसुभे ४९

रसग्रहण –

- संजीवनी बोकील यांच्या भाव-संवेदनांची बोलकी आत्मचित्रे
  -प्रा.मीनल येवले ३३

परीक्षण –

- ''भुईभेद' हरवत चाललेल्या खेड्याच्या पडझडीचे चित्रण– रमेश चिल्ले ४२

आत्मकथन–

- संघर्षाचा प्रवाही चालला-महेंद्र भास्कराव पाटील ६१

अक्षरवेदर्भी साहित्य सूची वर्ष २०२१–२२ ६६

पाच कविता–

शाश्वत वावर– चंद्रशेखर पटवर्धन (३१) लळा– डॉ. शंतनू चिंधडे (४८) माणूस– सुरेश खोब्रागडे 'दया' (६४) देश माझा... गीता अशोकराव नानवटकर /धाक!– विनय मिरासे 'अशांत' (६५)

शोधनिबंध

नवकवी बा.सी.मर्ढेकरांचे- शिशिरागम :

महायुद्धकालीन कवितेतील निरामयता

डॉ. विशाखा संजय कांबळे

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख-मराठी विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था(मॉरिस कॉलेज) नागपूर-१. भ्रमणभाष-९८५०१५०८६१

सारांश-

नवकवी बा.सी.मर्ढेकर-शिशिरागममधील: महायुद्धकालीन कवितेतील निरामयता... या अनुषंगाने विचार करताना, तत्कालीन कालखंड हा युद्ध, महायुद्ध, क्रांती, राज्यक्रांती यांनी जग पेटले होते. १ जानेवारी १८१८ नंतर महाराष्ट्रात पेशवाई संपुष्टात आली. भीमा कोरेगावच्या लढाईनंतर इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाली. या स्थित्यंतराचे प्रतिबिंब मराठी वाङ्मयात उमटले. महात्मा जोतिबा फुले-क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या परिवर्तनवादी साहित्याने भारतात नवपर्व निर्माण झाले. इसवी सन १९१४ ते १९१८ हा काळ पहिल्या जागतिक महायुद्धाचा होता. त्यानंतर काही वर्षांतच इसवी सन १९३९ ते १९४५ या काळात दुसरे भयंकर प्रलयंकारी युद्ध झाले. जर्मनीने पोलंडवर १ सप्टेंबर १९३९ ला आक्रमक हल्ला केल्याने हे महायुद्ध सुरू झाले. चीन, रशिया, इंग्लंड, अमेरिका व जर्मनी, इटली, जपान इत्यादी दोस्त व अक्ष राष्ट्रे यात समाविष्ट झाली होती. भारताबरोबरच ७० देशांचे सैन्य यात सहभागी झाले होते. साम्राज्य विस्तार हा या दोन्ही महायुद्धाचा हेतू वा उद्देश होता. त्यात वित्तहानी तर झालीच; शिवाय ६ कोटींच्या जवळपास मनुष्यहानी देखील झाली.

स्वातंत्र्याचे हे अमृत महोत्सवी वर्ष. एकीकडे सामान्य माणसाच्या मुलभूत गरजा पूर्ण होत नाहीत; तर दुसरीकडे माणूस हा भौतिकवादी झालेला. मानवीमूल्ये, जीवनमूल्ये व नैतिकमूल्ये यांचा ऱ्हास झाला. याच पार्श्वभूमीवर बा.सी.मर्ढेकरांची नवकविता महत्त्वपूर्ण ठरते. शाश्वत मूल्यांची रुजवात त्यांनी आपल्या काव्यातून केली. प्रेम ही संज्ञा त्या काळातील मानवी जीवनातील निरामयता होती-

शिशिरर्तुच्या पुनरागमें
एकेक पान गळावया
कां लागतां मज येत असे
न कळे उगाच रडावया (शिशिरागम पृ.४)

कवीने यातून उदासीनता व निराशेचे भावबंध व्यक्त केले आहेत.

बीजशब्द- युद्ध, महायुद्धकाल, नवीनता, नवकाव्य, शिशिरागम, निरामयता, संज्ञाप्रवाह, चर्चा-

प्रस्तावना-

बा.सी.मर्ढेकर यांची कविता स्नेहबंधाचा ऋतूबंध अधोरेखित करताना दिसते. त्यांची कविता ही परंपरेशी परिवर्तन गुंफणारी कविता होती.

पानांत जीं निजलीं इथे
इवली सुकोमल पाखरें,
जातील सांग अता कुठे?
निष्पर्ण झाडिंत कांपरे! (शिशिरागम पृ.४)

ही पाखरे म्हणजे मानवी जीवनाचे प्रतीकरूप आहे. मानव-माणुसकी-मानवता हा दृष्टिकोन ठेवून त्यांनी काव्यलेखन केले. आपल्या काव्यलेखनातून यंत्रयुगीन वास्तवातील आंतरिक स्नेहबंधाची जाणीव करून दिली. त्यामुळेच त्यांना नवकाव्याचे जनक म्हणतात.प्रेमकाव्यातून त्यांनी काव्याचे अंतरंग व बाह्यांग बदलविले. 'शिशिरागम' पासून पाहिले तरी मर्ढेकरांच्या रचनेमध्ये शब्दांचे रूप, वाक्यांची मांडणी, विराम चिन्हांचा वापर, ओळींची रचना यांच्या बाबतीत आशयाशी संवादी असा वैशिष्ट्यपूर्ण व काटेकोर सांक्षेप बाळगण्याचा प्रयत्न आढळतो.[१]

कवी कुसुमाग्रजांची कविता याच कालखंडातीत... कुसुमाग्रजांच्या प्रतिभेला जेव्हा काव्याचे धुमारे फुटू लागले तेव्हा देश पारतंत्र्यात होता आणि या जाणिवेने त्यांची लेखणी अग्नीरस्त्यांकडे वळणे स्वाभाविकच होते. 'क्रांतीचा जयजयकार' म्हणतच ते आवेशाने बाहेर पडले. आस, बंदी, आवाहन, कोलंबसाचे गर्वगीत, अवशेष, जरा जग पूर्वेकडे, सात, जालीयनवाला बाग, शलाका इत्यादि कविता अग्नीचा वर्षाव करू लागल्या.[२]

शिशिर-शिशिरागम-

फेब्रुवारी महिन्याच्या आरंभापासून झाडांची पाने गळून पडतात. या नैसर्गिक

हालचालींमध्ये प्रत्येक माणूस नव्या शोधाच्या प्रक्रियेत असतो. कवी केशवसुत तुतारी या कवितेत म्हणतात...

जुने जाऊ द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनी टाका

या युक्तीप्रमाणे जुन्या हालचाली कधी तरी नव्याने प्रवेश करतात.नव तेज जुनं होणारच आहे. म्हणजेच नव्याने जुन्याला विसरायचं का? माणूस भौतिकवादाच्या कुंपणामध्ये गुरफटलेला व विलासी साधनांच्या प्रवाहात डुंबलेला आहे. तो नवे स्वीकारतो, त्याचे हार्दिक स्वागत करतो. परंतु त्याचे प्रमाण असते. कधी तिथेच विचारमूल्ये मानतो. शिशिरागम म्हणजेच नव्या ऋतूचे आगमन, स्वागत. नवकवी बा. सी. मर्ढेकर यांना दूरदृष्टी होती. त्यांच्या मनात निरंतर शल्य असायचं. प्रत्यक्ष निसर्गाच्या वातावरणात आनंद घेणारे आणि कवितेच्या माध्यमातून माणसांना आनंद देणारे असे ते मूल्यांकित कवी होते. त्यांनी वास्तववादाला नकार दिला नाही; तर भौतिकवादाचा अस्वीकार केला. शिशिरागम या कवितेत ग्रीष्मातील वाढते उन्ह, प्रेयसीचे अकल्पित विचारणे. या विचारांती आहे– त्यांनी आपल्या 'सुहास' नावाच्या प्रेयसीला स्मरून तिच्या डोळ्यातील आसवांच्या प्रदेशात म्हणजेच ऋतूंच्या हालचालीतील पाने गळण्याची प्रक्रिया–अशी सुंदर प्रतिमा वापरली आहे. कवी शिशिर ऋतूच्या आगमनाची वाट पाहात आहे. तर सुहास ही आवश्यक आहे आणि शिशिरही जवळच आहे. कवी म्हणतो...

फुलली असेल तुझ्या परी,
बागेतली बकुलावली;
वाळूत निर्झर–बासरी;
किति गोड ऊब महीतली! (शिशिरागम पृ. २०)

म्हणजे बागेतील बकुळ ही आता तुझ्यासारखी फुलली असेल– असा भाव इथे व्यक्त होतो.

निर्झरला प्रवाहित असणे आवडते. बासरीचा काय? वाळू ऊबदार असलेली कुणाला आवडत नाही? पक्ष्यांचे सारे थवे त्या ऊबदार वाळूत बसलेले दिसतात. अत्यंत सुकोमल असलेली पाखरमुद्रा या पानांवरून त्या पानांवर सहजपणे भटकत असतात. मग अशा ऋतूत पानं गळायला लागतात. निष्पर्ण झालेली झाडे पाखरांना स्पर्श करीत नाही.पाखरांना पानांची गरज असते.

शिशिरागमामधील वास्तविकता–

सूर कशाचे वातावरणी?
सळसळ पानांची? वा झरणी
खळखळ, ओहोटीचे पाणी?
किलबिल शिशिरी केविलवाणी? (शिशिरागम पृ.३)

कवीने या चार ओळींत चार प्रश्नचिन्हे निर्माण केली आहेत. शिशिरागम कवितासंग्रहातील ही पहिली कविता. किलबिल शिशिरी केविलवाणी? या ओळीतील आर्तता लक्षात घेण्यासारखी आहे.दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर कविमनाला उदासता, निराशा, वैफल्यग्रस्तता आली. या महायुद्धात झालेला मानवसंहार मन विषण्ण करणारा होता. त्यांनी ती परिस्थिती अनुभवली होती.

कुणास ठाउक डोळ्यां पाणी
व्यर्थ आणतां; नच गाऱ्हाणी
अर्थ; हासुनी वाचा सजणी.
भास! जरी हो खुपल्यावाणी. (शिशिरागम पृ.३)

शिरशिरागम हा कवितासंग्रह इ.स.१९३९ प्रसिद्ध झाला त्या सुमारास दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली.या कवितासंग्रहात एकंदर २० कविता आहेत. बा.सी.मर्ढेकर म्हणतात, शब्दांवर थोडी हुकूमत असली आणि लय तोंडवळणी पडली म्हणजे कविता लिहिणं फारसं कठीण नसतं. त्यापलीकडे काही पुढील लिखाणात आहे किंवा नाही हे वाचकच ठरविणार. त्यांचं मत अनुकूल पडलं नाही तर लेखकानं योग्य तो बोध घ्यावा,[1] असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

महायुद्धोत्तर,स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थिती कवीने अतिशय भेदकपणे अधोरेखित केली आहे.

शिशिरागम या कवितेच्या दृष्टीने विचार करताना...अनेक शिशिर आले नि गेले, झाडाखाली पानांच्या पाचोळ्याचा जमलेला दाट थर बराचसा मातीत मिळून गेला.अनेक असहाय्य पान उत्तरवाऱ्याबरोबर उडत, गिरक्या खात, दिगंताला गेली' अशी परिस्थिती निर्माण झाली.

मर्ढेकरांच्याच मते खरोखर कलाकृतीमध्ये संवेदनाघटकांतून लयव्यूह निर्माण होत नाही; तर संवेदनाघटकांतील संवेदनानिष्ठ संबंधाच्या संबंधातून लयव्यूह निर्माणहोत असतो.[२]

निसर्ग आणि प्रेम

मंजुल पवनीं तरल लकेरी स्तब्ध करी पावलां,
सुचवा मार्ग कसा, जरी खुला?
सौंदर्याचे जगतावरती पसरे बघ चांदणें
राहिलें काय अता मागणें! (शिशिरागम पृ.६)

मानवी जीवनात प्रेमाला अद्वितीय असे महत्त्व आहे. मर्ढेकरांच्या कवितेतील अतिशय गाजलेल्या कवितेपैकी शिशिरागम ही कविता आहे. या कवितेत मर्ढेकर शिशिर ऋतूच्या आगमनाचे स्वागत करीत असताना त्याचे सुंदर वर्णन प्रस्तुत कवितेत करीत आहेत. निसर्ग आणि प्रेम यांचे नातेही अलौकिक आहे. त्या अनुरोधाने पाखरांच्या आणि निष्पर्ण झाडांचे चिंतन येथे मांडले आहे. शिशिराचे आगमन जणू काही प्रेमाचे आगमन होते की काय?-असाही संदर्भ कवितेत ते प्रगट करतात. या कवितेत निसर्ग आणि प्रेमाचा प्रकटीकरण भाव व्यक्त केला आहे. शिशिरागम या आरंभीच्या कवितासंग्रहात मरणाचा संदर्भ देणारी अतिशय सुंदर कविता त्यांनी लिहिली आहे. आकार किंवा आकृती हे शब्द व्यवहारात दृक्प्रत्ययाशी निगडित झालेले असल्यामुळे मर्ढेकर कलाकृतीतील आकृतिसंबंधी बोलतात तेव्हा कलाकृतीचा दिक् न्यायाने विचार करीत आहेत असे वाटते.[६] कवी म्हणतात-

पुसतों सुहास, स्मरूनिया
तुज आसवें, जरि लागले
एकेक पान गळावया
शिशिरर्तुच्या पुनरागमें (शिशिरागम पृ.४)

मर्ढेकरांच्या काव्यकर्तृत्वाला निर्विवाद मान्यता मिळाली ती १९६० नंतर. या काळात त्यांची कविता विवाद्य मानली जात होती. तिच्या विरुद्ध टीकेचा गदारोळ उडाला होता. पण अनेक नवे कवी नवकाव्याच्या वळणानेच निर्मिती करू लागले होते.[५] असे जरी असले तरी मर्ढेकरांनी मराठी समीक्षेला सौंदर्यशास्त्राचे पहिले धडे दिले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मर्ढेकरांच्या डोळस वास्तववादी भूमिकेचा 'अभिरुची', 'सत्यकथा' यांसारख्या प्रतिष्ठित मासिकांनी आग्रहपूर्वक स्वीकार केला. परिणामी मराठीत कलावादाने उचल घेतली. त्याची बाजू प्रभावीपणे मांडणारे प्रभाकर पाध्ये, माधव आचवल, वसंत दावतर, सुधीर रसाळ असे काही समीक्षक दिसतात. अतिशय गंभीरपणे मूलगामी म्हणू अशी या विषयाची मांडणी त्यांनी केली आहे.[६]

चंद्रकिरणांनो, तुम्हां
वाजते का कधी थंडी
स्वतःची? मध्यरात्री
हिवाळ्यांत हुडहुडी!
नाही ना? मीं म्हणूनच
लांबविले मरणाला;
गारठून जाल जेव्हा
चिता हवीशी शेगोटीला. (शिशिरागम पृ.१९)

भौतिकवाद-निर्माल्य-

बा.सी.मर्ढेकर यांच्या प्रस्तुत काव्यदृष्टीने विचार करताना...

नजर नाचरी नागसुंदरी विलासिनी रोखुनी
जरा जाताना हासुनी,
गालावरल्या गोड खळीने शराब जी सांडली
मुशाफिर-तृषा तिने भागली (शिशिरागम पृ.५)

निसर्गाचे वर्णन, भावोत्कटता, मांगल्य, पावित्र्य अशी निरामयता शिशिरागममध्ये आढळते.

तो विश्वनाटकगृहांतून या दिगंत
हास्य-ध्वनी दुमदुमून भरे हवेंत;
अन् रंगभूमिवरला जगतांत खास
गेलों विदूषक सुहास (शिशिरागम पृ.५)

१९४६ च्या आसपास एकूण मराठी साहित्यातच परिवर्तन झालेले दिसते. 'नवकविता', 'नवकथा' असे शब्दप्रयोग व त्यांची व्यवच्छेदक लक्षणे मांडण्यात येऊ लागली. मर्ढेकरांनी नवकविता आणि एकूणच साहित्याच्या स्वरूपासंबंधीचा विचार मांडला.[१] भारतीय समाज पुढील (स्वातंत्र्योत्तर) काळामध्ये विविध पातळ्यांवर-स्तरांवर, संभ्रमावस्थेत सापडला होता. त्या कालखंडातील परीस्थिती ही भयावह, भयंकर होती. सर्वसामान्य माणूस, त्याच्या होरपळलेल्या जीवनाची आर्तता, मनाला झालेल्या जखमा आणि दुखापती यांचे भेदकपणे चित्रण त्यांनी केले आहे.

आज वैज्ञानिक युगात जग जवळ आले. माणूस माणसापासून दुरावला गेला. या दोन अवस्थांतील अंतर अतिशय सूक्ष्मपणे 'नव'कवी बा.सी.मर्ढेकरांनी रेखाटले

आहे-

गेलो विदूषक जरी ठरुनी सुहास,
दान्ते-नि-शेक्स्पिअर-संगत आसपास
कोठे तरी, स्वमरणोत्तर भाग्यकाली!
हाही विचार न कमी मज शांतिदायी

निष्कर्ष -

नवकाव्याचे जनक बा.सी.मर्ढेकरांनी- (१) सर्वसामान्य माणसांच्या जीवनाचे मर्म ओळखले.

(२) कवितेच्या नव्या संकल्पना, नवे आशय, नवे विषय, नव्या प्रतिमा, नव्या कल्पना मांडल्या.

(३) काव्याचे आंतरिक व बाह्य रूप बदलविले :

(४) कवितेत शिशिरागम मधून वास्तवाची जाणीव करून दिली.

(४) संज्ञाप्रवाह-माणसाच्या सुप्त आणि अर्धसुप्त मनाचे भान आपल्या कवितेद्वारे आणले.

(६) भौतिकवादात शाश्वतमूल्ये, जीवनमूल्ये, मानवीमूल्ये, साहित्यमूल्ये ही चार मूल्ये आधारस्तंभ म्हणून होती.

(७) त्यांच्या कवितेतून वैफल्यग्रस्तता प्रगट होते.

(८) कविता म्हणजे प्रेम, त्याग, स्नेह, भावबंध, आत्मविलय.

(९) जागतिक महायुद्धकालीन कवितेत निरामयता आढळते.

संदर्भ -

(१) बाळ सीताराम मर्ढेकरांची कविता, श्री.पु.भा.भावे प्रकाशन गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, १९९१, पृ.५. (२) विशाखा संजय कांबळे-वि.वा.शिरवाडकरांची नाट्यसृष्टी, देवयानी प्रकाशन, मुंबई, पृ.३२. (३) बाळ सीताराम मर्ढेकरांची कविता, बा.सी.मर्ढेकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, १९९१, पृ.१११. (४) बाळ सीताराम मर्ढेकरांची कविता, श्रीधर बाळकृष्ण रानडे, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, १९९१, पृ.११९. (५) द.भि.कुळकर्णी मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र पुनःस्थापना, अमेय प्रकाशन, नागपूर, १९८२, पृ.३६७. (६) द.भि.कुळकर्णी मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र पुनःस्थापना, अमेय प्रकाशन, नागपूर, १९८२, पृ.१२४. (७) प्रदक्षिणा-खंड, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २००४, पृ.१६-१७. (८) अरविंद वामन कुळकर्णी-साहित्यविचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९७, पृ.२१४-२१५. (९) शरणकुमार लिंबाळे-साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे, २००७, पृ.७७.

॥ ८ ॥

अंधश्रद्धा

ISSN-0976-0296

वर्ष-३१

अंक-१,२,३

एप्रिल ते जून २०२२

प्रकाशन १ जून २०२२



जनसामान्यांच्या साहित्य * संस्कृती * कलाभिरुची संवर्धनास वाहिलेली एकमात्र मराठी वाङ्मयीन पत्रिका
रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया यांची विहीत र.नं.४३६१८/८४
पोस्टल रजिस्ट्रेशन नं. ए.एम.डी./आय.ए.पी./१३६/२०२१-२३
AKSHAR VAIDARBHI-ISSN 0976-0296

अक्षरवैदर्भी

वर्ष-एकोणचाळीस : अंक-एक, दोन, तीन
फाल्गुन शके १९४३ / चैत्र / वैशाख / ज्येष्ठ / आषाढ शके १९४४

एप्रिल / मे / जून २०२२

॥ संस्थापक संपादक ॥
(स्व.) सुधाम सावरकर

॥ कार्यकारी संपादक ॥
डॉ. सुभाष रामदास शेवडे
फो.-०७२१-२९१०१४७, मो.९८६०४९१०७५
Email ID-subhashevdam@gmail.com

॥ संपादक मंडळ ॥
डॉ. अविनाश गोपाळराव बोरकर ॥ डॉ. विजयकुमार पंढरीनाथ कोलारकर

प्रकाशक : अनसाहित्य सहवास, अनसाहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती-५.
(प्रेस.रजि.ओ./१४१६/अम.वि.२६-१०-१९८६)
मुद्रक : रमा प्रकाशन, श्याम नगर, फ्रेजरपुरा रोड, अमरावती.

-वर्गणीचे दर-

वार्षिक - वार्षिक-रु.३००/-, त्रैवार्षिक-रु.६५०/-, पंचवार्षिक-रु.१०००/-
संस्थात्मक - वार्षिक-रु.६००/-, त्रैवार्षिक-रु.१५००/-, पंचवार्षिक-रु.२८००/-

-बँक तपशील-

बँक ऑफ इंडिया A/C No.512010100102989 खातेधारक-डॉ.प्रभाकर दामोदर सावरकर
IFSC No CNRB0005183
बँकेचा पत्ता, सिटी कोतवाली समोर, जगदंबा चौक, अमरावती

सर्व प्रकारचे पत्रव्यवहार करावा- संपादक, अक्षरवैदर्भी, 'जनसाहित्य', प्लॉट नं.५३, शिवाजीनगर कॉलनी,
सेमाडोह-एक्सटेन्शन पार्क, बि.प.वि. पो.ऑफिस, अमरावती-४
या अंकाची देणगी मूल्य-रु.१००/-

अंतरंग

चार लेख–

- मानवसृष्टीच्या विकासक्रमात धर्माचे स्थान:अवैदिक बौद्ध धर्म –डॉ. योगिता निंबरकर
- उ.रा.गिरी यांची भावसौंदर्याचे मंडलेली कविता–प्रा.मनील येवले २६
- सफला घळवळीचा इतिहास–प्रोफेसर डॉ.शशिकान्त लोखंडे ५४
- मराठी माया जगेल का?–श्रीकांत बिडवे साप्तनकर २२२

दोन शोधनिबंध–

- महाकवी भवभूति यांच्या उत्तररामचरितम् नाटकातील प्राकृतिकता –डॉ. विशाखा संजय कांबळे ८६
- नीलिन देशमुख व पवन नालट यांच्या कवितेतील काव्यमूल्य : एक शोध – प्रा.डॉ. शोभा रोकडे १३१

जातिधर्मांची गांदियाळी–

- 'स्वामिनी' विषयी थोडसे - डॉ. सुभाष सावरकर ३७

चार कथा –

- दारुवाली–डॉ. विशाल इंगोले १५
- गुपचूप गुपचूप–मनोहर म. भोसले ६३
- जॅपा–डॉ. निरंजन माधव ९४
- एक डाव–गालर गारीसे १२८

चार प्रतिक्रिया –

- 'अजून नवीन काही येईल...'–प्रा. दत्तात्रय का. चेके ६२
- सावित्रीबाईंच्या क्रांतिकार्याचे प्रतिबिंब : 'माळणगुणे' –डॉ. कैलास रा.दौंड १२५
- 'पुरुष वासनेच्या शोधात' –प्रशांत नामदेवराव ठोले १३४
- 'आंबेडकरी आणिबाणा आवरणभाग' – अल्पा हरिभाऊ किंवे १४०

दोन अनुवादकथा–

- रोमन गॉड्स– डॉ. नीलकंठ गोपाळ मेंढे ६२
- बाबा, मिथ, एंड, आधारस्तंभ!–अनिमेश जयंतराव देशमुख ६८

दोन ललित –

- नौ–जयश्री दाणी
- एकऽ बिंदू, झेलू जाई...–रवींद्र गजानन दे ८१

वैचारिक प्रतिक्रिया–

- हरिलाल हरिचंद्र– आनंद देशमुख १३२

सात कविता–

गणपुस - सुरेश ओढनसंडे 'सुरेश' (१०) परीस - राजेंद्र रंगराव पाटील (२५) सांज्यमिया- नीलकंठ गोपाळ मेंढे (३४) तुझी मैत्री - चंद्रशेखर पटवर्धन (८५) आरोपित- शिवप्र मिरासे 'अरोपित' (१२३) गाजघाट - दीपाली दातार (१२५) मृगजळ - डॉ.संभाजी निंबाळे (१८५)

आहे. नागपूर या नगराला पुरातत्त्वीय-प्राचीन वारसा लाभला आहे. "नाग नदीक वसलेले स्थान म्हणून नागपूर हे नाव प्राप्त झाले असावे. या भौगोलिक संज्ञेबरोब शहर नागवंशी शासनाने वसवलेले-अशी एक मान्यता आहे. या स्थानाचे नाग या मु पदाधरून वाकिचयी अनुमान केले जाते व या स्थानची प्रथम अखिलेखीय नोंद राष्ट्र राजा कृष्ण तिसरा यांच्या ताम्रपटात येते. पुढे दहाव्या शतकात 'नागपूर नंदिव अशा जोड नावाने प्रशासकीय विभागाची नोंद मिळते. नागवर्धन, नंदिवर्धन यातू नागपूर असे नाव रूढ झाले."[१] असा नागपूरचा उल्लेख आढळतो.

विदर्भाच्या मातीत वाङ्मयीन फुलण्याचा, संस्कृतिकतेचा व निसर्ग सौंदर्य सुगंध लाभला आहे. प्रादेशिक विविधांगी बोली या प्रांतात निर्माण झाल्या. झ बोली, पहारी बोली, कुणबी बोली, माडिया बोली, पोंडी बोली, परधानी बो चौगई बोली, पवारी बोली, वडारी बोली इत्यादि काही बोली या भागात आढळत विदर्भाच्या पश्चिमेकडील म्हणजे अमरावती, अकोला, वाशीम या जिल्ह्यांमध्ये वऱ्ह बोली, बुलढाणा जिल्ह्यात वऱ्हाडी-अहिराणी बोली, यवतमाळ जिल्ह्यात बं बोली बोलल्या जाते. विदर्भाच्या पूर्वेकडील भागात नागपूर (नागपुरी बोली), (व-हाडी बोली) इतर प्रांतात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या प्रादेशि जिल्ह्यांपध्ये झाडीबोली-मोठ्या प्रमाणात ह्या बोली बोलल्या जातात. झाडीचा प्र पुरातत्वीय काळापासून आपले अस्तित्व अधोरेखित करताना दिसले. झाडी प्रदेश पूर्णपणे पर्जन्यवृष्टीचा प्रदेश आहे. या प्रदेशात ८७ टक्के जंगलाचा भाग जि जिल्ह्यामध्ये आहे. या भागाला तलावांचा प्रदेश असे म्हटले जाते. वैनगंगा, वर्ध वांगंग, पूर्णा, खोब्रागडी या पंचनदयांचा संगम या विभागी आहे. या प्रदेश निसर्ग पणीय, सौंदर्यपूर्ण वातावरण निर्माण करणारा प्रदेश आहे. या प्रदेशाची नैसर्ग स्वास्थ्यादाकरिता रोपित करीत आलेले, उंच डोंगर, हिरवी वनराई, वृक्षवेली, फळ-फ भौगोलिक स्थिती या अनुरोधाने प्रत्येक जिल्ह्याच्या लोकसंस्कृतीचा अभ्यास केल असे लक्षात येते येईल की, या प्रदेशात लोकनाट्य, नाटके, लोकगीत आणि लोकन यांचे रंजन आणि प्रबोधन अधोरेखित होताना दिसते. या प्रदेशातील संवादिक रू म्हणजे झाडीबोली. पुरातनकालीन येथील लोकमानसाचा लोकनाट्य, लोकगीत, लोकन यावर आधारित आहे. देवदेव हे प्राचीन लोकनाट्य विशेष लोकप्रिय आहे. जंगला फळे खाणे, प्राण्याचे मांस खाणे अशी उपजीविका पूर्वी होती. काही काळापासून शेत उदरनिर्वाह सुरू आहे. शेतीवर पुरेसे भागत नसल्याने त्यांना जंगलावर अवलंबून रा

लागतं. झाडीपट्टीतील या लोककलांचा प्रभाव तत्कालीन जनसमाजावर पडला. "दंडार हे अतिप्राचीन लोकनाट्य आहे. प्राचीनतेचा प्रदीर्घ वारसा या लोकनाट्याने सांभाळला. आदिमकाळाने या लोकनाट्याची उत्पत्ती केलेली आढळते."[१] यातूनच वाङ्मयनिर्मितीला प्रारंभ झाला हे नाकारता येणार नाही. हा प्रांत नैसर्गिक, भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, व राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

विदर्भाच्या पूर्वकडे झाडी, झाडीपट्टी हा प्रांत आहे. या प्रदेशातील पद्मपूर हे प्राचीन महाकवी नाटककार भवभूती यांचे जनास्थान म्हणून ओळखले जाते. पद्मपूर नगरामध्ये कृष्ण यजुर्वेदीय कश्यपगोत्रीय व पद्मपत्रिपावन, उदुम्बर उपाधी असलेल्या ब्राह्मण लोकांची वस्ती होती. कलाछंद या कुलात होता. वाजपेयी करणारे महाकवी होते. भट्टगोपाल भवभूतीच्या आजोबाचे नाव. आई जतुकर्णी, वडिल नीलकंठ. ज्ञानविधी गरुगुरूने त्यांना शिक्षित केले. त्यांची पैतृक संपतीच्या रूपात विद्वत्ता प्राप्त झाली होती. संपूर्ण शास्त्रात त्यांचे अलौकिकत्व होते. त्यांना व्याकरण-मीमांसा-न्यायशास्त्र ज्ञात होते. वेद, उपनिषद, वेदांत, व्याकरण, योग, सांख्य, तंत्र, जातक, धर्मशास्त्र, न्याय, मीमांसा, राजनीती, कामसूत्र, नाट्यशास्त्र इत्यादिद्वारे त्यांनी ज्ञानप्राप्ती केली होती. झाडीपट्टी हा प्रदेश भवभूतीच्या साहित्य कलाकृतीचा प्रांत होता. भवभूतीच्या पद्मपूर या प्रदेशाविषयी काही मते-

(१) "अस्ति दक्षिणापथे पद्मपुरं नाम नगरम्"[२]

(२) "प्रसिद्ध टीकाकार जगद्धर त्रिपुरारि पद्मपुर पद्मावती का पर्याय मानते हैं। दक्षिणापथ का प्रचलित अर्थ है दक्षिण भारत। स्वर्गीय डी.एस.वी. तेलंग ने अपने 'मालती माधव सार का विचार' नाम के ग्रंथ में यह सिद्ध किया है कि पद्मावती (आधुनिक पद्मपवा) भवभूति की जन्मभूमि थी।"[३]

(३) "राष्ट्रकूटांनी राजधानी भवभूतीचे जन्मस्थान पद्मनगर (आमगाव) जि. गोंदिया येथे होती."[४]

(४) "'भवभूतिर्नाम' इसमें नाम शब्द प्रसिद्धिद्योतक अव्यय है, इसलिए अधिकतर टीकाकारों ने 'भवभूति' प्रचलित नाम तथा 'श्रीकण्ठ' पैतृक नाम माना है। जैसे - 'श्रीकण्ठ इति... पैतृक का नामधेयमिदम्। भवभूतिरीति प्रसिद्धाभिधानः' (वीररावव)। इन टीकाकारों ने इस विषय में अपने मत की पुष्टि के लिए अनेक हेतु भी कल्पित कर लिए हैं, जैसे-(१) 'सांख्या पुनातु भवभूतिपदैर्गुणैः' इत्यादि कल्पित श्लोक से प्रसन्न होकर किसी राजा ने इन्हें 'भवभूति' इस उपाधि से सम्मानित किया।"[५]

महाकवी भवभूती–नाट्यनिर्मिती –

महाकवी भवभूतीच्या तीन प्रसिद्ध साहित्यकृती उपलब्ध आहेत. त्यामध्ये (१) मालतीमाधव (२) महावीरचरित (वीरचरित) (३) उत्तररामचरित – पहिल्या नाट्यकृतीतून तत्कालीन घटनांचा वेध, मालतीमाधव यांचे प्रेमसंबंध, विवाह तर नंतरच्या दोन नाटकांत रामायणातील राम आला आहे. श्रीरामचंद्र यांचे जीवन उत्तरार्धात वनवासातील जीवनचित्र रेखाटले आहे.

नाट्यकृतींची आशयगर्भता –

महाकवी भवभूतीचे महावीरचरित हे सात अंकांचे नाटक आहे. त्यात श्रीरामचंद्राच्या राज्याभिषेक व अनेक घटनांचे वर्णन विशद केले आहे. उत्तररामचरित भवभूतीच्या नाट्यकलांना लागून घेणे फार उपयोगी पडते. विशेष म्हणजे भवभूतीच्या सर्व नाटकांचे अवलोकन करण्यापूर्वी उत्तररामचरितम् या नाटकाचा आरंभ ते समाप्तीपर्यंत निर्वाह करण्यामध्ये सपर्थ आहेत. नाटकाचे स्वरूप, घटक, घटना, वातावरणनिर्मिती इत्यादि नाटकांत असलेल्या संपूर्ण बाबी, नाटकाचा शेवट सुखांत असल्यामुळे करुणरसाची प्रधानता सिद्ध करण्यात चढाओढ झाले आहेत. नाटकातील रसांचा विचार तुल्ला तोच्छाच महत्त्वपूर्ण ठरतो. उत्तररामचरितम् चा नाट्यकृतीमध्ये महाकवी भवभूती यांनी जीवनाचा संपूर्ण अभ्यास करून अभोरेखित केले आहे.

नाट्यकृतींची शैलीमयता –

महाकवी भवभूतीच्या नाट्यकृतींची शैलीमयता जीवनदर्शनाला आहे. 'महावीरचरित' या सात अंकांच्या नाटकामध्ये श्रीरामचंद्राचे जीवन पूर्वार्धाचे स्वतः शैलीने मांडले आहे. यामध्ये शृंगार रस, करुण रस व वीर रस समाविष्ट आहे. उत्तररामचरित ही नाट्यकृती सुखांत पद्धतीची आहे. यात श्रीरामचंद्राच्या राज्याभिषेक क्रियेचा नंतरचा भाग समाविष्ट आहे. करुण रसाने ओतप्रोत असलेले उत्तररामचरित नाटक आपल्याची निर्मिती विशेषतः असते; झाडी बोली प्राचीन आणि ऐतिहासिक आहे; महाकवी भवभूतीने जी नाट्यनिर्मिती केली, ती संस्कृतमध्ये होती. परंतु ते स्वतःच्या पूर्वापूर्वीच्या आपल्याने प्राकृतनेचा प्रभाव जाणवतो तो याप्रकारे–

"एको रसःकरुण एव निमित्तभेदाद्

भिन्नःपृथक्... (उत्तररामचरित ३/४७)"[५]

यातील 'एको' हा शब्द झाडी बोलीत आहे. अधोरेखित शब्दाव्यतिरिक्त इतर सर्व शब्द हे प्राकृत आहेत.

क्र.	संस्कृत काव्य	प्राकृत शब्द	ग्रंथाचे नाव	झाडी बोली शब्द-अर्थ	पृ.क्र
१.	एको रसःकरुण एव निमित्तभेदाद्	एको रसःकरुण विवर्तते	भवभूती-उत्तररामचरित् डॉ. गंगासागर राय-महाकवी भवभूति	एकी-एक, अद्वैत	६/४७ पृ.१४०
२.	र्वं अज्ञापयेत देवी	देवी	डॉ. गंगासागर राय-महाकवी भवभूति	देवी-माऊली	॥२॥ पृ.५
३.	ताअ,जणअ,पिता	ताअ,जणअ, पिता	शब्दरत्न	-	पृ.१९
४.	लौकिकानां	लौकिकानां	तत्रैव	लौकिकानां-लौकिक सगुरुण	॥१०॥ पृ.२१
५.	लोह,लोअ, लोअणा,लअण	लोह,लोल, लोअणा,लअण	तत्रैव	लोअण,लोअणां-लोकं	पृ.२४
६.	वन	वण	तत्रैव	वन-लांज	॥१४॥ पृ.३७
७.	पर	पर	तत्रैव	पर-पंख-अधिक	॥१५॥ पृ.३९
८.	तुल्य	तुल्य	तत्रैव	तुल्य-सम, तसोर	पृ.३८
९.	स्वयं, स्तव, नाहोदावः,कर, नये, भणति यया	स्वया, स्तव,महोत्सवः,नव, बले, भणइ यया	प्रतीक	- -	पृ.३९, पृ.४१ पृ.४५ पृ.४९ पृ.४६
१०.	सखाभीरुंका गोदावरी	सखाभीरु गोदावरी	तत्रैव	गिरि,गोदावरी	८/३८॥ पृ.४३
११.	जर्जरकपाः	जर्जरकपा	तत्रैव	जजंर	॥२९॥ पृ.४७

१३.	निशा,स्पर्श, विरह	निद्रा,स्पर्श, विरह	तत्पुरुष	-	पृ.५१ पृ.६२
१३.	ह्रस्व च: चरणा	चसा	तत्पुरुष	चस्ता- घोडासा	॥३२॥ पृ.६५
१४.	...यमादपि दण्डधरो ...तापयति	दण्डधरो तार	तत्पुरुष	दण्डधरो- दण्डारी-दंडारी तार-सांधाळ	॥११॥ पृ.१०८
१५.	दण्डकस्तं वने व:	दण्डकाव	तत्पुरुष	दण्डकाय वने- दण्डकारण्य	॥१३॥ पृ.११०
१६.	दण्डकारण्यपाणा:	दण्डकारण्यपाण	तत्पुरुष	दण्डकारण्यधाण	॥१४॥ पृ.१११
१७.	पुरा रम्य शैल:	पुरा, पूर	तत्पुरुष	पुरा-पूर्व,गांव	॥२७॥ पृ.१२७
१८.	रुतनु	पुरुतु	तत्पुरुष	रुतनु-सुंदर	॥१५॥ पृ.१२८
१९.	पीडित चिंतुर्ती जीवति शुक्लमा. संस्कार	पीडित चिन्तुद्धी जीवति शुक्लमा: संस्कार	तत्पुरुष	जीवति	पृ.४१८ पृ.४१६ पृ.४२८ पृ.४२१ पृ.४२४

आशयकर्ते भवभूती भवभूती यांच्या नाटकात विपुल प्रमाणात संस्कृत शब्द व शब्दरचना आढळते.

"पद्मपुराणा भवभूती सो.... नाटक दायां लिखला"

असे वर्णन अनुभवाला मिळते.

संदर्भ

(१) डॉ. विद्याधर संभाजी ढवळे –डाक्टरेट प्रबंधाचे मार्गदर्शन, संशोधन मार्गदर्शन केंद्र, नागपूर, २०१७, पृ.७. (२) अरुणचंद्र डॉ. पाठक (संपादक)–महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, नागपूर जिल्हा, भाग-१, इतिहास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृ.९. (३) डॉ.विद्याधर संभाजी ढवळे–दंडार, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २०१६, पृ.५. (४) भवभूती-मालती-माधव,

प्रस्तावना (५) म. य. मिराशी-स्टडीज इन इण्डोलॉजी, भाग १, पृ. २२-२५. (६) लांजेकर हिरामण (रगानंद)-सगीत झाडीपट्टी, विवेक प्रकाशन, नागपूर, २००६, पृ. ९४. (७) महाकवि-भवभूति प्रणीतं-उत्तररामचरितम्-डॉ. रमाकान्त त्रिपाठी, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, संस्करण, पृ. १२. (८) डॉ. गंगासागर राय-महाकवी भवभूति, चौखम्बा प्रकाशन, वाराणसी, द्वितीय संस्करण, १९९०, पृ. १४०. (९) डॉ. कृष्णचंद्र बोरकर-कागत सांग, झाडी बोली साहित्य मंडळ, साकोली, २००२, पृ. ६६.

❑ ❑ ❑

असोशी

अंतराला असीम लेवा, उमलुन यावा सरीसारखा
जीवनात आनंद फुलावा, चमचमणाऱ्या जरीसारखा

रक्तःमध्ये शिरलानही जळणाऱ्यांचे भान असावे
आयुष्याच्या सोन-पुस्तकी, दुःखितांचे गान असावे

मध-माशांसम गुंज असावे, श्वासांपरले मधु-कण वेचित
पराभवांच्या अटळ क्षणांना, आधीनेच करावे दुश्चित

जगण्यामधला विखार चुकुनी, कुठे कधी ना गुळी रमाया
हास्य-फुलांचा मृणाल पाउरा, वाणाक्षणाला सदा झालावा

डोळ्यांमधली रंग-लालसा, नैराश्याने कधि न शिवावी
हृदयामधली गंधशिपाला अश्रूंनी ना पुसली जावी

दिवसांच्या दारातुन जावे, स्वप्नांच्या मंतरल्या देशी
रमता-गमता, चित्त भिजावे, आयुष्याची होत असोशी

आयुष्याचे गाणे गाता, विरागुन जावे सप्त सुरांना
जगण्यासाठी शोधुन घ्यावे, अंतरातल्या व्यथा-पुरांना

– विनय मिरासे 'अशांत'
मोबाईल. ७.९४२०३६८२७५

ललित

जॅमर

डॉ. निरंजन महावत
'वर्षा' सहनिवास, २७, ८ सदाचार सोसायटी, दत्तवाडी, अमरावती रोड, नागपूर-२३

शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयातील आजची ही कितवी खेप?... मनातल्या मनात हिशेब केला. आकडा चौरसष्ठा वर गेला.... बस्स!.... आपल्या शिक्षकी पेशातील नोकरीची चौतीस वर्षे पूर्ण केल्याबद्दल खास प्रशिक्षण भत्ता मला मिळणार होता. 'विशेष श्रेणी' प्राप्त करायला एवढी कवायत पुरेशी आहे! मी मनातल्या मनात अतिशय खुशीत झालो. झपाझप चिंचा चढून वर गेलो, एकाच्या एक पायऱ्या सहा.... तिथे फक्त कार्यालयीन कर्मचारी नागरिकही... त्यामुळे चार्जिंगची कटकट नाही... पंखे चालू...

थोडा वेळ गेला. अवांतर वृत्तपत्रे, कुरकुरीत झालेला चहा, ... सरदेशपांडे गुरुजी, तलेजांचे मोलरीय, कॅल्कुलस, सिमेंटिंग, एक्स्ट्रा चार्ज... कर्मचाऱ्यांची वाचाळ, पुंजक चर्चा, बॉडीमेकर्सचे फोटो, ... कार्यालयातील ते गुलगुलीत चेहरे... स्वच्छ आरोग्याचे, आनंदी फोटो... सरकारी वेतनी गुटू, गोरेला पोकलेला, तहानली पोक्षलेले... एवढ्या वातावरणात अचानक आल्यासारखी ही गावची जत्रा वातावरण आनंदमयी होती. एखाद्या वस्तूला स्पर्श करून तिचे वैशिष्ट्य सांगणारे अंध... ते आपला मार्ग, रेटा, ... आणि ... हे सगळे पाहून, ते वातावरण अनुभवून मनातल्या मनात आनंदले होते, हरखले होते. ... होता आनंद मनात मावत नव्हता.

एकूणच 'आपले' वातावरण पाहण्याचा योगायोग बऱ्याच वर्षांनी आला होता. अनेकांना ओळखणारे होतात - अनेकांना ओळखणारे असतात. पण, आपल्या ओळखीच्या व्यक्ती, त्यांचे, आपले, एकमेकांचे नातेवाईक, मित्र-मैत्रिणी यांच्या भेटी होतात. ... आणि ... हे सगळे आपलेच होते. आपले, फक्त आपले...

थोडा हलकल्लोळ... थोडी खळबळ... पांढरे शुभ्र पोशाख घातलेले एक... त्यांच्या हातात मेजे, पेपरवेट, होल्ड, जर्नल्स, रजिस्टर्स यांचा फुलदाण्या. पोते, ... या दालनात ते आले